# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

महासभा दि. ०९/०१/२००८

आज बुधवार दि. ०९/०१/२००८ रोजी दि. २०/१२/२००७ रोजीची तहकुब सभा मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०४ दि. १०/१२/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | नरेंद्र मेहता | महापौर |
| २) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | उपमहापौर |
| ३) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील जयंत महादेव | सभागृह नेता |
| ५) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ६) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ७) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ८) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ९) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| १०) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १२) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १३) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १४) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १५) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १६) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १७) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १८) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १९) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| २०) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| २१) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २२) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २३) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २४) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २५) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २६) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| २७) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| २८) | पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| २९) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ३०) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ३१) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३२) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३३) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३४) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ३५) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३६) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३७) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३८) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ३९) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४०) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ४१) | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | सदस्य |
| ४२) | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | सदस्य |
| ४३) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४४) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४५) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४६) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ४७) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४८) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ४९) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ५०) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ५१) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ५२) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ५३) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५४) | भाटकर प्रेरणा प्रमोद | सदस्या |
| ५५) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५६) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५७) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५८) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५९) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ६०) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ६१) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६२) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ६३) | वैती चंद्रकांत सिताराम | सदस्य |
| ६४) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६५) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६६) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६७) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६८) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६९) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ७०) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ७१) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ७२) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७३) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ३) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ४) | वर्षा भानुशाली | सदस्या |

**रजेचा अर्ज -**

| | | |
|---|---|---|
| १) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |

(वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताने सभेला सुरुवात करण्यांत आली.)

**मा. महापौर :-**

सभागृहातील सर्व सन्मा. सदस्य, सभागृह नेता, स्थायी समिती सभापती, उपायुक्त सर्व अधिकारी वर्ग, पत्रकार आणि प्रेक्षक गॅलरीतील प्रेक्षकवर्ग सर्वांना नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. गेल्या २००७ सालामध्ये आपल्या चार सभा त्या चारही सभेमध्ये माझी भावना अशी होती की खेळीमेळीचे वातावरण या सभागृहात चालावे. गेल्यावेळी बराचसा गोंधळ झाला व अशाप्रकारामुळे सभा तहकूब करावी लागते त्यामुळे मिरा भाईंदर शहराचे मोठे नुकसान होते. तर यापुढे आपण नियमाप्रमाणे सभा चालवावी. विषयाला सोडून बोलू नये. एखादा

महत्त्वाचा विषय असेल तर बोलायला विषयावर चर्चा करायला आपल्याला नक्की वेळ दिली जाईल. पण कोणीही परवानगीशिवाय आणि विषयाशिवाय कृपया बोलू नये. आपल्याला काही माहिती लागेल आपण अनुभव करुन घ्या. माझ्या दालनात ज्या ज्यावेळी आपण येणार तेव्हा आपल्याला पूर्ण सहकार्य व रितसर माहिती मिळेल व त्यावर योग्य ती कार्यवाही ही होणार. पण उगाच काहीही बोलून आपण सभागृहाचा वेळ घालवू नये. कृपया आपण शांततेने सभा चालवावी आणि यापुढे आपण असल्या कुठल्याही प्रकारचे गैरवर्तन करु नये. सचिवजी, आजच्या सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

पिठासिन अधिकाऱ्यांच्या परवानगीने या परिपत्रकाव्दारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महासभा गुरुवार दि. २०/१२/२००७ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरहू सभा मा. महापौर यांनी तहकूब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबित विषय क्र. १७ तसेच पुरक घोषणा विषय क्र. १८ ते २० या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा बुधवार दि. ९/१/०८ रोजी सकाळी ११.०० वा. मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे. प्रकरण क्र. १७ चालू करत आहे.

**शरद पाटील :-**

सचिवजी, मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने सभा चालू होण्याच्या अगोदर माझा एक विषय आहे तो पाच मिनिटामध्ये मांडत आहे. कारण हा ज्वलंत विषय आहे आणि आपली परवानगी असेल तर मांडतो. या सभागृहात प्रत्येकवेळी लॉजिंग, व्हिडीओ सेंटर आणि रस्त्यावर चालणारे अनैतिक व्यवसाय याबद्दल याबाबत प्रत्येक वेळेला या सभागृहातील...

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, हा विषय नाही आणि मग प्रत्येक नगरसेवकांची भावना असते की त्यांनी त्या त्या विषयावर बोलावे.

**शरद पाटील :-**

ही भावना आहे त्याला या महापालिकेतील सदस्य जर विरोध करत असतील वर मी बसतोय.

**मा. महापौर :-**

सदस्य विरोध करत नाही.

**शरद पाटील :-**

जेव्हा याविषयावर तीन नगरसेवकांवर पोलिसांतर्फे गुन्हे दाखल झाले होते. त्याची जर तुम्हांला कदर नसेल तर मी बसतोय आणि आम्ही नुसते बसत नाही तर भारतीय जनता पार्टीचे सदस्य सभात्याग करुन सर्व नगरसेवक बाहेर निघतो.

**मा. महापौर :-**

आपल्याला या विषयावर बोलायला मी शेवटला वेळ देतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब आमची लक्षवेधी आहे.

**मा. महापौर :-**

लक्षवेधी कशी येणार? ही तहकूब सभा आहे.

**मिलन पाटील :-**

आजच्या पेपरमध्ये आहे याची सभागृहाला माहिती मिळाली पाहिजे. पोलिओच्या डोसपाई आज चार पाच मुले आणि ती ही लहान मुलं ॲडमिट आहेत ही फार गंभीर बाब आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, मी तेच सांगत होतो. पोलिओमुळे लहान मुलांना विषबाधा झाली आहे असे पेपरमध्ये आलेले आहे ही सत्य घटना आहे का?

**मिलन पाटील :-**

आपण याची सभागृहाला माहिती द्यावी आणि मिटींग चालू केली तर फार बरे होईल. याच्याबद्दल सर्व सभासदांच्या भावना आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापालिकेच्या कर्मचाऱ्याने एका मुलीवर बलात्कार केलेला आहे अशी बातमी आहे त्याची प्रशासनाने काय दखल घेतलेली आहे याचा ही या सभागृहामध्ये आम्हांला खुलासा पाहिजे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटीलजी बोला.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब पोलिओमुळे विषबाधा झाली आहे अशी आजच्या "लोकमत" ला बातमी आलेली आहे. ती कितपत खरी गोष्ट आहे त्याचा आपण आम्हांला खुलासा द्यावा.

**मा. महापौर :-**

उपायुक्त साहेब, पोलिओबद्दल काल जे घडले त्याबद्दल माहिती देण्यांत यावी.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने सन्मा. सदस्यांनी याठिकाणी दोन बाबींचा खुलासा करण्याचा मुद्दा मांडलेला आहे. १) पल्स पोलिओच्या अनुषंगाने आणि २) सफाई विभागातील कर्मचाऱ्याने जो अनैतिक प्रकार केला आहे त्याच्यावर काय कार्यवाही करण्यांत आली तर सर्व प्रथम मी खुलासा करु इच्छितो की संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक पोलिस अभिप्राय घेवून निलंबित करण्यांत आलेले आहे व त्याच्यावर विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यांत आलेली आहे. दुसरा मुद्दा पल्स पोलिओबाबत काल जे शहरामध्ये आणि प्रसारमाध्यमामध्ये बातम्या आलेल्या आहेत व भक्ती वेदांतमध्ये जी मुले ॲडमिट आहेत त्या अनुषंगाने प्रशासनाकडून जो अहवाल दिलेला आहे तो आपल्यासमोर मांडतो. पल्स पोलिओ हा राष्ट्रीय कार्यक्रम आहे. आपल्या देशातील पोलिओ हा रोग समूळ नष्ट करण्यासाठी घेत असलेले राष्ट्रीय कार्यक्रम आहे. त्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका प्राधान्याने हा कार्यक्रम राबवित आहे. दि. ६/१/२००८ रोजी पूर्ण शहरामध्ये पल्स पोलिओ कार्यक्रमाअंतर्गत ० ते ५ वयोगटातील बालकांना पोलिओ डोस पाजण्यांत आलेले आहे. आपल्या शहरामध्ये साधारणतः ० ते ५ वयोगटातील एक लक्ष पाच हजार बालके आहेत. त्यामध्ये ७५,१२२ बालकांना हा डोस पाजण्यात आलेला आहे. तद्नंतर ११ तारखेपर्यंत ज्या बालकांचा याच्यामध्ये समावेश झालेला नाही. त्यांना हाउस टू हाउस सदरचा डोस पाजण्याची तरतुद आपल्याजवळ आहे व तशी यंत्रणा आपल्याकडे कार्यरत आहे. त्याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून काल मिरा रोडमध्ये एक अभ्यासक्रमिका घेतली जाते त्या ट्युशनमध्ये जी बालके होती त्या वस्तीतला आपला जो नियुक्त कर्मचारी मानधनावरचा होता तो शाळेचा विद्यार्थी होता. त्याने त्या क्लासमधील बालकांना त्याठिकाणी डोस पाजले अशी सही नाही आणि प्रत्येकवेळेस प्रत्येक मोहिमेच्या वेळेस त्यांनी हा डोस पाजलेला आहे. त्याचपद्धतीने त्यादिवशी देखिल डोस पाजण्यात आला होता. जेव्हा प्रसारमाध्यमाला आणि बाहेर अशी बातमी आली की, त्या बालकांचे जे आरोग्य आहे ते त्या डोसमुळे विषबाधा होवून खराब झालेले आहे. पण मी प्रामुख्याने आपल्याला खुलासा करु इच्छितो की, ही अंतिम वस्तुस्थिती नाही. सदर बालकांना चक्कर येणे, किंवा त्यांच्या पोटामध्ये वोमेंटींग होण्याचे वातावरण ही वस्तूस्थिती झाली होती. पण निश्चितच ते पल्स पोलिओमुळे झालेले होते असे निष्पन्न नाही आणि त्यांना भक्ती वेदांतमध्ये ॲडमिट करण्यांत आले होते ही वस्तूस्थिती आहे आणि त्या वोमेटींगचे सॅम्पल प्रशासनाने घेतलेले आहे. यासाठीचा सर्व अहवाल शासनाला सादर करण्यांत आलेला आहे. पल्स पोलिओ हे जे वॅक्सींन आहे. ते राज्यशासनाकडून, ब्रोकरकडून आपल्याला उपलब्ध करण्यांत येते. ही वॅक्सींन अति उच्च दर्जाहून तयार केली जाते आणि ह्याच्यामध्ये शून्य वयोगटातील बालकापासून ते पाच वयोगटातील बालकांना देण्यात येते. दवाखान्यामध्ये ही बालके आहेत त्याठिकाणी सन्मा. महापौर आणि आम्ही स्वतः व्हिजीट केली. संबंधित डॉक्टरांबरोबर आम्ही चर्चासुद्धा केलेली आहे आपल्या सभागृहात सुद्धा काही सन्मा. प्रायव्हेट डॉक्टर आहे. हे जे पल्स पोलिओचे वॅक्सींन आहे त्याचा रिअल इफेक्ट ९ दिवसाच्यानंतर अस्तित्वात येतो असे सन्मा. डॉक्टर साहेबांचे म्हणणे आहे. निश्चितच त्या बालकांना जी विषबाधा झालेली आहे. त्याचे इन्वेस्टीगेशन होईल. पण ते पल्स पोलिओमुळे झाले हे असे म्हणणं कदापि बरोबर नाही. कारण त्या व्हॉईलमधून साधारणतः १८ बालकांना आपण ते डोस पाजलेले आहे ही वस्तूस्थिती आहे आणि आता ती बालके सुदृढ आहे. त्यांना थोडयाच वेळात डिसचार्ज दिला जाणार आहे व पल्स पोलिओचा उर्वरित कार्यक्रम राज्य शासनेच्या सुचनेप्रमाणे शहरात चालू आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर साहेब, पल्स पोलिओच्या ज्या मोहिमा राबविल्या जातात त्या काही आजपासून राबविल्या जात नाही. ही केंद्र सरकारची मोहिम आहे व अतिशय यशस्वी झालेला एक प्रकारचा कार्यक्रम म्हणून पल्स पोलिओ मोहिमेकडे बघितले जाते. त्यातून पोलिओ मुक्त व्हावे ही भावना आहे आणि आतापर्यंत पूर्ण भारत वर्षामध्ये त्याच्याबद्दल कितीतरी गोष्टी बोलल्या गेल्या. तो जो प्रकार मिरा भाईंदरमध्ये झाला हा प्रकार कुठेच झाला नव्हता. आपल्याला माहिती देवू इच्छितो की ही घटना कालची आहे. परंतु, परवा ब्रीच कॅन्डीचे एक डॉक्टर आहेत ते पॅरेलायसेसवर इलाज करतात ते पती-पत्नी दोघेजण ब्रीच कॅन्डीमध्ये असतात त्यांची दोन मुले मिरारोड येथे बेबी सिटींगमध्ये बसवतात आणि रात्री मुलांना घेवून ते घरी गेल्यानंतर मुलं काहीतरी रेग्यूलर वागतात तशी वागत नाही. त्यांच्यामध्ये काहीतरी बदल आहे तर या डॉक्टरांनी त्या बेबी सिटींगच्या येथे विचारले की तुम्ही यांना आहारामध्ये काय चूक केली आहे का, किंवा प्रॉब्लेम काय झाला आहे? मुले आज चुकीची वागत आहेत त्यांना झोप आल्यासारखे वाटते व ते बसलेल्या जागी पडतात. तर त्यांनी सांगितले

की आम्ही काहीही दिलेले नाही. आपण जे पाणी, बिस्किट देता तेच आम्ही त्यांना देत असतो त्याच्या व्यतिरिक्त आमच्या घरातले पाणी ही देत नाही. परंतु, आज पल्स पोलिओची मोहिम आली होती व त्यांनी त्यांना ड्रॉप पाजलेले आहेत. ती लोक कम्प्लेंट घेवून आमचे आमदार श्री. मुझफ्फर हुसैन साहेबांकडे आले होते. तेव्हा मी तिथे उपस्थित होते. तेव्हा आपण डॉ. काकडे यांना बोलावून घेतले त्या डॉक्टरांच्या समोर त्यांची चर्चा करुन दिली. त्यांना विचारले की, हे जे कर्मचारी आहेत त्यांचे आपण शैक्षणिक पात्रतेचा निकष काय धरता? त्यावर त्यांनी सांगितले की हा निकष आम्ही १० वी पास असला पाहिजे व प्रत्यक्ष त्यांना ट्रेनिंग देतो की कशाप्रकारे डोस दिले जावे. हे सर्व झाले. त्यांना डोस कसे पाजले पाहिजे? एक थेंब पाजला पाहिजे. प्रत्येक मुलाला पाजला पाहिजे आणि आतापर्यंत काहीच झालेले नाही. परंतु, आपली कुठे चुक होत असेल. ही जी पल्स पोलिओची लस आहे ती आपण मागवत नाही. ती आपल्याकडे शासनाकडून आलेली आहे. पण प्रश्न असतो त्याच्या प्रिझरवेशनचा. हे प्रिझरवेशन आपण प्रॉपर्ली करतो का? आईस क्यूबमध्येच ती लस ठेवली पाहिजे असे संकेत आहेत मग त्याच्यापैकी एखादी बाटली, एखादी शिशी ही आईस क्यूबमध्ये ठेवली नसेल म्हणून तो प्रॉब्लेम झाला असेल. आपण जर असे सांगितले की, त्या घरातले पाणी ज्याठिकाणी टयूशनला मुलं जातात ही केस आणि डॉक्टरांच्या मुलांचे सांगत आहे ती केस भिन्न आहे. याबाबत डॉ. लहाने यांच्याशी मी बोललो होतो. डॉ. काकडे यांना त्यांच्यासमोर बोलावून घेतले होते. श्री. पानपट्टे साहेबांना फोन केला होता. खतगांवकर साहेब आपल्याला फोन केला होता आपण अटेंड केला नाही. मग श्री. पानपट्टे साहेबांना फोन केला. डॉ. लहाने साहेब तिथे पाच मिनिटात पोहचले. ही ट्रिटमेंट झाली परंतु, जर काही आई-वडील कामावर जात असतील व मुलं घरी असतील त्यांना हा प्रकार झाला तर जबाबदारी कोण घेणार? एखाद्याच्या घरातलं भवितव्य आपण हिरावून नेणार की नाही? आपल्या मुलांना ठेस लागली की, आपण किती कळवळतो? मग मुलांवर हा प्रसंग आल्यानंतर आपण नंतर जावून, वराती मागून घोडे नाचवायचे कारण नाही. या केसमध्ये कोणीही दोषी असेल काही चूक झाली असेल. पहिली सुरुवात आपल्याकडून केली पाहिजे. नाहीतर, उद्या हे मिरा भाईंदर या देशासाठी असे उदाहरण होईल की, मिरा भाईंदरमध्ये अशी घटना घडली की पल्स पोलिओच्या डोसमधून विष बाधा झाली म्हणून संपूर्ण राष्ट्रातील मोहिम बंद होण्याची वेळ येईल. आपण सांगतो की, त्यांच्या वोमेटींगचे नमुने पाठवले. आता ह्या केस डायक्लोज झाल्या. पण एखाद्याची रोगप्रतिकारक शक्ति बरोबर असेल, मजबूत असेल, त्या मुलांना त्रास झाला असेल. पण ज्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी असेल त्यांना त्रस्त झाला असेल. काही लोकांनी स्वतःच ईलाज केला असेल, डॉक्टरांकडे घेवून गेले असतील. आपल्यासमोर ती प्रकरण आली नसतील. तर ही मोहिम जिथे राबवलेली आहे. ज्या ज्या लोकांना राबवलेली आहे. पर्टीक्यूलर मिरारोडमध्ये हे झालेले आहे. तर तिथे जे सेवक डोस द्यायला जातात. त्यांना परत पाठवा आणि त्यांना विचारा की ज्या मुलांना डोस दिला आहे त्यांच्या घरी त्यांच्या मुलांना काय त्रास झालेला आहे. का? आणि ती लस आहे ती बरोबर प्रिझर्व्ह करता का? याची माहिती घेतली पाहिजे. आपण आता हे सांगू नका त्या पाच मुलांची तब्येत चांगली आहे. तसेच अजुन किती मुलांना त्रास झालेला आहे. त्याचा शोध घेणे हे आपल कर्तव्य आहे.

**प्रशांत पालांडे :-**

म. महापौर साहेब, या विषयावर मला थोडेसे बोलायचे आहे. काल जेव्हा ही घटना घडली ज्यावेळी त्या शांतीनगर विभागातल्या त्या चार मुलांना ॲडमिट कले तेव्हा आम्ही होतो. डॉ. लाहने साहेब, आमच्या सोबत होते. त्या मुलांना आज डिसचार्ज मिळणार आहे. अजुन त्याचे निदान झालेले नाही. पल्स पोलिओच्या डोसमुळे त्यांना त्रास झाला की, फुड पॉईजनिंग वेगळा काय प्रकार होता. पण आज त्यांना डिसचार्ज मिळणार आहे. ती सगळी मुल गरिब वर्गातील होती. साधारणतः ८-८, ९-९ हजार रूपये भक्ती वेदांत हॉस्पीटलची बिल झालेले आहे. त्या बिलबाबत आपण त्यांना मदत करू शकतो का? सहानुभूतीपुर्वक विचार करून, कारण अजुन निदान व्हायचे बाकी आहे आणि त्यांना आता थोड्या वेळात डिसचार्ज मिळणार आहे. आपण त्याच्यासाठी काय करू शकतो का?

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब, जैसा कल यह जो घटना हुई उसमे हमारे काफी नगरसेवक सन्मा. नगरसेवक अनिल सावंत थे। मॅडम थे। और सही मे जैसा साहब ने बताया की, उसको छुट्टी देनेवाला है, बच्चो की हालत ऐसी नही है की, उनको छुट्टी दे कोई आय.सी.यु. रूम मे भी है। एक दहिसर आय.सी.यु. रूम मे है। और मेरे पास पुरा लिस्ट है। सही मे डॉक्टर बोला की, तुम इधर डिपॉझीट भरोगे तब उसका इलाज किया जाएगा। यह पैसे के लिये हमने डॉ. लहाने साहब को फोन किया था तब उन्होने प्रॉमिस किया था की, यह जो भक्ती वेदांत हॉस्पीटल का बिल है वह हमलोग यहा से बंदोबस्त करेंगे। यह विषय निकला है, तो आप भी इस शहर के सन्मा. महापौर है। और आपको इस विषय मे कुछ मालूम नही ऐसा मालूम पडता है। आपने भी कुछ बात नही निकाली। आपने भी व्हिझीट करना चाहिए, आप इस शहर के महापौर हो। आप भी वहा नही दिखे ऐसी घटना शहर मे घडती है उसपर सही मे ध्यान देना चाहिए।

**मा. महापौर :-**

मै डॉक्टर से भी मिलकर आया, बच्चो से भी मिलकर आया। बच्चो के माता पितासे भी मिलकर आया हू।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

सन्मा. नगरसेवक अपने जो बोला की, मा. महापौर साहब का व्हिजीट होना चाहिए था। उससे मै नितांत ही असहमत हु। बात की जड मे जाना और एकसाथ पुरी घटनाको संभालना ना की एक शो ऑफ करने जाना, वह कोई बहुत जबरदस्ती काम नही है। मा. महापौर साहेब, इस संबंध मे पुरी घटना जो सन्मा. नगरसेवक चंद्रकांत वैती साहब ने बोला वह काफी अच्छा बोला हमे वह घटना के जड मे जाना चाहिए। यह समस्या पोलिओ डोस के ओवर डोस से हुई है या उनकी कुछ बॉडी की इनवॉन्ट प्रॉब्लेम थी उसके वजह से हुआ है। इसका निदान जब तक नही होगा, जब तक हम ऐसी बात करके पोलिओ का हमारा जो कार्यक्रम चलता है। ऐसी बात कहकर हमे जनता मे अविश्वास नही दिखाना चाहिए। यह पोलिओ का कार्यक्रम बहुत महत्वपुर्ण कार्यक्रम है। अगर कहीपर उसका प्रिझर्व्हेशन प्रॉब्लेम हुआ है। वह देनेवाले बराबर नही है। हम वह पुरे सिस्टम को चेक करना चाहिए और मा. महापौर साहब व्हिझीट करने से उस समस्या का हल होनेवाला नही है। मै चाहता हू की, मा. महापौर साहब और हमारे संबंधित अधिकारी नही है। मै चाहता हु की, मा. महापौर देखे की यह समस्या पोलिओ डोस की वजह से हुई है या प्रिझर्व्हेशन से हुआ, या उन बच्चो को कुछ अलग संबंध था। यह पुरा एक बडा मामला है और उसको हमे अच्छे नजेरिया से देखना चाहिए उसमे हमे जरासी सहानुभुती रखनी चाहिए। वह इस वजह से नही की, इसका जनता मे गलत संदेश जाए। यह कार्यकर्ता के प्रति अविश्वास उठना बहुत ही गलत होगा।

**मिलन म्हात्रे :-**

सभागृहामध्ये या विषयावर बरीचशी चर्चा झाली. पण विद्यमान आयुक्तांच्या खुर्चीवर बसलेले अधिकारी यांनी त्यांच्या संभाषणामध्ये कुठेही असे बोललेले ऐकण्यात आलेले नाही की, अमुक अमुक एक असा रिपोर्ट वाचून मला असे वाटते की, ही पल्स पोलिओची जी लस आहे ती व्यवस्थित आहे. त्या पल्स पोलिओच्या ज्या लसी आहेत ज्या सिरींज आहेत त्याच्यावर एक्सपायरी डेट आहे का ते बघा. त्याचा उल्लेख ही आपल्या चौकशीत किंवा कशातही आढळलेला नाही. हा प्रकार आपल्याकडे पहिलाच होत आहे अशातला भाग नाही. मागे पल्स पोलिओची लस पाजल्याने उत्तर प्रदेशमध्ये ते फेल्युअर जावून मुले अपंग झाल्याची छायाचित्रे आम्ही टी.व्ही. वर आणि वर्तमान पत्रात बघीतलेली आहेत. आपल्या बाजुच्या मुंबई महानगरपालिकेत सुद्धा ही पल्स पोलिओची लस फेल्युअर जावून मुलांना पोलिओ झाल्याची बातमी आम्ही वाचलेली आहे आणि आपल्याकडे झालेली ही घटना आहे त्याच्यात आम्हाला कोणावर आरोप प्रत्यारोप किंवा प्रशासनाला बदनाम करण्याचा हेतु बिल्कुल नाही. उद्या जर त्याच्यात माझा मुलगा असतो तर मला सुद्धा सफरिंग करायला लागल असत की, त्याचे साईड इफेक्ट काय होतात? कारण मला अजुन आठवते आपल्या येथे नवघर शाळेमध्ये विषबाधा झाली होती आणि १८ मुलांना उलट्या सुरू झाल्या होत्या. तर के. एम. च्या डॉक्टरांची पुर्ण टीम आम्ही आणली होती. तर त्यांनी सांगितले डॉ. तिवारी म्हणून आले होते. त्यांनी सांगितले की, ही मुले आता जरी चालती फिरती झाली तरी पुढच्या कुठल्याही आणि कितीही वर्षामध्ये ह्या मुलांच्या ब्रेनवर जो वायरलचा त्याचा ह्याच्या ब्रेनवर परिणाम होउ शकतो आणि पुढे कधीही ह्यांना त्या आजाराला सामोरे जावे लागेल. आज प्रश्न असा आहे की, साहेब मी सात वर्षापासुन नगरसेवक आहे. पल्स पोलिओच्या कामात हिरीरीने भाग घेउन आम्ही भरपुर खुप काम केले. आज मला सांगा, तुमचे पल्स पोलिओचे कार्यक्रम होतात. पुर्वी एक पद्धत होती. पल्स पोलिओचा कार्यक्रम सुरू झाला. नविन नविन हे प्रकरण जेव्हा आले त्यावेळेला युनिसेफचे अधिकारी यायचे त्यांच्या गाडीला स्टीकर लावून आणायचे त्यांच्या गाड्यांमध्ये आयकार्ड असायचे व ते अधिकारी ह्याच्यावर कंट्रोल ठेवायचे. आज ह्या ज्या स्कीम आहेत. त्याच्यामध्ये संशय निर्माण झालेला आहे. असेच दुसरे हॅपीटॅटीस बी म्हणून आहे. आपण जर संपुर्ण त्या कार्यक्रमाच्या आतमध्ये गेलात म्हणजे मुळाशी गेलात जसे डॉक्टर बोलले. तर निरनिराळ्या कल्पना येतात. पल्स पोलिओ किंवा हॅपीटॅटीस आहे ते बाहेरच्या देशामध्ये बाद झालेले सगळ तंत्रज्ञान येथे आलेले आहे. काही औषध कंपन्यांची मोनोपोलि पण त्यामध्ये आहे. पेपरला मोठे मोठे लेख आहेत. हे माझे मत नाही. नॅशनल लेवलला आज काही एन.जो. त्याच्यामध्ये सामील आहेत. मी आपल्या मिरा भाईंदरचे बोलत नाही. यु.पी.ला. सुद्धा हा कार्यक्रम फेल गेला आहे त्याचे फोटो आले आहेत. या मुलाला सहा वर्षापुर्वी पल्स पोलिओ पाजले होते त्याचा हा कार्ड आहे. पण या मुलाला आता पोलिओ झालेला आहे. हे जेव्हा आम्ही पेपरला वाचतो तेव्हा आम्ही विचार करतो की, नगरपालिकेची नोटीस आल्यावर आम्ही सगळा कामधंदा टाकतो आणि घराघरामध्ये ती संपुर्णपण डोस कशी पोहचेल? त्या मुलांच्या मुखात कशी पडेल याचा प्रयत्न आम्ही करतो का, तर त्या मुलाचे भवितव्य चांगले रहावे. तो उद्याचा भारतीय नागरिक आहे. या सभागृहात त्यातले एखादे मुल नगरसेवक म्हणून येणार आहे. तुमच्या एखाद्या पोस्टवर एखादे मुल बसणार आहे. हे सगळ बघत असताना हॅपीटॅटीज बी चे सुद्धा तसेच आहे. ती लस पाजल्या नंतर त्याच्यामध्ये तर एवढा मोठा जोक आहे आहे की, गर्व्हमेन्टची ग्रॅन्ड ७५/- रु. लोकांनी लाईनमध्ये उभे रहायचे त्यांना ५०/- रु.मोजायचे. हे जे ५०/- रु. ला लस विकतात. त्यांना गर्व्हमेन्टकडून ७५ रु. ची ग्रॅन्ड मिळते. पल्स ह्यांचे ५०

रु. म्हणजे तेच सव्वाशे रुपये झाले आणि असे असूनसुध्दा ती जी लस आहे ती कितपत योग्य आहे याची काहीच गॅरन्टी नाही आणि जी लस देतात तेव्हा ते देणाऱ्या माणसाला जसे आम्ही मेडीकलच्या दुकानात गेलो. टॅबलेट्स किंवा कुठलेही औषध घेतले तर आपण पहिल्यांदा एक्सपायरी डेट बघतो. आम्ही त्याचे परसेन्टेजही बघतो. काही गोळ्यांमध्ये परसेन्टेज असतात. डॉक्टर एक परसेन्टेज लिहून देतो आणि असतात भलतेच परसेन्टेज. हे सगळं. बघायला लागते. आपण सभागृहाला जी काही माहिती दिली ते मी शांतपणे ऐकत होतो. त्याच्यात असे कुठेही नाही. औषध म्हटले की, पहिली एक्सपायरी डेट आली. सुरुवात तेथून होते. माझे या संभाषणामध्ये सभागृहाला सुचना आहे की, मी परत एकदा सांगतोय कुठल्याही वैद्यकिय अधिकाऱ्याला आपण टारगेट करत नाही. चुक झाली असेल ते ठिक आहे. पण ती सुधारावयची कुठून? कारण त्या सहा बालकांचे भवितव्य काय आहे? आपण त्यांना के.एम. ला घेउन जा. भक्ती वेदांतला ठेवू नका. महापालिकेच्यावतीने त्यांना ॲम्बुलन्समध्ये घाला. अजूनही वेळे गेलेली नाही. के.एम. ला सगळ्यात मोठी लॅब आहे. त्याच्यात सगळे व्हायरल, व्हायरस किंवा जे काही इन्फेक्शन आहे. सगळ्यात मोठी लॅब के.एम. ला आहे. तिथे चेकींग होउ द्या आणि त्याच्यात ते चेकींग होउन त्या मुलांचे भवितव्यातले जे काही शारिरिक संगोपन आहे ते चांगले करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. के.एम. हॉस्पीटल काही जास्त लांब नाही. महापालिकेच्यावतीने जर त्यांना नेले तर त्यांना चांगली ट्रीटमेन्ट मिळेल. आपल्या भारतातून बऱ्याचशा ठिकाणची लोकं के.एम. ला येतात. माझी अशी एक इच्छा आहे की, आपण आरोप प्रत्यारोप करण्यापेक्षा जे काय त्याचे निदान निघणार आहे ते निघू द्या. पण के.एम. मध्ये नेउन आपण त्यांच्याकडून आपण त्यांची जर व्यवस्थित तपासणी केली. आणि के.एम. चे जे मान्यताप्राप्त डॉक्टर आहेत त्यांच्याकडून एक व्यवस्थित मत घेतले तर आपल्या महापालिकेला दुशन लागणार नाही. उगीच आपले अधिकारी कोण त्यांची चुक नसेल तर त्यांच्यावर काय कार्यवाही होणार नाही. या मताचा मी आहे. आणि जे पालक व बालक आहेत त्या दोघांमध्ये वाद राहणार नाही. आणि त्यांनाही डाउट राहणार नाही. उद्या त्यांच्याकडे जर एखादा कोणता प्रसंग ओढवला तर परत महापालिकेच्या नावावर सुध्दा होउ शकते. त्याकरिता एक मात्र पर्याय आहे की, त्यांना सरळ आपण आपल्या महापालिकेच्यावतीने के.एम. हॉस्पीटलला परत एकदा न्या. त्यांची रितसर जी काही टेस्ट घ्यायची आहे ती घ्या. आणि विधीवत त्यांचे काही सर्टीफिकेट्स असतील ती घ्या. म्हणजे मोकळं होईल आणि चौकशीमध्ये जर काही चुकीचे आढळले तर आपण सी.बी.आय. कडे तक्रार करु शकता. कारण हा मोठा मामला आहे. गर्व्हमेन्टच्या करोडोमध्ये त्या ग्रॅन्ट्स असतात. ते त्यांच्या अंडरमध्येच असले पाहिजे. पेपरचा लेख वाचला. त्याच्यामध्ये पूर्णपणे परदेशामध्ये बाद झालेल्या लसी भारतामध्ये खपवल्या जातात. व एक प्रकारे मोठा असा बाउ केला जातो. ह्याच्यातल्या तज्ञ लोकांकडे आपण चर्चा करा. या पल्स पोलिओच्या लस येतात. आपल्या मनामध्ये असते की हे फार चांगले आहे. त्याची थोडी पात्रता किंवा आपण त्याचे जे काय आहे ते आपण चेक करा. गर्व्हमेन्टने पाठवून दिले म्हणून आपण देउन टाकले असे चालत नाही. एक्सपायरी डेट आपल्या वैद्यकिय अधिकाऱ्याने चेक केली का? ते तुमच्या वक्तव्यात कुठेही आलेले नाही. त्यांच्याकडून पहिल्यांदा त्याचा खुलासा होउ द्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सर्व सभागृहाला मी निश्चित माहिती देउ इच्छीतो की, आणि मी माहिती ही दिलेली आहे. पल्स पोलिओ हा राष्ट्रीय कार्यक्रम आहे व तो इंटरनॅशनल कन्सेप्टमधून राबविला जातो आणि भारताला फार अत्यावश्यक आहे आणि कोणालाही अत्यावश्यक कामामध्ये थोडाफार संदर्भ घेउन वेगळी परिस्थिती करण्याचा भारतात फार मोठा पायंडा आहे. आणि आपण त्याचे अनुभव सुध्दा घेतलेले आहे. आपण सर्व जाणकार आहात, वरिष्ठ आहात. मिरा भाईंदर शहरामध्ये सुध्दा पल्स पोलिओ राज्य शासनाच्या सुचनेप्रमाणे राबविण्यात येत आहे. सन्मा. सदस्यांनी या ठिकाणी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. आपल्या शहराच्या नावलौकीकासाठी फारच आवश्यक आहे. प्रशासनाने निश्चितच त्याची सक्त गंभीर दखल घेतलेली आहे. सन्मा. हेल्थ डायरेक्टर श्री. डोके साहेबांनीसुध्दा स्पष्टीकरण टाईम्स ऑफ इंडियाला आज आलेले आहे. प्रशासन या बाबतीत फार गंभीर आहे. राज्य शासनाची टीम आणि डीस्ट्रीकचे पल्स सर्व्हे ऑफीसर जे श्री. जळगावकर साहेब आहेत ते स्वतः आता दवाखान्यात आलेले आहेत आणि कोणतीही चुक किंवा काहीही ह्याच्यामध्ये प्रशासन मान्य करणार नाही. व लोकांमध्ये कोणतेही संशयाचे वातावरण जाईल अशी कुठलीही कार्यवाही केली जाणार नाही. आणि आपण जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. पल्स पोलिओचे जे वॅक्सींग आहे. एक्सपायरीचे वॅक्सींग देण्याची अशी कुठलीही तरतुद नाही. वॅक्सींग देण्याची फार सायंटेफीक पध्दत आहे ते आमच्याकडे सुध्दा स्टोअर केले जात नाही. प्रत्येक प्रोग्रामच्या पहले एक दोन दिवस अगोदर आमच्या हातात दिले जाते. आणि ते वाटप करण्याची जी पध्दत आहे. त्यात प्रत्येका बरोबर आईस क्युब बॉक्स दिला जातो. आणि त्याचे जर कलर कॉम्बीनेशनमध्ये फरक असेल तर, या ठिकाणी डॉ. राजेन्द्र जैन साहेब आहेत. अप्रुव्हल वॅक्सींगमध्ये जर ते किटमध्ये नसेल तर त्याचा कलर बदलतो. ते लगेच तात्काळ लक्षात येते. प्रशासन फार गंभीरतेने आणि फार नाजुक परिस्थितीतून काम करते. असा कुठलाही हयगयाचा विषय नाही. निश्चितच त्या मुलाला विषबाधा झालेली आहे आणि ती विषबाधा कशामुळे झालेली आहे याचे सॅम्पल टेस्टींग झाल्यानंतर निश्चितच बाहेर येईल. पण ते पल्स पोलिओमुळे झालेले नाही हे आपल्याला खात्रीने सांगु इच्छीतो.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या महापालिकेच्या गोडाउनमध्ये किती एक्सपायरी डेटची औषधे आहेत ती आपल्याला माहित आहे का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याकडे पल्स पोलिओचे कोणतेही एक्सपायरी डेटची औषधे नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

गोडाउनमध्ये किती एक्सपायरी डेटची औषधे अस्तित्वात आहे हे आपल्याला माहित आहे का? ते मी बघून आलो आहे. आपण माहिती घ्या. मग मी आपल्याला सांगतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, दो विषय चर्चा के लिए है। पहिले विषय मे श्री. बालाजी खतगांवकर, उपायुक्त (मुख्यालय) साहबने बोला की, वह इंजेक्शन दो दिन पहिले आते है। उसको आईस बॉक्स मे देते है लेकिन मैं अपना अनुभव बता रहा हूँ की, हम जो अधिकारी बैठाते है..

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आप बोलिए लेकिन मैं यह बोलना चाहता हूँ की, मैं डॉक्टर को मिला, डॉक्टरने सुबह यह कहा की ९९टक्के उन्होंने १००टक्के नही कहा यह पोलिओ की वजह से नही और हम इस विषय पर जितनी ज्यादा चर्चा करेंगे उसका एक अलग मॅसेज जाएगा। जो माँ-बाप है वह डरेंगे की, बच्चों को वॅक्सीन देंगे या नही।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मैं आपको सिर्फ सुचना बता रहा हूँ। जो अपने कर्मचारी पल्स पोलिओ के लिए बैठते है जैसे मेरे बिल्डिंग के नीचे बैठते है। श्री. खतगांवकर साहब जो अधिकारी कर्मचारी पल्स पोलिओ के लिए बैठते है त्यांच्याकडे आईस बॉक्स असतो पण ती आईस बॉक्स एक तासाने दोन तासाने त्यांच्याजवळचे संपते तेव्हा त्यांना आजूबाजूच्या परिसरामध्ये त्यांना फिरायला लागते तो आईस आणायला. ह्याच्यावर आपण प्रिकॉशन घ्या कारण मी अनुभव घेतलेला आहे. त्याच्यामुळे ते वॅक्सीन खराब होउ शकते. त्यांना तो अनुभव आहे. जे कर्मचारी बसतात त्यांना कळत नाही की, वॅक्सीन कलर चेंज झाला तर तो खराब झाला आहे याचा त्यांना अनुभव नाही म्हणून हे प्रिकॉशन तुम्ही त्यावेळी घेतले पाहिजे अशी माझी सुचना आहे. तसेच, दुसरा मुद्दा आपण जे बलात्काराबद्दल बोलतात की त्या कर्मचाऱ्यावर कार्यवाही झालेली आहे. त्याच्यात ठेकेदाराला आपण अशी ताकिद दिलेली आहे जे जे कर्मचारी कामावर असेल त्यावेळी त्यांनी महापालिकेचा बिल्ला लावायला पाहिजे. आता जे सफाईचे ठेके दिलेले आहे. त्यांच्या कोणाकडे ही ते सफाईचे काम या ठेकेदाराकडे करतात असे ते नाही. ही बाब गंभीर आहे म्हणून जे कर्मचारी काम करतात ते काम वॉर्ड नं. २० मध्ये करतात आणि फिरतात वॉर्ड नं. २५ मध्ये म्हणून आपण ठेकेदारालाही सक्ती करा की, ह्यानंतर कुठलाही कर्मचारी, सफाई कामगार त्यांच्याकडे बिल्ले् नसतील तर त्यांना नगरसेवक तेथून हाकलून लावेल.

**मा. महापौर :-**

सन्मा. नगरसेवक प्रफुल्ल पाटील साहेब बोला.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. ओमप्रकाश अग्रवाल साहेब, सभागृहाला एकदम माहिती देताना मला असे वाटते की, डॉक्टरांनी जे निष्कर्ष काढले आहेत त्याच्या व्यतिरिक्त कुठलीही माहिती देवू नये. आपण जी माहिती देता त्यामुळे प्रत्येकाला वाटते की, असे झाले असेल. तसे झाले असेल कारण पोलिओ डोस हा ओरल आहे व ओरली घेतल्यामुळे ते पोटात जाणार व पोटात आतल्या विशिष्ट अन्नाच्या संदर्भात जर काय प्रॉब्लेम असेल तर अशा वॉमिट होतात त्याच्यामुळे कुठल्याही डॉक्टरची टेस्ट रिपोर्ट आल्याशिवाय कृपया आपण याची माहिती सुद्धा देवू नका. कारण येथे चर्चा झाल्यानंतर त्याला वेगवेगळ्या दिशा मिळतील. त्याची अपप्रसिद्धी बाहेर होईल म्हणून आजच्या तारखेला या विषयावर आपण पूर्ण माहिती घ्यावी आणि मग पुढच्या सभेच्या याची माहिती द्यावी अशी मी याठिकाणी विनंती करतो.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, गेल्या १९ तारखेला गटराच्यावर झाकण नसल्याकारणाने एक मुलगा तेथून जाताना गटारामध्ये पडून त्याचा मृत्यू झाला व तीन दिवसानंतर त्याचे शव मिळाले. मला वाटते, याच्या अगोदर या सभागृहामध्ये आपण जे कोणी म्हणजे नॅशनल लेव्हलला खेळले, स्टेंट लेव्हलला खेळले त्या सर्वांना काही ना काही येथे मा. महासभेमध्ये त्याची चर्चा झाली व त्यांना सानुग्रह अनुदान मिळावे, मदत व्हावी असे ठरले होते. त्याप्रमाणे मी आजच्या या सभेला विनंती करतो की त्या मुलांचे अशापद्धतीने व्हायला नको. पण ते दुदैवाने झाले. संबंधित जे दोषी होते त्यांच्यावर जी कार्यवाही व्हायला पाहिजे तीही झालेली आहे. त्या मुलाच्या परिवाराला आपल्या आजच्या मा. महासभेने आणि मा. महापौरांनी तुम्ही काहीतरी निर्णय घेवून मदत करावी अशी विनंती करतो.

**मा. महापौर :-**

त्या संदर्भात त्या ठेकेदाराला आम्ही निवेदन केलेले आहे की, जेवढे कॉम्पनसेट करता येईल. खरं म्हणजे झाकण लावली गेली होती व तिथे आजूबाजूला भंगारवाले असल्याकारणाने ती झाकण गेली असावीत. मी स्वतः त्या जागेवर गेलो होतो व ती बॉडी माझ्या उपस्थितीत काढली गेली होती. आजूबाजूमध्ये झाकण आहे व मधल्या भागामध्ये झाकण नाही म्हणजे असे दिसून येते की, तिथे झाकण लागलेले होते.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, आपण गेला होता त्यावेळी झाकण नव्हती.

**मा. महापौर :-**

ॲग्री करतो की त्यावेळी नव्हती. मी कुठे बोलतो की त्यावेळी झाकण होती.

**लक्ष्मण जंगम :-**

आता तुम्ही त्या गटाराचे नव्हे तर मिरा भाईंदरच्या मेन रोडच्या लेफ्ट साईडला बघा तिथे ही झाकण नाही. झाकण नव्हते म्हणून त्या मुलाचा मृत्यू झाला ही गोष्ट खरी आहे.

**मा. महापौर :-**

ती गोष्ट खरी आहे. पण आपण झाकण लावली नाही ती गोष्ट खरी नाही. आपण वारंवार झाकण लावतो. त्याच्यामध्ये चार सळीया निघतात. कचरेवाले सकाळी येतात व झाकण आपटतात. चार सळीया निघाले की दोन किलो झाले की त्यांना ६० रु. मिळतात. त्याच दिवशी श्री. बारकुंड साहेबांना सांगितले की विशेष स्थायी समिती सभेकडून किंवा महासभेकडून असा एक प्रस्ताव सादर करा की, प्रत्येक प्रभाग कार्यालयामध्ये एक झाकण १००की २०० ची झाकण जागेवर ठेवा की, जर कोणीही फोन केला तर इमिजिएट झाकण पाठवा. आपल्याकडे काय होते, त्या साईजचे झाकण उपस्थित नाही. आपण ठेका दिलेला आहे. त्याला पंधरा दिवस लागेल. म्हणून मी श्री. बारकुंड साहेबांना त्याचवेळी निर्देश दिले की ओवल ऑल १५ ते २० लाखाचे मागून घ्या. प्रत्येक प्रभाग कार्यालयामध्ये ५०-५० झाकण ठेवा व यापुढे आपण गटर डिझाईन करणार तेव्हा एकच साईजचे झाकण ठेवा म्हणजे ताबडतोब आपण फोन केला की झाकण लागू शकतो. यापुढे त्याची काळजी घेतलेली आहे आणि ज्याठिकाणी काम चालू आहे त्याचा दोष नाही तरी मी त्याला माणुसकीच्या नात्याने सांगितलेले आहे की, त्याला कॉम्पनसेट करायचे आहे आणि त्या फॅमिलीला सुद्धा मी सांगितले होते की, आपण हे सगळं झाल्यानंतर मला येवून भेटावे. आम्हांला जी मदत करता येईल ती आम्ही नक्की करु सन्मा. नगरसेवक लक्ष्मण जंगम साहेब, आपण त्यांना नक्की मदत करणार आहोत.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर साहेब, काल जी पल्स पोलिओची घटना घडली आहे त्याची पुर्णपणे चौकशी होवून जर त्याच्यात कोणाची चूक आहे तर त्याचा पूर्ण अहवाल मा. महासभेमध्ये आणावा.

**मा. महापौर :-**

चौकशी ही करु व आपण त्याच्यात सुधारणा ही करु.

**एस. ए. खान :-**

दुसऱ्या मुलांना झाले आहे का, तेही आपण बघून घ्या व त्याचा पूर्ण अहवाल पुढच्या मा. महासभेत आणावा.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, त्या ज्या मुलाच्या घरी अशी घटना झाली आहे ती लोक तुम्हांला येवून भेटण्याच्या मागणी करण्याच्या मनस्थितीत नाही. तुम्हांला ते पॉवर आणि तुमचा अधिकार आहे. तुम्ही काय मदत करणार आहे ते जाहिर करा. तुम्ही वस्तूस्थिती पाहिलेली आहे त्याच्यामध्ये ते येतील, तुम्हांला भेटतील व नंतर तुम्ही कराल याची वाट न बघता......

**मा. महापौर :-**

ज्यावेळी ज्या घटना घडतील त्यावेळीच सांगायला पाहिजे का, तुम्ही त्यांना आत्ताच्या आत्ता द्या, त्यांच्या नातेवाईकांना बोलावून मी सांगितलेले आहे की, आपल्याला आमच्याकडून जी काय मदत करता येईल ती मदत नक्कीच तुम्हांला करु. त्यानंतर ठेकेदाराबरोबर संपर्क साधला व त्याला सांगितले की त्या फॅमिलीला......

**लक्ष्मण जंगम :-**

आपण नक्की काय मदत केली आहे ते तिथे सांगितले तर सभागृहाला ही कळेल व आम्हांलाही समजेल.

**मा. महापौर :-**

आम्ही अजून कुठलीही मदत केलेली नाही. पण नक्की मदत करु. यापुढे तुमच्या काय भावना असतील तर त्याबद्दल सभागृहाने निर्णय घ्यावा ते दिले जाईल.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, पोलिओचा विषय बाकी राहिलेला आहे.

**मा. महापौर :-**

ईलाज तर याबाबत सभागृहाने निर्णय करावा.

**प्रशांत पालांडे :-**

त्यांना जी मदत करायची होती.

**मा. महापौर :-**

याचा निर्णय सभागृहाने घ्यावा.

**एस. ए. खान :-**

साहेब, चौकशीचा अहवाल येवू द्या की, कोणाचा काय दोष आहे ते कळू द्या.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपण आता झाकणाचा विषय सांगितला ती अत्यंत चांगली गोष्ट आहे. सगळ्या प्रभाग समितीला शंभर या दोनशे झाकण..

**एस. ए. खान :-**

आपण याच्यावर महानगरपालिकेतर्फे काय कार्यवाही केली का?

**मा. महापौर :-**

सन्मा. नगरसेवक तिथे दोन्ही साईडला झाकण होते आणि फक्त मधलेच झाकण नव्हते.

**एस. ए. खान :-**

तिथला ठेकेदार कोण आहे?

**मा. महापौर :-**

मला ठेकेदार व कंपनीचे नाव वगैरे माहित नाही.

**एस. ए. खान :-**

आपण अधिकाऱ्याला विचारा.

**मा. महापौर :-**

आपण श्री जी कंस्ट्रक्शन कंपनीला ठेका दिलेला आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपण झाकणाबद्दलचा विषय केला तो विषय चांगला आहे. सगळ्या ठिकाणी शंभर झाकण असायला पाहिजे. सगळ्या प्रभाग समितीमध्ये पाहिजे आणि कोणी तक्रार केली तर तिथे झाकण लागायला पाहिजे. हे सगळं आपण करु पण हे करतेवेळी आपण एक खबरदारी घेतली पाहिजे की, एवढी झाकण चोरी होतात, एवढी झाकण तुटतात. त्यांना पकडण्याची कार्यवाही झाली पाहिजे. त्यांना पकडले गेले पाहिजे. ह्याचा कुठे तुमच्या वक्तव्यता उल्लेख नाही. तसे पण व्हायला पाहिजे आणि दुसरी गोष्ट एम.टी.एन.एल. येथ् एक झाकण तुटलेले आहे. युनियन बँकेसमोर लोक त्यांच्यातून तिथे पाणी भरतात. ते झाकण लावले जात नाही. आपल्या या अधिकाऱ्यांमध्ये सर्व अधिकारी तेथून प्रवास करतात त्यांना ते दिसायला पाहिजे व त्यांच्यावर तक्रार करायला पाहिजे. एम.टी.एन.एल. वाल्यांना जावून सांगायला पाहिजे. एवढे मोठे झाकण मेन रस्त्यावर तुटलेले आहे. त्याच्यावर काय कार्यवाही करा. त्या एम.टी.एन.एल वाल्यांना सांगा.

**एस. ए. खान :-**

सन्मा. नगरसेवक शरद पाटील यांनी जे सांगितले आहे तेच मागे मी पण सांगितले होते आणि मी आपल्याला फुकट सल्ला देतो की आपण तक्रार नोंदवा. भाईंदर मिरारोड पोलिस स्टेशनला ओपन सी.आर. असतो. असे जे आपले झाकण चोरी होतात. आपण असे ओपन सी.आर. ठेवणार आणि ते पकडल्यानंतर त्यामध्ये ते आरोपी येणार. मागे पण मी सल्ला दिला होता पण अजूनपर्यंत कार्यवाही होत नाही. आपण अनोळखी इसमाच्या विरोधात तक्रार दाखल करा ना.

**मा. महापौर :-**

बारकुंड साहेब, पोलिस स्टेशनला तक्रार द्या आणि एम.टी.एन.एल. तसेच जेवढे प्रायव्हेट खाजगी कंपनी आहे त्यांना ताबडतोब सांगून झाकण लावून घ्या आणि यापुढे जर त्यांनी झाकण काढले तर त्यांना नोटीस वाजवण्यात यावी.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब सभागृहाच्यावतीने आपण त्याबाबतीत निर्णय द्या.

**मा. महापौर :-**

त्या मुलांचे जे हॉस्पिटलचे बिल आहे त्याबद्दल सभागृहाने निर्णय घ्यावा.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब ३० हजार रुपयाचा प्रश्न आहे आणि अजून निर्णय ही झालेला नाही की, त्यांना हा प्रॉब्लेम कशामुळे झालेला आहे?

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर साहब, अभी जो ढक्कण का विषय चल रहा है। चौपाटी के पास जो रेल्वे पॅरेलल है वहा के सब ढक्कण गायब है।

**मा. महापौर :-**

ठिक है। यह विषय कर रहे है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

दो दिन पहले एक लडका वहा भी मर सकता था। वह तो वहा की पब्लिक ने निकाला और बच गया। अगर यह ढक्कण जल्दी नही लगे तो क्या इसी तरह पुरे शहर मे बच्चो को मारते रहना है क्या?

**मा. महापौर :-**

जल्द से जल्द वह ढक्कण लगाए जाएगे। सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल व प्रशांत पालांडे यांनी त्यांच्या खर्चाबद्दल जे मांडले त्याच्यामध्ये डॉक्टरांचा रिपोर्ट येउ द्या आणि ज्यांनी बिल भरले आहे त्यांना आपण रिपेमेंट करु या पण अहवाल आल्यानंतर.

**मदन उदितनारायण सिंग :-**

डेंग्यू के मरिजों को अभी तक सानुग्रह अनुदान नही दिया गया है। उसको ७-८ महिने हो गए है।

**मा. महापौर :-**

उनके चेक रेडी है और कल सबको बुलानेवाले है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

उनमें से कही लोगोंकी मृत्यू भी हो चूकी है।

**मा. महापौर :-**

८४ फाईल थी उसमे २८ चेक रेडी है। बाकी को ऑलरेडी लेटर इश्यू किया है। किसीके ॲप्लीकेशन नही है। किसीने शिफारस पत्र नही है। किसी मे बिल नही है। इसलिए उनको टाईम दिया गया है और उसकी एक एक कॉपी मैंने जिस जिस नगरसेवक का शिफारस पत्र है उनको देने के लिए कहा है। यह सात के दिन के होंगे और जो २८ चेक रेडी है वह कल सबको मिल जाएगे।

**मदन उदितनारायण सिंग :-**

साहब यह जल्द से जल्द किया जाए।

**प्रशांत पाटील :-**

आता जी मदत आहे त्याच्याकरिता ती मुलं तिथे थांबली आहेत. हे आठ आठ हजार रुपये भरायचे आहेत.

**मा. महापौर :-**

याच्यावर सभागृहाने निर्णय घ्यावा.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब आपण द्या. महापौर निधीतून मदत करावी. आपण सगळ्यांना विचारा.

**प्रफुल्ल पाटील :-**

गेल्या सहा महिन्यापासून डेंग्यूचे जेवढे रुग्ण आहेत त्या डेंग्यूच्या रुग्णांच्या ब्लड टेस्टसाठी सर्टीफिकेटसह नगरसेवकांच्या शिफारसपत्रांसह महानगरपालिकेला असे अनेक प्रकरण दिलेली आहेत. अजून त्या लोकांना कुठल्याही प्रकारची वैदयकीय मदत मिळालेली नाही. हे प्रकरण काल घडले. अजून आपल्याला माहित नाही की, कोणी घडवलय का आपोआप घडलय. त्याच्यात चुकी कोणाची आहे? कोणाला तरी जबाबदारी फिक्स करावी लागेल. जसे डेंग्यूच्या बाबतीत सर्वसाधारणपणे् नगरपालिका फवारणी बरोबर करत नाही म्हणून नगरपालिका जबाबदार म्हणून नगरपालिकेने ते पेमेंट करावे. असे पेमेंट तुमच्या सहा सहा महिन्याच्या मदतीत थांबलेले आहेत. त्याचा अगोदर निर्णय घ्या आणि हा अहवाल आल्यानंतर ज्या लोकांना मदत द्यायची आहे त्यांना जरुर द्या पण अहवाल आल्याशिवाय तुम्ही नक्की कोणाला दोषी धरणार की नाही? हे तर बघा.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. सचिवजी आपण विषयाला सुरुवात करावी.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर साहेब, डॉक्टर साहबने प्रॉमीस किया था की, उधर भक्ती वेदांत का बिल हम लोग भरेंगे। कारण डॉक्टर लहाने साहबने प्रॉमीस किया था की

**मा. महापौर :-**

वह डिसीजर आने के बाद मे भरेंगे।

**चंद्रकांत मोदी :-**

साहब दुसरा विषय यह है की, यह बच्चों का मामला है। सेंट जोसेफ स्कुल के गई मा. महासभा मे प्रॉमीस किया था की वह जो गाडी धोने का गॅरेज गेट के सामने है वह हम बंद करेंगे लेकिन अभी तक कुछ

नही हुआ है। यह भी बच्चो का मामला है। उधर छोटे छोटे बच्चे पढते है। वहा पर सर्व्हिस स्टेशन है। उधर बहूत ऑईल होता है।

**मा. महापौर :-**

सचिवजी विषयाला सुरुवात करा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १७ महापालिकेच्या आस्थापनेवर काम करित असलेल्या संगणक चालक व लघुलेखकांबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब इसका जवाब दो बाद मैं बैठूगा। गई मा. महासभा मे आज पंधरा बीस दिन हुआ है। अतिक्रमण विभाग के ऑफीसने एक दिन में कार्यवाही करनेका प्रॉमीस किया था। लेकिन कुछ नही हुआ। सर्व्हिस स्टेशन के लिए वहापर कितने लोग परेशान है। उधर ऑक्सीजन का भी प्रॉब्लेम है। बच्चो को तकलिफ है। यह बच्चो का विषय है।

**मा. महापौर :-**

उपायुक्त साहेब, आजच्या आज तिथे कार्यवाही करुन घ्या.

**प्रेरणा भाटकर :-**

त्याच्या बाजूला शाळा आहे. शाळेतील मुलांना त्रास होतो.

**मा. महापौर :-**

यह सभा खत्म होने के पहिले कार्यवाही हो जाएगी।

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर साहब अतिक्रमण के विषय पर मा. महासभा मे खास चर्चा करनेके लिए अभी समय देंगे या बादमें कारण अतिक्रमण पर चर्चा होनी जरुरी है।

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलत आहे. प्रकरण क्र. १७ याबद्दल मला ठराव मांडायचा आहे.

**मा. महापौर :-**

मांडा.

(सन्मा. नगरसेवक अनिल सावंत यांनी प्रकरण क्र. १७ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**प्रकरण क्र. १७ :-** महानगरपालिका आस्थापनेवर मानधनावर काम करित असलेल्या संगणकचालक व लघुलेखकांबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. :-**

महानगरपालिका आस्थापनेवर मानधनावर काम करित असलेले संगणक चालक व लघुलेखक यांना मा. महासभा दि. २०/०६/२००६ रोजी ठराव क्र. २९ अन्वये ठेका पद्धतीने काम करणेस मान्यता दिली होती. सदर कर्मचाऱ्यांची मुदत दि. ३१ डिसेंबर २००७ रोजी संपत आहे. आस्थापनेवर मोठ्या प्रमाणात नियुक्त्या व पदोन्नत्या झाले आहेत. त्यामुळे आस्थापना खर्च ४२ टक्केवर गेला आहे. आस्थापनेवर संगणक चालक व लघुलेखक ही पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव मान्य करता येणार नाही. या पदावरती बाह्य मार्गाने काम करून घेणे अपेक्षित आहे. (आउट सोर्सिंग) अशा अशायाचे पत्र क्र. मि.भा.न.प.-११०६/१३९०/नवि-२८/नगरविकास विभाग दि. ०९/११/२००६ रोजी कक्ष अधिकाऱ्यामार्फत प्राप्त झाले. सदर संगणक चालक व लघुलेखक यांच्या कामाबद्दल काही शंका घेण्यात आलेला आहेत. यांच्या कामाची क्षमता व शैक्षणिक पात्रता व त्यांची जबाबदारी यांची माहिती घेणेसाठी महापालिकेच्या सभागृहातील विविध पक्षाचे सदस्यांची एक समिती मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ बनविण्यांत यावी. ही समिती एक आठवडयात गठित करण्यांत यावी. त्या समितीचा अहवाल प्राप्त झाले नंतर पुढील महासभेत या प्रकरणी निर्णय होईपर्यंत मानधनावर काम करीत असलेल्या संगणक चालक व लघुलेखक यांना मुदतवाढ देत आहे. असा मी ठराव मांडीत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

याच्यावर माझी एक सुचना आहे की, जी समिती गठीत करण्यांत यावी ती समिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे ३१ अन्वये बनविण्यांत यावी आणि विशेष फक्त याच कामाची जबाबदारी त्यांच्यावर देण्यांत यावी. ह्या समितीने कामाची संपूर्ण चौकशी केल्यानंतर त्याचा अहवाल पुन्हा. मा. महासभेसमोर येईल आणि महासभा त्याच्यानंतर फायनल करेल. तोपर्यंत ह्यांना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

याच्यात मी एकच सुचना देतो की हे ठेक्यावर नसुन मानधनावर आहेत. मानधनावर मुदतवाढ.

**प्रफुल्ल पाटील :-**

ती मुदत मानधनावरचीच आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

त्या मुदतवाढीचा कालावधी निश्चित करा. हे सगळं करण्याकरिता तीन महिने, सहा महिने, वर्ष, दोन महिने, एक दिवस, दोन दिवस काहीतरी कालावधी फिक्स करा. सभागृहामध्ये तो रेकॉर्डला येउ द्या.

**चंद्रकांत वैती :-**

या विषयाबाबत महापालिकेने असे काही धोरण निश्चित केले आहे का? मला अशी माहिती मिळते की त्यांना दोन महिन्याची मुदतवाढ दिली आहे तर याबाबत महापालिकेने काय धोरण निश्चित केले आहे याची माहिती मिळावी.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

हा विषय मा. महासभेमध्ये प्रलंबित होता. आज त्याच्यावर चर्चा होत आहे. कदाचित याला निर्णय घ्यायला वेळ लागेल म्हणून आणि त्यांची ३१ डिसेंबरची मुदत संपत असल्यामुळे कार्यरत आयुक्तांकडून सदर प्रस्तावास जे काही मानधनावर आहेत त्यांना दोन महिन्याची मुदत आम्ही प्रशासकीय लेवलवर दिलेली आहे. जर आज त्याठिकाणी त्याच्यात वाढ होत असेल तर ते विचारात घेउन कार्यवाही होईल.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे प्रशासकीय दोन महिन्याची मुदतवाढ दिली. आता हा जो ठराव आणलेला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रशासकीय मुदत दिली ही अंतर्गत बाब आहे. त्याच्यावर कुठेही कायदेशीर स्वरुप दिलेले नाही म्हणून यासभेने आज जो ठराव केलेला आहे त्याच्यामध्ये मुदतवाढ दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्या मुदतवाढीचा कालावधी आपण आमच्यासमोर पटलावर आणा.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्याच्यामध्ये जास्तीत जास्त जेवढा आहे तेवढा कालावधी कारण ही शेवटची अंतिम मुदत आहे. आपण एकदा मुदत दिलेली आहे व ही दुसऱ्यांदा मुदत देत आहोत आणि आपल्याला फक्त दोनच वेळा मुदतवाढ देता येते.

**प्रभात पाटील :-**

एका वर्षाची मुदतवाढ देण्यात यावी.

**चंद्रकांत वैती :-**

याबाबतीमध्ये सन्मा. नगरसेवक प्रभात (ताई) पाटील आपण जो ठराव पाठवलेला होता. संपूर्ण महासभेतील सगळ्यांचे यामध्ये एकमत आहे की, या संगणकचालकांनी या महापालिकेला सेवा दिलेली आहे त्यांना कामाची चांगली जाणीव आहे तर त्यांना आपल्या येथे आस्थापनेवर घेण्याबाबतचा आपण एक ठराव केला होता. परंतु, महापालिकेने ही बाब राज्य शासनाच्या निदर्शनात आणल्या नंतर राज्यशासनाकडून दोन शासन निर्णय आणलेले आहेत त्या शासन निर्णयाचे वाचन मी सभागृहात करु इच्छितोय. महाराष्ट्र शासन क्र. मि.भा.म.पा./११०६/१३९०/नवि-२८ नगरविकास विभाग मुंबई, मंत्रालय. दि. २९/९/२००६ आयुक्तांना शासनाने पत्र दिलेले आहे. प्रति आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका जिल्हा ठाणे, विषय मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मानधनावर संगणक चालक/लघुलेखक नेमणेबाबत. संदर्भ- आपले क्र. मनपा/आस्था/४८/७९२/०६-०७ दि. २६/७/०६ चे पत्र. महोदय, उपरोक्त विषयावरील आपल्या संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मानधन तत्वावर संगणक चालक नेमण्याबाबत मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील संगणक चालक/लघुलेखकांची पद निर्माण करण्याबाबतची आपले प्रस्ताव मान्य करता, येणार नाही. संगणकचालकाचे काम मंजूर पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांमार्फत किंवा बाह्य मार्गाने (थ्रु आउटसोर्सिंग) करुन घेण्यात अपेक्षित आहे. तरी याबाबत महापालिकेने आवश्यकतेप्रमाणे निर्णय घ्यावा.

पुन्हा याच आशयाचे दुसरे पत्र दि. ९/११/२००६ ला पाठवलेले आहे आणि यात देखिल असेच लिहिलेले आहे की, याबाबत आयुक्त मिरा भाईंदर महापालिका यांनी निर्णय घेणे अपेक्षित आहे. दोन्ही विषयामध्ये स्पष्ट संकेत आहेत. संपूर्ण सभागृहाची भावना आहे की, हे कर्मचारी आपल्या आस्थापनेवर यायला पाहिजे होते आणि या कर्मचाऱ्यांना डालवून पहिल्या सभेमध्ये खूप वादंग झाला होता. त्याला असे कारण होते की सन्मा. नगरसेविका प्रभात (ताई) पाटील यांनी आपण यांना कायम स्वरूपी नेमणुक करावी आणि त्याला अनुसरून अशा सगळ्या सभागृहाच्या भावना होत्या. परंतु, तत्कालिन आयुक्तांनी ही बाब जेव्हा राज्य शासनाकडे पाठवली तेव्हा राज्य शासनाकडून हा विषय त्यांच्या मताप्रमाणे करुन आणला आहे आणि ह्या एवढया बाबीसाठीच त्यांनी मागच्या लक्षदीपमध्ये ९० जागा संगणक चालकांच्या निश्चित केल्या होत्या आणि जाहिरात काढली होती ज्या जाहिरातीला सगळ्यांचा आक्षेप होता.आता शासन निर्णय असा आलेला आहे म्हणून जो ठराव केलेला आहे त्या ठरावामध्ये स्पष्ट लिहिलेले आहे की सर्व नगरसेवकांमध्ये सर्व राजकीय

पक्षांचा एक एक प्रतिनिधी यांची समिती गठीत करावी. ज्यांची कार्यक्षमता आहे ज्यांची शैक्षणिक पात्रता आणि अर्हता आहे ती निश्चित केली जावी आणि त्यानंतर राज्य शासनाचे निर्णय आहे की, महासभेने निर्णय घ्यावा. मग जेव्हा हे धोरण सर्वानुमते येईल त्यावेळेला मा. महासभा पुन्हा ह्यांच्यासाठी शासनाकडे हा ठराव मंजूरीसाठी पाठवू शकते असे माझे मत आहे.

**प्रभात पाटील :-**

समितीचे एकंदरीत स्त्यूत्य आहे की त्यांची क्षमता देखिल आपण पडताळायला पाहिजे. मुळात हा ठराव झाला दि. २६/६/२००६ रोजी तेव्हा आपण ७५ संगणक चालक व लघुलेखक पकडून त्यात वाढ होत होवून आज ९० च्या घरात गेलेली आहे. ती वाढ कशी झाली आणि काय झाले हे आता या महापालिकेत लपून राहिलेले नाही. परंतु, ठिक आहे ते ७५ होते तरीही आपले होते आणि आज ते ९० आहेत तरीही ते आपले आहेत आणि आपले आहेत म्हणण्यापेक्षा आपल्या महापालिकेच्या प्रशासनामध्ये त्यांची अत्यंत निकडीची गरज आहे. त्याशिवाय खतगांवकर साहेबांनी त्यांना दोन महिन्यांची मुदतवाढ दिलेली नाही. कारण आपले प्रशासनसुद्धा चालले पाहिजे. हे आमच्या बरोबर प्रशासनसुद्धा जाणते की, त्यांची आपल्याला गरज आहे. एकंदरीत आता तो ठराव मांडला गेला की, सर्वपक्षीय समिती स्थापन करावी आणि त्यांच्या क्षमता जाणून घ्याव्यात. ही एकंदरीत चांगली बाब आहे. परंतु माझे असे म्हणणे आहे की त्यांना जी मुदतवाढ आहे ती नेमकी फिक्स केलेली नाही तर त्यांना या वर्षभरामध्ये ह्या कमिटीने काम करावे व समितीने आपला अहवाल सादर करावा आणि वर्षभरासाठी त्यांना मुदतवाढ द्यावी.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांच्या ठरावामध्ये असे म्हणणे आहे की, ही समिती जिथंपर्यंत निर्णय घेत नाही तिथपर्यंत मुदतवाढ त्यांनतर मा. महासभेने परत त्याच्यावर......

**प्रभात पाटील :-**

हा विषय पुन्हा आणायचा. मी आणखीन म्हणते की मा. महासभेने विषय आणताना श्री. खतगांवकर साहेब आणि पुढे जर श्री. परब असतील तर त्यांच्यासाठी सांगते की मागच्या वेळेला जो रोष्टर भरण्याचा प्रकार होता त्यामध्ये जास्तीचे जर तुम्हांला भरायचे आहेत किंवा रोष्टर पूर्ण करायचे असेल तर ह्या कर्मचाऱ्यांना ठेवून तुमच्या रोष्टरच्या मागण्या पण तुम्ही द्या. रोष्टर पूर्ण आहे.

**प्रभात पाटील :-**

रोष्टर पूर्ण असेल तर प्रश्नच नाही परंतु हे जे...

**मा. महापौर :-**

आपल्याकडे समितीचा पूर्ण अहवाल येईलच.

**प्रभात पाटील :-**

तर ह्याच कर्मचाऱ्यांना त्यांच्या क्षमतेनुसार पुन्हा एकदा त्या पदावर रुजू करुन घ्यावे. कोणावरही अन्याय अत्याचार होउ नये. एकंदर त्या सभागृहाची अशी भावना आहे आणि ह्या समितीचे काम पूर्ण होईपर्यंत त्यांना कामावर कार्यरत ठेवावे.

**मिलन म्हात्रे :-**

तीन महिन्याची मुदतवाढ द्यावी. आपण दोन महिन्याची मुदत दिली होती तर आपण तीन महिन्यामध्ये त्या कमिटीने लवकरात लवकर निर्णय घ्यावा. उगीच आम्ही मुदत दिली तर १० वर्षाची पण देवू पण त्याला काय अर्थ नाही. तीन महिन्यामध्ये आपण डिसीजन घ्यावे. माझे स्वतःचे मत हे आहे ते मी मांडले आहे. कमिटीमध्ये आम्ही उद्या मेंबर असणार आहोत. आम्हीच सांगायचे की कितीही मुदतवाढ द्या. हे इमपॉसिबल आहे.

**मा. महापौर :-**

कमिटीने मुदतवाढ द्यायची नाही. अहवाल सादर करायचा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कमिटीने जो काय निर्णय घ्यायचा आहे त्याला तीन महिन्याचा टाईमबॉन्ड लिमिट ठेवा. त्या कमिटीने तीन महिन्यामध्ये उरकून द्यायचे आणि तेवढयापुरते त्यांना मुदतवाढ द्या अशी माझी सुचना आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहब यह जो ठराव किया गया उसमें आदरणीय प्रफुल्ल पाटील इनकी जो सुचना थी उसका एकबार फिरसे वाचन किया जाए।

**प्रफुल्ल पाटील :-**

मी अशी सुचना केलेली आहे की या ठरावामध्ये जी विशेष समिती नेमायची आहे ती विशेष समिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे ३१ अन्वये ती समिती गठीत करण्यांत यावी. त्या समितीमध्ये प्रत्येक राष्ट्रीय पक्षाचा राष्ट्रीय किंवा प्रादेशिक म्हणा. म्हणजे सगळ्या पक्षांचा एक एक प्रतिनिधी असावा जो नगरसेवक असेल.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील आपली सुचना योग्य आहे. परंतु, आपण जर ३१ नियम वाचून बघितला तर तो या गोष्टीला लागू होतो का? एवढी मला माहिती द्या. मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ३१ बाबत सन्मा. नगरसेवकांनी जीसुचना मांडली की ह्या संगणकचालक किंवा नोकरभरतीकरिता लागू होणार आहे का? याची माहिती आपण आम्हांला द्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

तदर्थ समितीची जी नेमणुक आहे ही ३१ अन्वयेच होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

ही समिती फार वेळ राहणार नाही फक्त त्यांनी त्या विषयापुरते बोलले होते बोलताना त्यांनी या विषयापुरते बोलले आहे. सर्व प्रशासनाचे जे नियम आहेत त्याचा अभ्यास होईल. काम करतात त्यांची अर्हता तपासली जाईल. आणि तो अहवाल मा. महासभेला आयुक्तांमार्फत देतील.

**प्रफुल्ल पाटील :-**

अशी ही समिती नेमल्यानंतर या समितीने सहा महिन्याच्या आतमध्ये किंवा अगोदर मानधनावर जी लोक काम करतात त्यांना आपण ऑलरेडी एक मुदत दिलेली आहे आपण एकच दिलेली आहे. मी माहिती घेतली, सगळ्यात पहिले १६ फेब्रुवारी २००४ ला ठेकापद्धतीने सहा महिन्याकरिता आले होते. त्याच्यानंतर १ ऑगस्ट २००४ पासून तो ठेका संपला व १ वर्ष ठेका आला त्यांनी पाच महिन्यापर्यंत ठेक्यामध्ये काम केले. त्यानंतर १ जानेवारी २००६ ते डिसेंबर २००६ पर्यंत दुसरा ठेका मागवला त्याच्यामध्ये त्यांनी मधल्या काळामध्ये दि. २१/६/२००६ रोजी ठेक्यावर असलेल्या ७१ संगणक चालकांना आस्थापनेवार घेण्याचा ठराव मंजूर झाला. आस्थापनेवर म्हणजे मानधन तत्वावर आणि त्यांच्यासाठी दोन महिन्याची मुदतवाढ देण्यात आली चार नंबरमध्ये कुठली तर निविदा जी मागवली तेव्हा दोन महिन्याची मुदतवाढ दिली पण त्यांना महासभेने ठराव क्र. २९ अन्वये आस्थापनेवर जेव्हा घेतले तेव्हा आस्थापनेनुसार ज्यांचे सहा महिने पूर्ण झाले त्या स्थायी समितीने ठराव क्र. २०१ नुसार ३ ऑगस्ट ०७ ते दि. ३१/१२/२००७ पर्यंत मुदत दिली. स्थायी समिती दि. ५/६/२००७ ला झाली त्याच्यामध्ये असा ठराव केला की ३ ऑगस्टला त्यांची मुदत संपते ती ३ ऑगस्टची मुदत पुढे ३१/१२/०७ पर्यंत करावी म्हणजे ही पहिली मुदत दिली. ह्याच्यापूर्वी मुदत दिली ती ते ठेकापद्धतीने होते म्हणून मुदत दिली. ते ठेकापद्धती संपून ते मानधनावर आले. मानधनावर आल्यानंतर ह्यांची महिली मुदतवाढ ३ ऑगस्टला संपत होती. तेव्हा पहिली मुदतवाढ दि. ३१/१२/२००७ पर्यंत दिली आता दुसरी मुदतवाढ ही आपल्याला सहा महिन्याकरिता द्यावी लागेल कारण जास्तीत जास्त सहा महिने मुदतवाढ देवू शकतो व जास्तीत जास्त दोन मुदतवाढ देवू शकतो. दोन मुदतवाढीपेक्षा जास्त देवू शकत नाही म्हणून सहा महिन्याकरिता ही मुदतवाढ द्यावी लागेल आणि कमिटीचे जे काम आहे. कार्यकक्षा आहे ती स्पेशल फक्त या विषयावर त्यांनी जेवढे संगणक चालक व लघुलेखक आहेत त्यांची शैक्षणिक पात्रता अर्हता बाकी सगळ्या गोष्टी तपासून त्यांनी त्याचा अहवाल सादर करायचा ते दोन महिन्याच्या आत जर अहवालामध्ये काही गोष्टी सापडल्या तर त्याच्यावर आपण निर्णय घेवू शकतो आणि सहा महिन्यापर्यंत ह्यांची मुदतवाढ व्हावी अशी मी उपसुचना मांडली होती कारण ४५ चा नियम ७ प्रमाणे जास्तीत जास्त ६ महिन्यापर्यंत आम्हांला मुदतवाढ देता येते.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर मा. प्रफुल्ल पाटील साहेबांनी मांडलेली सुचना समाविष्ट करुन ठराव कायम करण्यांत येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हा ठराव वाचून कायम करा. सचिवानीं या ठरावाचे वाचन केले पाहिजे त्यानंतर आपण कायम करा.

**मा. महापौर :-**

सचिवजी ठराव वाचावा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १७ करिता आलेल्या ठरावाचे मी वाचन करत आहे.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १७ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**प्रकरण क्र. १७ :-** महानगरपालिका आस्थापनेवर मानधनावर काम करित असलेल्या संगणकचालक व लघुलेखकांबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. १७ :-**

महानगरपालिका आस्थापनेवर मानधनावर काम करित असलेले संगणक चालक व लघुलेखक यांना मा. महासभा दि. २०/०६/२००६ रोजी ठराव क्र. २९ अन्वये ठेका पद्धतीने काम करणेस मान्यता दिली होती. सदर कर्मचाऱ्यांची मुदत दि. ३१ डिसेंबर २००७ रोजी संपत आहे. आस्थापनेवर मोठ्या प्रमाणात नियुक्त्या व पदोन्नत्या झाले आहेत. त्यामुळे आस्थापना खर्च ४२ टक्केवर गेला आहे. आस्थापनेवर संगणक चालक व लघुलेखक ही पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव मान्य करता येणार नाही. या पदावरती बाह्य मार्गाने काम करून

घेणे अपेक्षित आहे. (आउट सोर्सिंग) अशा अशायाचे पत्र क्र. मि.भा.न.प.-११०६/१३९०/नवि-२८/नगरविकास विभाग दि. ०९/११/२००६ रोजी कक्ष अधिकाऱ्यामार्फत प्राप्त झाले. सदर संगणक चालक व लघुलेखक यांच्या कामाबद्दल काही शंका घेण्यात आलेला आहेत. यांच्या कामाची क्षमता व शैक्षणिक पात्रता व त्यांची जबाबदारी यांची माहिती घेणेसाठी महापालिकेच्या सभागृहातील विविध पक्षाचे सदस्यांची एक समिती मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ बनविण्यांत यावी. ही समिती एक आठवडयात गठित करण्यांत यावी. त्या समितीचा अहवाल प्राप्त झाले नंतर पुढील महासभेत या प्रकरणी निर्णय होईपर्यंत मानधनावर काम करीत असलेल्या संगणक चालक व लघुलेखक यांना मुदतवाढ देत आहे. असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- प्रेमनाथ पाटील**

**सदर ठरावात सुचक :- श्री. प्रफुल्ल पाटील व अनुमोदक :- सौ. प्रभात पाटील यांनी खालील प्रमाणे सुचना केली.**

वरील प्रकरणामध्ये सादर झालेल्या ठरावास अनुसरुन खालीलप्रमाणे सुचना मांडण्यात येत आहे. ठरावानुसार गठित करावयाची समिती ही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ अन्वये फक्त प्रकरणातील विषयापुरतीच करण्यांत यावी. सदर प्रकरणातील विषयानुसार मानधनावर कार्यरत असलेल्या संगणक चालक व लघुलेखक यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५(७) अन्वये ६ महिन्याकरिता मुदतवाढ देण्यात येत आहे.

वरील प्रकरणी गठित केलेली कमिटीचे कामकाज फक्त वरील विषयापुरतीच मर्यादित असून सदर समितीने आपला अहवाल ३ महिन्यांच्या आत महासभेस देण्यात यावा अशी मी सुचना मांडत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

मी ठराव वाचलेला आहे त्यामुळे कायम झालेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब माझी एक सुचना आहे. आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये गेल्या ९ वर्षापासून मिरा भाईंदर कला-क्रिडा महोत्सव समितीतर्फे मिरा भाईंदर कला-क्रिडा हा महोत्सव साजरा केला जातो आणि आता हे १० वे वर्ष आहे. प्रत्येकवेळी या संस्थेने अनुदानासाठी मागणी केलेली आहे. परंतू संस्थेला अनुदान एकदाच मिळाले त्यांनतर कधीही मिळाले नाही आज मिरा भाईंदर क्षेत्रातील विद्यार्थी आणि नागरिक याच्यात १५ ते १६ हजाराच्या संख्येने या स्पर्धेत भाग घेतात. या महोत्सवात एकूण २३ स्पर्धेचे आयोजन केले जाते हे आयोजन करताना हा खर्च मोठया प्रमाणात होतो कमीत कमी ५ ते ७ लाखापर्यंत हा खर्च आहे. हा खर्च करताना त्यांना एकूण पाच दिवस या महोत्सवाचे आयोजन करावे लागते. आपणाकडे मी विनंती केलेली होती की या संस्थेला अनुदान देणेबाबत यावे परंतु मधल्या काळात तहकूब सभा झाल्याकारणाने तो विषय या विषयपटलावर अद्यापपर्यंत आलेला नाही. तरी माझी मा. महापौरांना विनंती आहे की अशा बऱ्याच नगरसेवकांनी आपल्याकडे अनुदानासाठी मागणी केलेली आहे तरी या समितीला अनुदान देण्यासाठी आपण आणि मा. महासभेने ह्याचा विचार करावा. आपण एका किंग बॉक्सरला अगर स्वतंत्र अनुदान देवू शकत असू तर ही संस्था अनेक कलाकार, क्रिडापटू घडवते याही संस्थेला मोठे करण्यासाठी आपल्या महापालिकेचे योगदान असणे गरजेचे आहे तरी याबाबत आपण विचार करावा आणि अनुदान घोषित करावे.

**मा. महापौर :-**

सन्मा. नगरसेवक शशिकांत भोईर साहेबांनी मिरा भाईंदर कला क्रिडा महोत्सव समितीसाठी, सन्मा. नगरसेवक शशिकांत भोईर उपमहापौर सन्मा. स्टिवनजी मेन्डोंसा, सन्मा नगरसेवक ध्रुवकिशोर पाटीलजी अन्य नगरसेवकांनी या मिरा भाईंदर कला क्रिडा समितीला आपल्या महापालिकेतर्फे मदत देण्यासाठी, एकूण खर्च ५ ते ६ लाख रुपये दाखवलेले आहे तर यापुढे मा. महासभेने त्यांना किती मदत द्यायची किंवा नाही. याचा निर्णय आपण सर्वांनी घ्यावा.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब अनुदान देण्यासाठी अशा अनेक संस्था मिरा भाईंदर शहरामध्ये कार्यरत आहेत. पण पात्रता काय? अनुदान कोणाला द्यायचे?

**शशिकांत भोईर :-**

आज ही समिती खंड न पडता सातत्याने १० च्या वर्षी पदापर्ण करत आहे आणि १० व्या वर्षाचा महोत्सव कालच उद्घाटन होवून सुरु झालेला आहे. आपणांस हे समोर चित्र दिसेल की, या संस्थेने किती

क्रिडापट्टू घडवलेले आहे आणि या व्यासपिठावर किती कलाकार घडवलेले आहे याचा ही आपण अनुभव घेउ शकता.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेबांच्या परवागीने बोलत आहे की साहेब हा जो महोत्सव आहे तो खरोखरच आपल्या शहराकरिता भूषणावह आहे आणि या शहराचे या क्रिडा महोत्सवापाई अनेक पट्टू राज्यस्तरीय देखिल गेलेले आहेत. हे आपल्या शहराचे शान आहे. आज त्यांच्या मागे यांचा काही उद्देश नाही किंवा काही नाही. तर कमीत कमी तरी पाच लाख रुपये यांना द्यावे. हा खर्च खरोखरचा आहे त्यांनी जे मागितलेले ते त्यांना द्यावे अशी सभागृहाची आणि आमची भावना आहे. हे चांगले काम आहे त्याकरिता आवश्यक तीन लाख रुपये द्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, संस्थेच्या मदतीकरिता काही नगरसेवकांनी आपल्याकडे पत्रव्यवहार केलेला आहे. सर्वप्रथम मी प्रशासनाला आणि आपल्याला विनंती करतो की माझ्या कुठल्या संस्थेला विरोध नाही. पण आपण सर्वस्वी हे सभागृहासमोर ठेवले आहे की सभागृहाने निर्णय घ्यावा म्हणजे योगाने मी त्याच्यामध्ये एक पार्ट आलो हे माझे वैयक्तिक मत मी येथे नोंदवतोय गेल्यावर्षी ३१ मार्चच्या वेळेला अशा जवळ जवळ २५ ते ३० संस्थांनी मागणी केलेली आहे आणि मागणी तीन करोड रुपयाच्यावर होती. सगळ्या संस्थानी कोणी १० मागितले कोणी ५ मागितले कोणी २ मागितले कोणी १ मागितले कोणी ५० मागितले त्यावेळैला त्याला ऑडीटच्या संपूर्णपणे ऑब्जेक्शन आले होते आणि आपल्या बाजूची जी महापालिका आहे ठाणे महानगरपालिकेमध्ये २५ हजार रुपये फक्त एका संस्थेने मागितले होते. त्याच्यावर हायकोर्टाचा एक आदेश आलेला आहे की असे तुम्हांला देता येणार नाही. या सर्वांचे अवलोकन करा. सभागृहातला एक सदस्य या नात्याने मी माझे मत मांडले आहे. त्यास जी काय क्रिडा संस्था आहे त्यास माझा विरोध नाही पण उगीच त्या पार्टमध्ये आम्ही इनवॉल नको म्हणून मी माझे मत मांडत आहे. प्रशासनाने त्या सगळ्याचा अभ्यास करावा आणि मग डिक्लर करावे.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर महाशय, हा विषय काही पहिल्यांदा आला आहे की, कोणाला अनुदान देण्याचा अशातला भाग नाही. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांनी हा विषय सांगितला. मागे शैक्षणिक संस्थांना अनुदान देण्याचा विषय आलेला तेव्हा महापालिकेने याविषयी प्रशासनाने आपले म्हणणे सादर केले होते. ते म्हणणे प्रशासनाने आधी सादर करावे की देता येते की नाही. मग पुढची चर्चा करावी नाहीतर उगीच सदस्यांना तुम्ही भांडत ठेवणार त्याच्यापेक्षा ऑडीटचा त्याच्यावर शेरा होता की असे अनुदान देता येते की नाही याबाबत प्रशासनाने पहिल्यांदा खुलासा करावा.

**मिलन म्हात्रे :-**

मी हे सांगू इच्छितो की शैक्षणिक नाही. शैक्षणिक आणि सामाजिक...

**चंद्रकांत वैती :-**

अनेक संस्थांनी मागितलेले आहे. शैक्षणिक संस्था सामाजिक संस्था कितीतरी संस्थांनी अनुदान मागितलेले होते.

**मिलन म्हात्रे :-**

ज्याला चॅरिटी कमिशनर परवानगी देतो, त्याच्यामध्ये सामाजिक शैक्षणिक आणि क्रिडा या सर्वांना चॅरिटी कमिशनर ठाणे हे परवानगी देतात. अशा संस्थांनी आपल्याकडे मागणी केली. त्याचे रजिस्टर एकाच आयुक्तांकडे होते आणि ते धर्मदाय आयुक्तांकडे होते. कृपा करुन त्याचे नॉर्म्स बघा. घाईघाईत निर्णय घेउ नका आणि आपण सर्व विचार करुन निर्णय घ्याल त्याला आम्ही मान्यता देउ.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब आमचा ही कोणत्या संस्थेला देण्याबाबत काय व्यक्तिगत विरोध नाही. पण गोष्ट तुमच्याही लक्षात असेल. तुमच्या दप्तरामध्ये महापौर फंडातून कॅन्सर पेशंट, हार्ट पेशंट यांचे तुमच्याजवळ अर्ज आहेत ते तुम्ही सहानुभूतीपूर्वक या सभागृहामध्ये घेतले पाहिजे होते. पण तुम्ही ते घेतले नाही. आज जेव्हा कुठल्याही नगरसेवकाला माहित नसताना मध्येच असे विषय येतात आणि त्यावेळी आमच्या नगरसेवकांनी कोणी विरोध करावा किंवा कोणी करु नये ही समस्या उत्पन्न होते. म्हणून मा. महापौर साहेबांना विनंती आहे की, असे विषय जेव्हा येतील तुमच्याकडे डायरेक्ट काही लोकांनी अर्ज केलेला आहे. कॅन्सर, हार्टचे पेशंट आहेत त्यांचा विषय ही तुम्ही आपल्या अधिकारामध्ये पटलावर घेत जा. नाहीतर, जे खरोखर गरजू आहेत. कॅन्सर पेशंट हा जास्त दिवस जगत नाही. अशा लोकांचे अर्ज आपल्याकडे आहेत. हार्ट पेशंटचे आहे. अशा लोकांना पण सहानुभूती दाखवून आपण असे विषय आणा. सभागृहात कोणी कुठलाही विषय मध्ये आणावा आणि त्याच्यावर निर्णय घ्यावा तर यापूर्वी पण मा. महासभेत एका खेळाडूला अनुदान देण्यासाठी मध्येच विषय आला आणि आपण त्यांना पैसे देवून मोकळे झालो ही गोष्ट बरोबर नाही.

**मिलन म्हात्रे :-**

श्री. खतगांवकर साहेब, आणखीन एक सुचना आहे. त्यावेळेला माझा पत्रव्यवहार झाला होता. मागच्या वेळेला ज्या मागणीदार संस्था होत्या त्याचे संस्थापक आजी आणि माजी नगरसेवक आहेत म्हणून त्याच्यावर ऑब्जेक्शन आले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

शहरामध्ये शैक्षणिक आणि इतर नोंदणीकृत संस्था असतील आणि त्यांनी शैक्षणिक व इतर विद्यार्थीकरिता सामाजिक काम होत असेल. शासन परिपत्रकाप्रमाणे एका वर्षामध्ये ३० लाखापर्यंतचे अनुदान महापालिकेला देता येतात. त्याचे निकष निश्चित करुन त्या अनुषंगाने आलेली मागणी विचारात घेवून त्यावर महापालिकेला निर्णय करता येतो. पण आजची सभा ही तहकूब सभा आहे. याबाबत सन्मा. सदस्यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे आणि आपल्याकडे लेखीसुद्धा प्रस्ताव आलेला आहे. प्रशासनाने यावर सविस्तर अभिप्राय घेउन मा. महासभेसमोर हा विषय सादर केला जाईल.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब माझी सभागृहाला ही विनंती आहे की ज्यावेळेस किंग बॉक्सर त्याने कोणाच्या तरी शिफारसीने अनुदानाची मागणी केली. आपण काही विचार न करता, सभागृहाच्या त्यावेळेस विरोध होता की एका व्यक्तीला अनुदान किती वेळ द्यायचे. त्यावेळेस आपल्या निधीतून त्याला पैसे देण्यात आले मग एका व्यक्तीला जर तुम्ही हजारो रुपये देत असाल तर ही संस्था कार्यरत आहे. खंड न पडता सातत्याने १० वे वर्ष साजरा करत आहे. अशा संस्थेला आपल्या ज्या अटीशर्ती आहेत त्याला अनुसरुन आपण करा. आपण एका व्यक्तीला देताना तोही विचार करा की, आपण महापौरांच्या निधीतून का द्यावे? त्यांनी ही सभागृहापुढे येणे गरजेचे आहे. त्यांनी तुम्हांला कधी ऑडीट दिले? दोन तीन वेळा जावून आलात तेव्हा ऑडीट दिले का? माझा एवढा खर्च झाला? तर ते कधीच दिले नाही.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर साहेब अगत्यका विषय है। भक्तिवेदांत हॉस्पिटल मे जो बच्चे ॲडमिट है उनके तीन पॅरेन्टस का फोन चालू है। वहा लोगोंका पैसा भरनेके लिए बोल रहे है। डॉ. लहाने साहेबने बोला था की हम पैसा देंगे तो उधर हॉस्पिटल मे तकलिफ दे रहे है।

**मा. महापौर :-**

हमने अभी अभी डिसीजन लिया है।

**चंद्रकांत मोदी :-**

हमने डिसीजन लिया वह बराबर है लेकिन हॉस्पिटल से फोन आया है तो हम क्या बोलनेका? वह पैसा मांग रहे है।

**हेलन गोविंद :-**

मा. महापौर साहेब आपल्या परवानगीने बोलत आहे की, आपण संपूर्ण माहिती करुन घ्या. कारण ही जबरदस्ती बरोबर नाही आणखीन दुसरी काय घटना झाली आहे का? तेही शोधून घ्या आपण डॉक्टरांना पहिले रिपोर्ट विचारा हे बरोबर दिसत नाही.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब यह अगत्य का बात है। वह बच्चे उधर ॲडमिट है। उनका उधर पहिले करनेका है। उनका फोंन आ रहा है।

**मा. महापौर :-**

उसपर ऑलरेडी रुलिंग हो चुकी है। अगर कही ना कही हम उसके अंदर दोषी है।

**चंद्रकांत मोदी :-**

उनको उधर पैसा भरनेका है। उनका परिस्थिती विक है तो आप कुछ मदत करिए।

**मा. महापौर :-**

उसपर रुलिंग हो चुका है।

**चंद्रकांत मोदी :-**

आपको जैसा करनेका है वैसा करिए लेकिन उधर बच्चो को तकलिफ है।

**प्रेमनाथ पाटील:-**

मा. महापौर साहेब, आपण भक्तिवेदांत हॉस्पिटलमध्ये फोन करुन सांगितले तर ते सोडू शकतात.

**चंद्रकांत मोदी :-**

आप उनको फोन करो। उन लोगोको वह तकलिफ देते है।

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण फोन करुन सांगा की, त्यांना सुट्टी द्या.

**चंद्रकांत मोदी :-**

अभी तीन फोन आया है।

**प्रफुल्ल पाटील :-**

याठिकाणी दोन वेगवेगळे विषय एकत्रितपणे मांडण्यात आले. एक विषय असा आहे की, शैक्षणिक संस्थांना सामाजिक संस्थांना शैक्षणिक व सामाजिक कार्य केल्याबद्दल त्यांना अनुदान देणे. हा एक विषय आहे आणि एका संस्थेला क्रिडा महोत्सव भरवल्याबद्दल अनुदान देणे हा एक विषय आहे. हे दोन विषय चालू असताना मध्येच तिसरा विषय असा आला आहे की वैयक्तिक कामगिरी कुठल्या एका क्षेत्रामध्ये उल्लेखनिय कामगिरी केल्याबद्दल त्याला मानधन दिले. ह्यापूर्वी महापौरांच्या निधीतून जे काय मानधन देण्यांत येते ते आतापर्यंत आपले चालू आहे. त्यामुळे तो विषय ह्याच्यामध्ये घेता येणार नाही. याच्याशी त्याविषयाशी संबंधित लावता येणार नाही. महत्त्वाची बाब अशी आहे की क्रिडा महोत्सव ज्यांनी सादर केला किंवा जे दरवर्षी सादर करतात. खरं म्हणजे आतापर्यंत कुठल्या सभागृहाने त्याची नोंद घेतली नव्हती कधी ह्याच्यापूर्वी वाटलं नव्हते की त्या समितीला अनुदान द्यावे किंवा त्याला द्यायला पाहिजे. खरं म्हणजे अनुदान हे द्यायला पाहिजे कारण ती समिती क्रिडा महोत्सव समिती चांगलं काम करते. पण अनुदान देण्याच्या संदर्भात तुमची भुमिका मा. महापौरांची भूमिका कितीही आग्रही असली तर निश्चितपणे शासनाचा जो जी.आर. आलेला आहे व महानगरपालिकेच्या अधिकार आणि कर्तव्यामध्ये जी प्रत्यक्ष करायला पाहिजे आणि दुसरे इच्छा शक्तीप्रमाणे करायला पाहिजे. जर महानगरपालिकेची इच्छा असली तर करायलाच पाहिजे अशातला भाग नाही. इच्छा असली की शैक्षणिक संस्थांना सामाजिक संस्थांना अनुदान द्यावे तर महानगरपालिका ते देवू शकते पण त्याची जी मर्यादा आहे ती ३० लाख रुपयापर्यंत आहे आणि त्याच्यामध्ये सुद्धा वैयक्तिक एका संस्थेला तीन लाखापेक्षा आपण जास्त देवू शकत नाही. मला वाटते की, सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी क्रिडा महोत्सव समितीच्या संदर्भात अनुदान देण्याचा प्रश्न उपस्थित केलेला आहे तो आणि दरवर्षी आपण शैक्षणिक संस्थांकडून प्रस्ताव मागवता हे सगळे प्रस्ताव आमची स्थायी समिती मेहनत करुन महासभेपुढे पाठवते पण आयुक्त साहेब त्याच्यावर काय कार्यवाहीच करत नाही किंवा मग जेव्हा वर्ष संपत असते तेव्हा ३१ मार्चला सगळ्या शाळेचे प्रस्ताव येत असतात. सगळ्या शाळेकडून ऑडीट रिपोर्ट मागवतात. प्रोजेक्ट रिपोर्ट मागवतात. कशासाठी अनुदान पाहिजे त्याची माहिती मागवतात. शाळेचे जे चालक आहेत ते फार मोठया अपेक्षेने देतात आणि पदरात एक रुपयासुद्धा पडत नाही. जर आपल्याला तीस लाख रुपये वाटप करायचे असतील तर ह्याच्यापुढे शिक्षण विभागाला महापौर साहेब आपण तशा सुचना द्या. आपण सर्वांचे प्रस्ताव मागवून घ्या. ज्याच्यामध्ये क्रिडा महोत्सव समितीचा आपण प्रस्ताव मागवून घ्या आणि त्यानुसार मग पुढे वाटप करा तो विषय मा. महासभेपुढे आणून त्याला मंजूरी मिळाली नंतर वाटप करता येईल. पण तो मा.महासभेच्यापुढे ३१ मार्चच्या आत तो विषय आला पाहिजे आणि तुमची बजेट प्रोव्हीजन शिल्लक आहे की नाही हे सुद्धा तपासायला पाहिजे. बजेट प्रोव्हीजन नसेल तर तुम्हांला ते यावर्षाला देता येणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळेला जी लिस्ट आली त्याच्यामध्ये शैक्षणिक संस्थेचे पत्ते बरोबर नव्हते. अकाउंटस कुठे आहे ते नव्हते. चॅरिटी कमिशनरचे रजिस्ट्रेशन नव्हते. त्यानंतर तुमच्या ज्या मागण्या असतात की कोणाला अनुदान द्यायचे त्यांची जी पात्रता असते ती पात्रता नसलेल्या संस्था सुद्धा त्यामध्ये होत्या. या सगळ्यांचा प्रशासनाने पूर्णपणे विचार करावा आणि आपण पुढचा निर्णय घ्यावा.

**मिरादेवी यादव :-**

मा. महापौर साहब जनता नगर मे जो सार्वजनिक नल है वह सब काट दिए है।अभी आदिवासी लोगोंके लिए दो नल तो छोडना चाहिए अभी सब के घरोंमे पानी का कनेक्शन नही हूआ है। अभी बहूत से लोग ऐसे ही है।

**मा. महापौर :-**

सभागृहमें पिछलीबार निर्णय हुआ है की जितने स्टॅण्ड पोस्ट है वह डिसकनेट किया जाए।

**मिरादेवी यादव :-**

आदिवासी लोगोंके लिए तो दो कनेक्शन उधर चाहिए। अभी वह लोग किधर जाऐंगे। गर्व्हमेंटने वह लोगों के लिए छूट दिया है, तो दो कनेक्शन वह लोगों के लिए छोडना चाहिए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

वह आदिवासी क्षेत्रमें सिर्फ कनेक्शन के लिए बोल रहे है। सारे कनेक्शन के बारे मे नही बोल रहे है।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जे काही सार्वजनिक नळ आहेत ते आता मोफत चालू राहणार नाही. जे लाभार्थी आदिवासी त्या भागातले आहेत त्याचां एक ग्रुप करुन...

**मिरादेवी यादव :-**

हिन्दी मे बोलिए।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

उसको ग्रुप कनेक्शन मे कनर्व्हट करो और उन्होंने अगर पैसे भरे तो उनको कनेक्शन दे सकते है।

**सिसिलीया बावीधर :-**

साहेब त्यांच्याकडे पैसे नाही तर ते कुठून देतील.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

असे होणार नाही. आता मोफत पाणी देण्याची तरतुद नाही.

(सभागृहात गोंधळ)

**हेलन गोविंद :-**

सन्मा. महापौर साहेब, मिटींगमध्ये कुठला विषय कुठे जातो ते बघा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

खतगांवकर साहेब आपल्याला माहित आहे का जे आदिवासी मच्छी विक्रीसाठी बसतात. त्यांच्याकडून ही महापालिका पैसे वसूल करत नाही. आदिवासींना ही सुट आहे. आपण मा. महासभेमध्ये प्रस्तावामध्ये ते दिलेले आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. नगरसेवक ओमप्रकाश अग्रवालजी आप बैठीए। जितने स्टॅण्ड पोस्ट थे उसके लिए सभागृहात निर्णय किया गया था उसके अलावा अगर आदिवासीयोंके लिए कोई भी ऐसा नियम के अंदर है के उनको सुविधा उपलब्ध की जाए तो जल्द से जल्द वह कल से कल करायी जाएगी। ठिक है।

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. महापौर साहेब आपण हे सांगा की हा निर्णय सभागृहामध्ये कधी झालेला आहे? ते तर सभागृहासमोर आणा.

**मा. महापौर :-**

स्थायी समितीमध्ये झालेला आहे.

**चंद्रकांत वैती :-**

निर्णय काय झालेला आहे तो सभागृहासमोर आणा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महापौरांच्यावतीने सभागृहाला माहिती देवू इच्छितो की मागच्या स्थायी समितीमध्ये याबाबत चर्चा झाली होती आणि त्यामध्ये सन्मा. सभापती महोदयांनी रुलिंग दिलेले आहे आणि शासनाचे जे निर्देश आहेत, शहरामध्ये कोणालाही मोफत पाणी देवू नये असे सक्त निर्देश आहेत याची आपल्याला कल्पना आहे आणि जिथे ओपन स्टॅण्ड पोस्ट होते ते बंद करुन त्याचे ग्रुप कनेक्शन करावेत असे निर्देश आहेत आणि त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही हाती घेतलेली आहे आणि आपण जे म्हणता की आदिवासीसाठी सुट आहे तशी कोणतीही सूट नाही तसे असेल तर तुम्ही आम्हांला दाखवा. म्हणजे आम्हांला तसे अंमल करता येईल.

**चंद्रकांत वैती :-**

साहेब, या विषयामध्ये स्थायी समितीमध्ये आपण हा विष्य रितसर विषय पटलावर आणला होता त्याच्यावर डिसीझन झालेले आहे. सदस्यांच्या काही सुचना आल्यात की वरबल काहीतरी विषय निघाला आणि त्याच्यावर डिसीझन झाला असे झाले असेल तर आपल्याकडून या विषयामध्ये प्रशासनाने एक विषय आणावा आणि एक धोरण निश्चित व्हावे की, प्रत्येक परिसरामध्ये पंधरा दिवसाची किंवा एक महिन्याची नोटीस लावावी आणि त्याठिकाणी त्यांना ग्रुप कनेक्शन घेण्याबाबतचे निर्देश देण्यात यावे अचानक सडनली तुम्ही जर पाणी बंद केलेतर लोकांमध्ये असंतोष माजेल तर त्याच्यासाठी जिथे एकाच स्टँडपोस्टला चार कनेक्शन असतील तर आपण त्यातले दोन कनेक्शन ठेवावेत. एखाद्या स्टँड पोस्टला दोन कनेक्शन असतील तर एक कनेक्शन ठेवावे आणि त्यालोकांना एक महिन्याची ट्रायल नोटीस द्यावी आणि तिथे जाहिर करावे की, आपण एक स्वतंत्र कनेक्शन घ्या. ग्रुप कनेक्शन घ्या किंवा काहीतरी माहिती सादर करा. त्यानंतर असा निर्णय घ्या. त्या त्या शहरामध्ये पाणी कपातीची घोषणा होणार आहे. मुंबई महानगरपालिकेत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत पाणी कपातीची घोषणा झालेली आहे. आपल्याकडे ही होण्याची शक्यता आहे. तर त्याच्या आधी आपण असा काहीतरी निर्णय घेण्याआधी ग्रुप कनेक्शन घेण्यासाठी लोकांना प्रवृत्त करा. त्याच्यामुळे महापालिकेचे पाणी विकले जाईल. महापालिकेला फुकटपाणी द्यायचे आहे ते फुकट पाणी बंद होईल. परंतु, त्याच्यावर काहीतरी एक धोरणात्मक निर्णय होउ दे. आपल्याकडे काहीही सुचना आली असेल तर त्याप्रमाणे कार्यवाही करू नका. जर ते कनेक्शन कट केले असतील तर जे चार कनेक्शन कट केले असतील तर त्यातले दोन ॲक्टीवेट करा. दोन कट केले असतील तर त्यातील एक कट करा आणि ह्याची महिन्याभराची मुदत ठेवा.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलत आहे की, मा. महासभेला एकदा विषय निघाला होता की, गटनेत्यांना कार्यालय द्यावे आणि तुम्ही असे सांगितले होते की, गटनेते किती आहे ते मलाच बरोबर माहित नाही तर त्यावर आपण असे बोललात की कोकण भुवनच्या आयुक्तांना लेखी पत्र देईल तेव्हा मला त्यांच्याकडून उत्तर येउ दे की, किती गटनेते आहेत? त्या संदर्भाचे पत्र आपण पाठवलेले आहे का? आणि जर तुम्ही पाठवले असेल तर आम्हाला त्याची पोच दाखवा?

**चंद्रकांत वैती :-**

पत्र पाठवण्याची गरज काय? जेव्हा कोकण आयुक्तांकडून आपल्याला जे संख्याबळ आलेले आहे त्याच्यातच सगळ्या गटनेत्यांचा उल्लेख केलेला आहे.

**नयना म्हात्रे :-**

पण मा. महापौर साहेबांना सांगितले आहे की, आम्ही कोकण भुवनच्या आयुक्तांना पत्र पाठवू तर पत्र पाठवलेले आहे का?

**चंद्रकांत वैती :-**

त्यांनी आपली दिशाभुल केली आहे. त्याची गरज नाही. त्यांना गटनेते कार्यालय देवून टाका. प्रयत्न करा. कशाला एवढ्या वेठीवर ठेवलेले आहे?

**नयना म्हात्रे :-**

आम्हाला आमची कार्यालये देउन टाका. तुम्ही पत्र पाठवले नसेल तर नका पाठवू.

**एस. ए. खान :-**

कोकण आयुक्तांकडून आपल्याला पत्र आलेले आहे ना, की किती गटनेते आहेत.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, आम्हाला आपण कार्यालय कधी देता ते पहिल्यांदा बोला. तुम्हाल मस्तपैकी अँटी चेंबर आहे. मोठ मोठी ऑफिस आहेत पण आम्ही कुठे बसायचे.

**मा. महापौर :-**

सचिवजी, ज्या दिवशी ठराव मांडला होता त्यादिवशी मी असे रूलिंग दिले होते की, सदरचा ठराव मंजुर करून ह्याला आपण अधिन राहू या. कोकण आयुक्तांकडे हे पाठवून त्याची मंजुरी घेउन गटनेत्यांना नियमाप्रमाणे त्यांना केबिन व गाडी जी मागणी केलेली आहे ती देण्यात यावी. तसे पत्र आपण पाठवले आहे की, नाही त्याची माहिती द्या. गाडी, केबिन आणि संगणक चालक.

**चंद्रकांत वैती :-**

आपण गाडी सांगितली ती ऐच्छिक बाब असेल. कोणाला घ्यायची नसेल. परंतु, तत्पुर्वी सभागृहाला माहिती देवू इच्छितो की, या महापालिकेकडे एकूण ७१ वाहन आहेत आणि ७१ वाहनांमध्ये ॲम्ब्युलन्स, ट्रॅक्टर, कार, जीप सगळ्या गोष्टी आहेत. तरीही आपण आस्थापनेवर कर्मचाऱ्यांना देण्यासाठी अधिकाऱ्यांसाठी १८ गाड्या, १८ कार आणि सुमो भाड्याने घेतलेल्या आहेत. आणि त्या व्यतिरिक्त ३५ अधिकाऱ्यांना आपण प्रतिपुर्ती भत्ता देतो. ३५ ते ४० अधिकाऱ्यांना १० ते १३ हजार रूपये देतो. मग तुम्हाला गटनेत्यांना वाहन देणार काय? त्याच्यावर एवढे आश्चर्य वाटण्याचे कारण काय? ७१ वाहन असली तरीपण आपण १८ वाहन भाड्याने घेतलेली आहेत. ३५ जणांना प्रतिपुर्ती भत्ता देतो. मग गटनेत्यांना एक वाहन मिळाले तर एवढे उडण्याची गरज नाही. फक्त हे सभागृहाच्या माहितीसाठी बोललो.

**नयना म्हात्रे :-**

मला उत्तर द्यावे की, कार्यालय आणि गाडी कधी देणार?

**मा. महापौर :-**

सदरची ही माहिती उपलब्ध नाही. आपल्याला एक दोन तासात माहिती आणून सादर करतो.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, आता स्टँड पोस्टबाबत चर्चा झाली आणि खरोखरच बीजेपी वाल्यांनी प्रश्न उपस्थित केला की, काही लोकांकडे पैसेच भरायला नाही. परंतु, त्यांना पाणी हवे आहे. तर जिथे जिथे स्टँड पोस्ट असेल त्यांना जर मिटरने पाणी दिले व मीटरच्या पाण्याचे पैसे घेतले तर स्टँड पोस्टचा आकार जी अनामत रक्कम आहे त्याची ती न घेता जर घेतले तर त्या गरीब लोकांचे भले होईल व त्यांना पाण्यासठी वणवण भटकावे लागणार नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. नगरसेवक आपण त्यांना ग्रुप कनेक्शन देणार आहोत. ग्रुप म्हणजे प्रायव्हेट कनेक्शन झाले. प्रायव्हेटमध्ये मिटर लागणारच आहे आणि मिटर रिडींग प्रमाणे पैसे येणार आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आपल्याला त्याची अनामत रक्कम भरायला लागेल ना. त्याला तुम्ही माफ करा. सभागृहाचा तसा निर्णय घ्या.

**मा. महापौर :-**

आपण ते रितसर आणू.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, पाण्याचा हा विषय परत निघाला म्हणून बोलत आहे की, सन्मा. नगरसेविका मिरादेवी यादव यांनी बोलले की, आदिवासी क्षेत्रात त्यांना स्टँड पोस्ट द्यायचे आणि आदिवासी क्षेत्रात आपण

त्यांची घरपट्टी एक रूपया घेत आहोत म्हणून त्यांना पाण्याच्या स्टँड पोस्टची व्यवस्था करून आपण त्यांच्याकडून एक रूपया बिल घ्यावे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौर साहेब, आदिवासी क्षेत्रामध्ये काही ठिकाणी अजूनपर्यंत पाईप लाईनच पोहचलेली नाही. आदिवासींच्या नावाखाली दुसरीच लोक पाणी वापरत आहे. आदिवासींच्या नावाखाली जर कोण फायदा घेत असेल तर ते चुकीचे आहे. चेना, काजुपाडा, माश्याचा पाडा....

**शरद पाटील :-**

साहेब, काशीमिरा येथे आदिवासी नाही का?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आदीवासी क्षेत्रामध्ये अजुनपर्यंत पाईप लाईन पोहचलेली नाही. आदीवासी क्षेत्रामध्ये आजही लोक बोरींगचे पाणी पित आहे आणि टँकरचे पाणी जात आहे. ज्या ठिकाणी आपल्या पाईप लाईन गेलेल्या नाही त्याठिकाणी टँकरमार्फत आपण आजही पाणी पुरवठा करत आहे. ज्या ठिकाणी आपल्या पाईप लाईन गेलेल्या आहेत त्याठिकाणी आपण ग्रुप कनेक्शन देवून, तिथे नागरिकांना आतापर्यंत स्टँडपोस्ट होती. आपण महापालिकेने जेवढे सहकार्य नागरिकांना करायचे आहे ते पुर्णपणे केलेले आहे. जनता नगर विभागामध्ये ज्यावेळी मी स्थायी समितीमध्ये होते. तेव्हा ग्रुप कनेक्शन देण्याचा जो निर्णय घेतला होता तो निर्णय मा. पाणी खात्याचे अधिकारी असतील त्यांनी वाचून दाखवावे. स्थायी समितीमध्ये निर्णय घेतलेला आहे तो वाचून दाखवावा. त्याच्यावरून माहित पडेल की, ग्रुप कनेक्शन द्यायचे आहे असे ठरले आहे आणि ग्रुप कनेक्शनवर आपण मीटर लावायचे आहे व त्या मीटरचे चार्जेस नागरिकांनी भरायचे होते. कारण पाण्याच्या टाकीचे काम चालू होते व ते काम पुर्णपणे झालेले आहे आणि त्याठिकाणी पाणी कनेक्शन द्यायला सुरूवात झालेली आहे. नागरिकांनी नळ कनेक्शन घ्यावे.

**मा. महापौर :-**

तोच निर्णय आता दिला.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, एकीकडे ज्यांनी कनेक्शन घेतलेले आहे त्यांना पाणी नाही आणि स्टँड पोस्टवर पाहिजे तसे पाणी फुकट चालले आहे. तिथे लोक आंघोळ्या करतात. कपडे धुवतात. पाहिजे तसे पाणी नासत आहे. अशा ठिकाणी कुठेतरी महापालिकेने निर्णय घेतला पाहिजे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपण ती माहिती घेवूनच तिथे घ्या. आम्ही सांगत नाही की, तुम्हीच असे द्या. माहिती घ्या. तिथे आपल्या अधिकाऱ्यांना पाठवा माहिती घ्या आणि खरोखर आदिवासी असतील तर त्या आदिवासींकडून आपण एक रूपया घरपट्टी घेत आहोत तसे आपण आदिवासींकडून पैसे घेवू नये अशी मी विनंती करतोय.

**आसिफ शेख :-**

सन्मा. पिठासीन अधिकारी याठिकाणी आदिवासींना पाणी देण्याचा जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. सन्मा. मिरा देवी यादव, भाजपच्या आमच्या सदस्या तर प्रथमच त्यांनी याठिकाणी सभागृहात वक्तव्य केलेले आहे. त्यांचे मी याठिकाणी अभिनंदन करतो. सदस्यांनी सभागृहात असे बोलले पाहिजे. आपण आपल्या ज्या वॉर्डातून निवडून येतो त्या परिसरातील समस्यांबाबत, हे जनतेचे व्यासपिठ आहे आणि आपला आवाज याठिकाणी बुलंद केला पाहिजे. या समस्येचे निराकरण मा. महासभेच्या माध्यमातून होत असते तर मी त्यांना धन्यवाद देतो. याठिकाणी जी वस्तुस्थिती आहे, प्रशासन म्हटले की कोणतेही, प्रशासन मग ते ग्रामपंचायत असो, नगरपरिषद असो, जिल्हापरिषद असो, पंचायत समिती असो, महानगरपालिका असो किंवा राज्यशासन किंवा केंद्रशासन असो नागरिकांना महापालिकेचे पाणी, आरोग्य, शिक्षण, लाईट या सगळ्या गोष्टी देणे हे घटनेने बंधनकारक केलेले आहे. यामध्ये जर आपण कसुर केली तर मला वाटते की त्यांना पनिशमेंट केले पाहिजे या घटनेने प्रशासनाच्या त्या अधिकाऱ्यांना स्थायी समितीमध्ये त्यावेळी मी ही होते आणि त्या समितीमध्ये आपण निर्णय घेताना झोपडपट्टयांच्या संदर्भात असा निर्णय घेतला होता की, जे स्टँड पोस्ट होते ते स्टँड पोस्ट बंद करून त्याठिकाणी ग्रुप कनेक्शन, पाच पाच लोकांना मिळून एक ग्रुप कनेक्शन द्यायचे असा निर्णय झाला होता. त्यापद्धतीने त्याच्यावर अंमलबजावणी आजपर्यंत होत आहे. परंतु, जर एखाद्या परिसरात जर आदिवासी लोक आहेत आणि ते पिण्याच्या पाण्यापासून जर वंचित राहत असतील तर आपल्या मिरा भाईंदर शहराला हे भूषणावह नाही. तर कृपया ज्यांना पाणी मिळत नसेल त्यांना पाण्याची मोफतपणे व्यवस्था करून दिली पाहिजे. हे प्रशासनाचे आद्य कर्तव्य आहे. घटनात्मक बंधनकारक आहे. आणि आपण जर आपल्या कर्तव्यात कसुर करत असेल तर त्याठिकाणी तो अधिकारी लायक नाही असे मी समजतो कारण, याठिकाणी भाजपच्या सदस्यांनी जे म्हणणे मांडले आहे त्यांच्या मताशी मी सहमत आहे. त्यांना पाणी दिले पाहिजे. जर त्यांच्याकडे पैसे नाही तर काय करणार? एक रूपया प्रमाणे आपण त्यांना आकारणी करतो आणि दुसऱ्या ठिकाणी त्यांना पाण्यापासुन वंचित करतोय तर हे काय चालले आहे? एका ठिकाणी एकाला एक न्याय

द्यायचा आणि दुसऱ्या ठिकाणी वेगळा न्याय द्यायचा असे कृपया करू नका आणि जर पाणी मिळत नसेल तर आदीवासींना पहिले मोफत पाणी द्या. अशी माझी याठिकाणी आग्रहाची मागणी आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. नगरसेवक चंद्रकांत वैती साहेबांचा एक रूपयाचा तो ठराव होता. आपण बोललात ना की, ठराव कुठला त्यामध्ये आदिवाश्यांना न्याय देण्यासाठी आपणच ठराव मांडला होता की, आदिवासी लोकांकडून एक रूपया घ्यायचा आणि ज्यादिवशी लाईन पडली त्यादिवशी ५० ग्रुप कनेक्शन घेतलेले आहे. लोकांना पाणी दिलेले आहे. आत्ताच फक्त त्यांनी आदिवासी शब्द वापरलेला आहे. त्याच्यावर सहानुभुती आम्ही सांगत नाही की, तुम्ही प्रत्येकाला पाणी द्या. पण तुम्ही रूलिंग देताना अशी रूलिंग दिली पाहिजे होती की, ताबडतोब अधिकाऱ्यांनी तिथे जावून तपासणी करावी आणि खरोखर आदिवासी असेल व त्यांची पैसे भरण्याची ऐपत नसेल तर त्यांना ताबडतोब कनेक्शन देण्यात यावे. असे जर दिले असते तर आम्हाला मान सन्मान वाटला असता.

**मा. महापौर :-**

सन्मा. नगरसेवक ओमप्रकाश अग्रवालजी आता जसे सन्मा. नगरसेवक चंद्रकांत वैती साहेबांनी मांडल्याप्रमाणे आदिवासी भागात जे स्टँड पोस्ट आहे ते दोन असतील तर एक बंद करा व एक चालू ठेवा आणि एकच असेल तर आपण चालू करूया. त्यानंतर नियमात काय आहे? याचा तपास करून कसे त्यांना फ्रि देता येईल की पैसे घेवून त्याप्रमाणे रितसर त्याच्यावर कार्यवाही करू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

धन्यवाद.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौर साहेब, ज्याठिकाणी आदिवासी आहेत आणि खरोखर मुळ आदीवासी असतील तर त्यांचे तुम्ही आदिवासी दाखले बघा. अन्यथा आपण कोणालाही पाणी फुकट देणार ज्याठिकाणी आदिवासी आहेत त्यांचे मुळ दाखले बघा. त्यांच्या उत्पन्नाचा दाखला बघा की, ती लोक खरोखर आपल्या महापालिकेचे पैसे् भरायला सक्षम नाही का, ते बघा. अन्यथा आदिवासींच्या नावाखाली कोणीही गैरफायदा घेवू नये कारण पाणी विक्रीचा प्रकार सार्वजनिक स्टँड पोस्टवर होतो. पाणी विक्री जोरात चालू आहे. तिथे जो पाईप हातामध्ये घेवून बसतो तो पाहिजे तसा पाणी विक्री करत असतो. आपण एकीकडे सगळ्यांना पाणी ''ना नफा ना तोटा'' या तत्वावर देतो.

**मा. महापौर :-**

असे सांगितलेले नाही की, त्यांना पाणी कनेक्शन फुकट द्या. टाईम बिंग जिथपर्यंत निर्णय होत नाही आणि त्यांना आपण नोटीस बजावत नाही. जो पर्यंत त्यांची पर्यायी व्यवस्था होत नाही. त्यानंतर आदिवासींना फ्री द्यायचे की नाही त्याचा आपण निर्णय घेवून डिसीजन घेवू.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलत आहे की, काल ज्या पाच मुलांना ॲडमिट केले आहे व आपण सांगितले की, रूलिंग आलेले आहे तर तसा विषय संपवू शकत नाही. महागनरपालिकेच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. मी तुम्हाला कालची परिस्थिती सांगतो. काल मुलांना ॲडमिट केल्यानंतर हॉस्पीटलमध्ये अगोदर सांगितले की, आपण ११-११ हजार रूपये डिपॉझिट म्हणून पैसे भरा. त्यावेळी डॉ. लहाने तिथे होते. डॉ. लहाने याबाबत उपायुक्तांशी बोलले असतील आणि त्यावेळी त्यांना कन्फेशन दिले की, हे पैसे तुम्ही भरू नका आणि आता ती मुले बरी आहेत त्यांना डिसचार्ज द्यायचा आहे. ती मुले तिथे थांबलेली आहेत आणि आता तुम्ही सांगता की, पैसे भरायला सांगा. मग महानगरपालिकेवर विश्वास कोण ठेवेल? त्या मुलांना ॲडमीट केल्यानंतर प्रथमदर्शनी असेच वाटले होते.

**एस. ए. खान :-**

आयुक्त साहेब, डॉ. लहाने साहेबांनी सांगितले होते की, तर ॲडव्हान्स घ्या पैसे भरा आणि नंतर बघू काय झाले ते.

**अनिल सावंत :-**

पेशन्ट तिथे हॉस्पीटलमध्ये डिसचार्जसाठी थांबले आहेत.

**मा. महापौर :-**

याबाबत डॉक्टर साहेबांना खुलासा करू द्या.

**एस. ए. खान :-**

आपण याबाबत सांगितले आहे आणि काल तिथे आश्वासन दिले होते, तर तुम्ही तुमच्या नावावर ॲडव्हान्स घ्या.

**डॉ. लहाने :-**

सन्मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलत आहे, आम्ही जेव्हा काल दु. ३.०० वा. हॉस्पीटलमध्ये गेलो तेव्हा तिथे आम्ही असे सांगितले नाही की, फक्त जे डॉक्टर होते ते त्यांच्याकडून दहा-दहा हजार रूपये

डिपॉझीट मागत होते. तर आम्ही डॉ. संख्ये यांना फोन करून सांगितले की, तुम्ही कृपाकरून त्यांच्याकडून सध्यातरी डिपॉझिट घेउ नका. तुम्ही फक्त त्यांच्यावर उपचार करा आणि सकाळपर्यंत वाट बघा. आम्ही वरिष्ठांशी बोलून जे असेल त्याप्रमाणे तुम्हाला सांगू की, काय करायचे आहे. असे मी तिथे बोललो.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, आपने प्रॉमिस किया था। आप अभी जबान मत घुमाओ बच्चे है वह इतने पैसेवाले नही है। गरिब बच्चे है। आप इस महासभा मे नही बैठेंगे तो चलेगा पहिले ये संभालो।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. चंद्रकांत मोदी साहेब, सभागृहामध्ये मा. महापौरांनी या प्रकरणात रूलिंग दिलेले आहे. आपल्याला त्याची कल्पना होती.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, रूलिंग क्या, अगर चार दिन लगेगा तो वह बच्चे चार दिन तक बैठे रहेंगे क्या?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याच्यावर अंतिम निर्णय असा झाला आहे की, सन्मा. नगरसेवक एस. ए. खान आणि पाटील साहेबांनी सर्वांनी याठिकाणी मान्य केले आहे की, त्याचे जे काही इन्सपेक्शन सॅम्पल घेतलेले आहे त्याचा निर्णय येउन त्याच्यावर निर्णय घेउ.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपण रिक्वेस्ट करा ना.

**मा. महापौर :-**

आपली सभागृहामध्ये ह्या विषयावर भरपूर चर्चा झाली आणि आपल्याला वाटत असेल की, पेमेंट करूया तर आपण त्यांना पेमेंट करू.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, भक्ती वेदान्त हॉस्पीटल तुमचे मान ठेवणार नाही का?

**मा. महापौर :-**

ज्यावेळी तो विषय आला. त्यावेळी आपली त्याच्यावर रितसर चर्चा झाली. सभागृहाने हा निर्णय घेतला की, पूर्ण रिपोर्ट येवू द्या. त्यानंतर त्यांनी बिल दिले. आणि आपल्याला वाटले तर सभागृहातून त्यांना पेमेन्ट रिफन्ड करु.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपली भावना चांगली आहे. पण त्यांच्याकडे पैसे अव्हेलेबल नाही. ते बरीब आहेत.

**मा. महापौर :-**

ऑलरेडी त्याच्यावर निर्णय घेतलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

तोपर्यंत चार दिवस त्यांनी असेच रहायचे. त्यांच्याकडे पैसे नाहीत तर

**चंद्रकांत मोदी :-**

लेकीन डॉक्टर साहब को उधर भेजिए। बच्चे को कमसे कम छुट्टी तो दिला दो। बादमे जो करना है करो ना। डॉक्टर को उधर भेजो।

**मा. महापौर :-**

सभागृह ने जो निर्णय लिया है वह बात कर रहा हूँ।

**चंद्रकांत मोदी :-**

महानगरपालिका के तरफसे पैसा मत दो। डॉक्टर साहब को उधर भेजो। उधर तकलीफ है। इसलिए बोल रहा हूँ ना।

**एस. ए. खान :-**

डॉक्टरांना पाठवा ना. ते तिकड जावून बघतिल ना. काय प्रोब्लम आहे ते। आपण निर्णय घेतला नाही. डॉक्टरांना पाठवा. पानपट्टे साहेब, काल गेले होते ना। तर आज त्यांना पाठवा.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, अशा पध्दतीची घटना घडते त्यावेळेला एमरजन्सी कुठलाही माणूस असतो तो त्या मुलाला नेवून चांगल्या हॉस्पीटलमध्ये ॲडमीट करतो. त्याठिकाणी अवाढव्य बिलं लावून ठेवलेले असतात. ते सर्वांना परवडणारी नसतात. म्हणून सदस्य तुम्हाला एवढी रिक्वेस्ट करतात. मग, तुम्ही त्याच्यामध्ये महानगरपालिकेचे जबाबदार डॉक्टर म्हणून काही सांगु शकता ना. काही कन्सेशन करायला सांगा. काहीतरी करा ना. येथून काहीतरी निर्णय घ्या ना. इथेच बोलतात आणि तुम्ही सांगता उडवा उडवीचे उत्तर करतात. तुमची काहीच जबाबदारी नाही. जेव्हा काल बघायला गेले तेव्हा डॉक्टरांना भेटायचे होते ना. ज्यावेळेला आजारी झाले तेव्हा नुसते जावून आले. म्हणजे झाले का? त्याच्यानंतर काहीच करायचे नाही. आपले जे डॉक्टर आहे त्यांना माहित आहे की, भक्ती वेदान्तचे डॉक्टर काय बिलं लावतात.

**प्रकरण क्र. १८ :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल (गाडोदीया) यांचे दिनांक १५/१२/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - ना हरकत दाखला देणे, नुतनीकरण करणेकामी आकारण्यात येणाऱ्या फी चे दर सुधारीत करण्याबाबत विचार विनिमय करणे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, त्या प्रस्तावावर बोलण्याच्या अगोदर मी एवढेच बोलते की, मगासपासून विषय चालला आहे. पल्स पोलिओच्या बाबतीमध्ये शहरात बालकाचे आरोग्य बिघडले. एक बालक गटारामध्ये पडले. एका सफाई कामगाराने अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला. शहरामध्ये अशा भयंकर घटना होतात, चालू आहेत. आणि ह्या पालिकेला मा. आयुक्त साहेब नाहीत. शहरामध्ये अशा अनेक घटना होत असताना जे आयुक्त होते. पंधरा दिवस त्यांना नुसते खुर्चीवर बसून ठेवले होते. त्यांचे अधिकार गेलेले होते. त्यांचा शहराला काही उपयोग नव्हता. आज ते आयुक्त गेल्यानंतर त्यांचा १० दिवस आहे. इतकं या शहराचे दुर्देव आहे की? की, अख्ख्या प्रगतीशील महाराष्ट्रामध्ये आपल्या महापालिकेला आयुक्त मिळू नये. आणि आपण त्याच्यासाठी काहीच करत नाही. आपण इतके दुर्देवी आहोत का? या शहराचे इतक दुर्भाग्य आहे का? हा प्रश्न तुम्हाला नाही पडला का? मी हे सभागृहाला विचारले. आपल्याला पडणारी गोष्ट नाही का? आपल्या शहराला आयुक्त नाही.

**मा. महापौर :-**

माझ्या माहितीप्रमाणे दि. २४ डिसेंबरला ज्यावेळी आमची सी.एम. बरोबर एम.एम.आर.डी.ए. संदर्भात मिटींग होती. त्यावेळी मा. आयुक्तांचे अधिकार काढले होते. तेव्हा सी.एम. साहेबांशी चर्चा झाली होती की, साहेब, आमचे कामकाज कसे होईल. त्यांनी मला आश्वासन दिले होते की, तुम्हाला लवकरात लवकर आम्ही नविन मा. आयुक्त देतो. त्यावेळी सांगितले होते. तुम्ही सांगितले आम्ही परत पाठपुरावा करु.

**प्रभात पाटील :-**

त्या तारखेनंतरचे सहा दिवस आणि आताचे नउ दिवस हा विचार कारण्यासारखा भाग आहे. ही संपूर्ण महानगरपालिका बिना आयुक्तांशिवाय चालते.

**मा. महापौर :-**

आपले अधिकार नाही ना.

**प्रभात पाटील :-**

आपल्याला हा प्रश्न तुम्ही आवाज उठवला पाहिजे. आम्ही उठवला पाहिजे, सर्वांनी उठवला पाहिजे. आपले दुर्देव आहे. का? आपण काही पाप केले आहे का? की, या महापालिकेकडे कोणाचे लक्ष नाही.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्या प्रभात पाटील ताई ज्या बोलतात त्यांच्या मताशी आम्ही सुध्दा सहमत आहोत. त्यांच्या पक्षाचे मुख्यमंत्री असताना आज आपल्यावर ही वेळ येते.

**प्रभात पाटील :-**

मुख्यमंत्री कोण आहे तो भाग नाही. आमचे मुख्यमंत्री एकदम चांगले आहे. म्हणून ते चांगले आयुक्त शोधतात.

**मिलन पाटील :-**

मुख्यमंत्र्यांनी आम्हाला चांगल्यात चांगले आयुक्त द्यावे. आय.एस.ए. अधिकारी आम्हाला द्यावे. असा ठराव तुम्ही करावा.

**प्रभात पाटील :-**

आमचे मुख्यमंत्री त्याच शहरात आहे.

**मिलन पाटील :-**

आम्ही तुमच्या मताशी सहमत आहोत.

**मा. महापौर :-**

मॅडम, आपण एका बाजुला सांगता की, आपले मुख्यमंत्री ह्याच शहरात आहे तर ते अजून आले का नाही?

**प्रभात पाटील :-**

शोध लवकर संपवावा. अशी तुम्ही विनंती करा. तुम्ही महापौर आहात.

**मा. महापौर :-**

तुम्ही आता म्हणता आमचे मुख्यमंत्री.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही शेवट लवकर संपवावा. अशी त्यांना विनंती करा.

**नयना म्हात्रे :-**

ते काय मुख्यमंत्री काणाच्या घरचे नाहीत. ते पूर्ण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत. आमचे आणि तुमचे करु नका.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या सभागृहामध्ये दरवेळेला कुठल्या-कुठल्या विषयावर बोलतात. आता मागे ३५ लीटरची पाण्याची पाईपलाईन आणली. त्यावेळेला मुख्यमंत्र्यांच्या अभिनंदनाचा ठराव पास झाला. ह्या सभागृहाने सर्वानुमते मुख्यमंत्र्यांच्या वरती निंदेचा ठराव पास करावा असे मी म्हणतो. दहा लाखाचे शहर. दहा लाखाची लोकसंख्या असलेल शहर. गेल्या पंधरा ते वीस दिवसापासून बेवारशी आहेत. आणि आपल्या महापालिकेच्या आयुक्तांच्या तिकडे बाजार चाललेला आहे. वर्तमानपत्रामध्ये १०-१० करोड, ५-५ करोडच्या बातम्या येतात. ही लोक आम्हाला विचारणा करता. त्याकरिता माझी सभागृहाला अशी सुचना आहे की, ते उपमुख्यमंत्री असो किंवा मुख्यमंत्री असो. हे शहर ज्यंनी बेवारशीपणे टाकलेले आहे. सत्ताधाऱ्यांचे कार्यकर्ते सुध्दा ह्या सदनामध्ये आहे. पदाधिकारी आहे. पुढारी आहेत. हिंम्मत असेल तर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या नावाने निंदेचा ठराव इकडे पास करा. आम्हाला या शहरात रहायला शरम वाटते. आम्ही असे काय पाप केले की, या शहरामध्ये २० दिवसापासून कमिशनर नाही.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, ही उपमुख्यमंत्र्यांची हिम्मत नाही .......

**मिलन म्हात्रे :-**

असे नाही तर ठराव कशाला पास करता? तुम्ही जर मुख्यमंत्र्यांच्या अभिनंदनाचे ठराव पास करता तर निंदेचा ठरावसुध्दा पास करा. हिम्मत असेल तर.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सर्व सन्मा. सदस्यांना माझी विनंती आहे की, ही तहकुब सभा आहे. तहकुब सभेमध्ये निर्देश असे आहेत की, विषयपत्रिकेच्या बाहेर आपण कोणतेही कामकाज करु नये. आपण काही गांभीर्य ठेवून कामकाल करावे. बाहेरच्या विषयावर चर्चा करायचा अधिकार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

असे कसे? तुम्ही जर विषय पत्रिकेवर विषय नसताना अभिनंदनाचा ठराव पास करता? अधिकार आहे. हे सभागृह ह्याच्याच करिता आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तहकुब सभेमध्ये विषय पत्रिकेवर जे विषय राहतात .......

**मिलन म्हात्रे :-**

आतापर्यंतचे सभागृहात विषय पत्रिकेवर विषय नसलेले अभिनंदनाचे विषय पास झाले आणि त्याचे ठराव पारित झाले. आम्ही सांगतो निंदेचा ठराव पास करा.

(सन्मा. सदस्या शानु गोहिल यांनी प्रकरण क्र. १८ च्या ठरावाचे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १८ :-**

ना हरकत दाखला देणे, नुतनीकरण करणेकामी आकारण्यात येणाऱ्या फी चे दर सुधारीत करण्याबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र.**

मिरा भाईंदर महापालिकेत उत्पन्नाच्या विविध स्त्रोत पैकी विविध उद्योगांना व व्यापारांना ना हरकत दाखला देणे, नुतनीकरण करणे कामी आकारण्यांत येणारी फी चे दर सुधारीत करणे बाबत प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे. वास्तविक २००२ साली प्रशासकीय कारकिर्दी मध्ये उपविधी तयार केली असून त्यास शासनाची मंजूरी असल्याचे संदर्भीय आहे. सन २००२ पासून आतापर्यंत अस्तित्वात असलेल्या सोबतचा तपशिल अपूरा असून त्यानंतर व्यवसायिकांत वाढ झाली आहे. त्या व्यावसायिकांना यादीत समाविष्ट करुन परिपूर्ण माहितीसह प्रशासनाने तातडीने माहिती करावी. भविष्यात महापालिकेला शहराच्या विकास कामासाठी लागणारा निधी असाच उत्पादन्नांच्या स्त्रोतातून उपलब्ध करावा लागणार आहे. म्हणून आजच्या महासभेने जेष्ठ नगरसेवकांची पदाधिकाऱ्यांची सर्व पक्षीय समिती गठीत करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी. समितीने केलेली चर्चा व सर्व व्यवसायाचा परिपूर्ण माहितीसह पुढील सभेपुढे सादर करण्यांत यावा. असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- शानू गोहिल** **अनुमोदनः- निर्मला सावळे-कांबळे**

**निर्मला सावळे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

(सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी प्रकरण क्र. १८ च्या ठरावाचे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १८ :-**

ना हरकत दाखला देणे, नुतनीकरण करणेकामी आकारण्यात येणाऱ्या फी चे दर सुधारीत करण्याबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना २८/०२/२००२ रोजी झाली. त्यावेळी महानगरपालिकेने नाहरकत दाखला देणे देणे नुतनीकरण करणे व त्यावर फी आकरण्यासाठी उपविधी तयार केलेले असून त्यास शासनाची मंजूरी असल्याचे संदर्भिय ठरावात नमुद आहे.

संदर्भित ठरावानुसार महानगरपालिकेने नाहरकत दाखला देणे, नुतनीकरण करणेची कार्यवाही सुरु केली परंतु त्यास योग्य तो प्रतिसाद महापालिका क्षेत्रातील व्यापाऱ्यांकडून न मिळाल्याने महापालिकेस अपेक्षित (अंदाजपत्रकानुसार) उत्पन्न कोणत्याही आर्थिक वर्षात मिळालेले नाही. ह्याला माझ्या मते अनेक कारणे आहेत जशी–

१) व्यवसायकांची परिपूर्ण यादी उपलब्ध नाही.
२) व्यापाऱ्यांना महापालिकेचा दाखला घेणे बंधनकारक आहे ह्याची जाणीव करुन देण्यांत महानगरपालिका प्रशासन अपयशी ठरले.
३) प्रशासकीय ठरावत वेगवेगळ्या उद्योगांना नाहरकत दाखल्यासाठी आकारण्यात आलेले दर अवाजवी आहेत.
४) व्यपाऱ्यांना सध्या सेल्स टॅक्स, इन्कम टॅक्स, जकात दर, व्हॅट, मालमत्ता कर व इतर अनेक कर भरावे लागत आहेत. तुलनेने त्यांचे उत्पन्न कमी आहे.
५) सध्या सर्वत्र मोठ मोठे शॉपिंग मॉल उभारले जात आहेत. सुभिक्षा, रिलायन्स फ्रेश, स्पिनॅच, फुडलँड अशी सुपर मार्केट अशी सुपर मार्केट तयार होत असल्याने छोटे दुकानदारांचे धंद्यावर परिणाम झाला आहे.
६) प्रत्येक इमारतीमध्ये तळ मजल्यावर कमर्शियल गाळे असल्याने अपेक्षित उत्पन्न गाळेधारकांस मिळत नाही.

अशी अनेक कारणे आहेत. ज्यामुळे महापालिकेस परवाना विभागातून अपेक्षित उत्पन्न मिळालेले नाही. महापालिका स्थापन झाली तेव्हा जनगणनेच्या आकडेवारी नुसार साधारणतः ५१,००० लहान मोठे उद्योग धंदे ह्या शहरात होते. सरासरी २५०/- रु. आपण प्रत्येक उद्योगाचे धरल्यास महापालिकेस किमान २ कोटीचे उत्पन्न मिळाले पाहिजे.

परंतु, वर निदर्शनास आणलेल्या कारणांनी महापालिकेचे नाहरकत दाखला, फी चे दर अवाजवी आहेत. परवाना देण्याची पद्धत सुटसुटीत नाही. अनावश्यक कागदपत्रांची मागणी प्रशासनाकडून केली जाते व व्यापाऱ्यांना महापालिका दाखला घेतला पाहिजे याबाबतचे गांर्भिय निदर्शनास न आणल्याने महापालिकेचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. ह्याकरिता महापालिकेने नाहरकत दाखला देणे, नुतनीकरण करणे साठीच्या फी चे दर वाजवी केल्यास सर्व व्यापारी स्वतःहून महापालिकेचा परवाना घेण्यास येतील. महापालिकेचे उत्पन्न वाढवायचे असल्यास परवाना फी चे दर रिवाईज करणे आवश्यक आहे. ते दर पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | ना हरकत दाखल्याचा विषय | नविन दाखला शुक्क (रुपयात) | तिन वर्षाकरिता नुतनीकरण शुल्क रूपयात |
|---|---|---|---|
| १ | विद्युत पुरवठा दाखला (कारखान्याकरिता) | ७,०००/- | ३,५००/- |
| २ | व्यवसाय सुरू करणेस दाखला | | |
| | १) कारखाना | ५,०००/- | ३,०००/- |
| | २) मिठाई दुकान | २,५००/- | १,२५०/- |
| | ३) दुध डेअरी | १,५००/- | ७,५०/- |
| ३ | बुथ (स्टॉल करिता) परवानगी | | |
| | १) टेलिफोन | १००/- | १००/- |
| | २) गटई काम | १००/- | १००/- |
| | ३) दुध व दुग्धजन्य पदार्थ | ५००/- | ३,००/- |
| | ४) कम्युनिकेशन सेंटर | २,०००/- | १,०००/- |
| ४ | कत्तलखाना चालविणे करिता दाखला | १,०००/- | ५,००/- |
| ५ | केरोसिन/केमिकल साठा विक्री/गोडावून दाखला | ५,०००/- | २,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | हॉटेल<br>१) ५०० चौ.फूट च्या आतील क्षेत्रफळाकरिता | २,५००/- | १,२५०/- |
| | २) ५०० चौ.फूट पेक्षा जास्त क्षेत्रफळाकरिता | ५,०००/- | २,५००/- |
| | ३) बार रेस्टॉरंट अँड परमीट रूम | १०,०००/- | ५,०००/- |
| ७ | रूग्णालय (पाच कॉट) | ५,०००/- | २,५००/- |
| ८ | उपहार गृहे<br>१) नास्ता, चहा कॉफी इत्यादी | १,५००/- | ७,५०/- |
| | २) चायनीज पदार्थ तयार करणे | २,०००/- | १,०००/- |
| ९ | खानावळ | १,०००/- | ५,००/- |
| १० | ऑईल मिल | ५,०००/- | २,५००/- |
| ११ | लॉजिंग व बोर्डिंग | १५,०००/- | ७,५००/- |
| १२ | सौदर्य प्रसाधने बनविणे | ३,०००/ | १,५००/- |
| १३ | सलून /ब्युटिपार्लर | | |
| | १) नॉन ए.सी. | १,०००/- | ५,००/- |
| | २)ए.सी. | २,०००/- | १,०००/- |
| १४ | शीतपेये गृहे (उसाचा रस, शीतपेये,ज्युस इत्यादी) | १,०००/- | ५,००/- |
| १५ | कॅटरींग चे काम | २,०००/- | १,०००/- |
| १६ | रेडीमेड कपाडयाची दुकाने | | |
| | १) ५०० चौ.फूट च्या आतिल क्षेत्रफळाकरिता | २,०००/- | १,०००/- |
| | २)५०० चौ.फूट पेक्षा जास्त क्षेत्रफळाकरिता | २,५००/- | १,५००/- |
| १७ | बुट चप्पल विक्री | २,०००/- | १,०००/- |
| १८ | औषध विक्री<br>१) होलसेल विक्री (स्टॉकिस्ट व डिस्ट्रीब्युटर्स) | १,५००/- | ७५०/- |
| | २) किरकोळ विक्री (मेडिकल स्टोर्स द्वारा) | १,०००/- | ५००/- |
| १९ | इलेक्ट्रिक वस्तू/हार्डवेअर/स्पेअर पार्ट | २,०००/- | १,०००/- |
| २० | गॅरेज/वाहनांचे स्पेअर पार्ट/सर्व्हिसींग<br>१) २०० चौ.फुट च्या आतिल क्षेत्रफळाकरिता | २,०००/- | १,०००/- |
| | २)२०० चौ.फुट पेक्षा जास्त क्षेत्रफळाकरिता | ५,०००/- | २,५००/- |
| २१ | फोटो स्टुडिओ/व्हिडीओ शुटिंग | १,५००/- | ७५०/- |
| २२ | बिल्डींग मटेरियल सप्लायर्स | ५,०००/- | २,५००/- |
| २३ | विविध प्रकारच्या लाद्या साठविणे व विक्री करणे | ४,०००/- | २,०००/- |
| २४ | खाजगी रूग्णालय/नर्सिग होम | ५,०००/- | २,०००/- |
| २५ | दवाखाने | १,५००/- | १,०००/- |
| २६ | मटण/चीकन/बीफ शॉप | २,५००/- | १,२५०/- |
| २७ | गुरे ठेवण्याचा तबेला | | |
| | १) १० किंवा अधिक परंतू २०पेक्षा अधिक गुरे नाही. | २,०००/- | १,०००/- |
| | २) २१ ते ३५ गुरांकरिता | ३,०००/- | १,५००/- |
| | ३) ३६ ते ५० गुरांकरिता | ५,०००/- | २,५००/- |
| | ४) ५१ ते १०० गुरांकरिता | ७,५००/- | ३,७५०/- |
| | ५) १०० पेक्षा अधिक गुरांकरिता | १०,०००/- | ५,०००/- |
| २८ | भांडी कारखाने (१० पेक्षा जास्त कर्मचारी) | ५,०००/- | २,५००/- |
| २९ | भांडी कारखाने (१० पेक्षा कर्मचारी) | ३,०००/- | १,५००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३० | इलेक्ट्रीक शोरूम (टि.व्हि,फ्रिज इत्यादी वस्तू विक्री | | |
| | १) ५०० चौ.फुट च्या आतिल क्षेत्रफळाकरिता | ५,०००/- | २,५००/- |
| | २) ५०० चौ.फुट पेक्षा जास्त क्षेत्रफळाकरिता | १०,०००/- | ५,०००/- |
| ३१ | वाहनांचे शोरूम | | |
| | १) तिन व चार चाकी वाहने | १०,०००/- | ५,०००/- |
| | २) दोन चाकी वाहने | ५,०००/- | २,५००/- |
| ३२ | सोने/चांदी दागीने | | |
| | १) फक्त दागीने तयार करणे | ५,०००/- | २,५००/- |
| | २) शोरूम/पेढया | ३,०००/- | २,०००/- |
| ३३ | पान,बिडी, सिगरेट शॉप | ३००/- | १,५०/- |
| ३४ | पीठाची चक्की/मसाला चक्की | ३,०००/- | १,५००/- |
| ३५ | किराणा सामान विक्री | | |
| | १) किरकोळ विक्री | १,०००/- | ७,५०/- |
| | २) घाउक विक्री | २,०००/- | १,०००/- |
| ३६ | कापड विक्री | | |
| | १) २५० चौ फूट च्या आतील क्षेत्रफळाकरिता | १,०००/- | ७,५०/- |
| | २) २५० चौ फूट पेक्षा जास्त क्षेत्रफळाकरिता | २,०००/- | १,०००/- |
| | ३) मिल्सची शोरूम | ७,०००/- | ३,५००/- |
| ३७ | टेलरिंग काम | १,५००/- | १,०००/- |
| ३८ | धाबा (फक्त जेवणाकरिता) | ५,०००/- | २,५००/- |
| ३९ | क्लब हाउस | १५,०००/- | ७,५००/- |
| ४० | लिकर विक्री | | |
| | १) वाईन शॉप | ५,०००/- | २,५००/- |
| | २) बिअर शॉप | ३,०००/- | १,५००/- |
| ४१ | व्हिडीओ पार्लर | ३,०००/- | १,५००/- |
| ४२ | पेट्रोल पंप | १०,०००/- | ५,०००/- |
| ४३ | बेकरी | | |
| | १) बेकरी उत्पादन फक्त तयार करणे | ५,०००/- | २,५००/- |
| | २) बेकरी उत्पादन फक्त विक्री | २,०००/- | १,०००/- |
| ४४ | टयुशन क्लास | | |
| | १) २५० चौ.फूट च्या आतील क्षेत्रफळाकरिता (प्रायव्हेट) | २,०००/- | १,०००/- |
| | २) २५० चौ.फूट पेक्षा जास्त क्षेत्रफळाकरिता (प्रायव्हेट) | ३,०००/- | १,५००/- |
| ४५ | ऑफिस | | |
| | १) इस्टेट एजंट | १,०००/- | ५००/- |
| | २) वास्तुविशारद | २,०००/- | १,०००/- |
| | ३) कन्संल्टंट | २,०००/- | १,५००/- |
| | ४) पतसंस्था | ४,०००/- | २,०००/- |
| | ५) विकासक | ५,०००/- | २,५००/- |
| | ६) इतर | ३,०००/- | १,५००/- |
| ४६ | स्टेशनरी व इतर साहित्य | २,०००/- | १,०००/- |
| ४७ | इतर सर्व साधारण आस्थापनाकरिता ना हरकत दाखले | २,०००/- | १,०००/- |
| ४८ | सीजनल-परवाना-फटाके, जत्रा इत्यादी | | |

वरील सुधारीत दराचा फेरविचार व्हावा. तसेच नाहरकत दाखला देताना महापालिका स्थापन (२००२) झालेल्या पूर्वीच्या इमारतीमधील व्यापाऱ्यांना परवाना देतांना सोसायटीचा नाहरकत दाखला मागणी करु नये. पण त्याठिकाणी जर ज्वलनशील पदार्थाचे व्यवसाय असल्यास अग्निशमन खात्यची तसेच मास मटन विक्री व्यवसाय असल्यास आरोग्य खात्याकडून कायदेशीर नाहरकत दाखला घेणे बंधनकारक राहिल. परवाना देण्याची कार्यवाही सुटसुटीत व सोपी करण्यात यावी जेणेकरुन व्यपारी वर्गास नाहरकत दाखला देणे / नुतनीकरण करुन मिळणे सोपे जाईल.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल** **अनुमोदन :- श्री. शरद पाटील**

**शरद पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

(सभागृहात गोंधळ)

**आसिफ शेख :-**

सन्मा. पिठासीन अधिकारी या ठिकाणी सन्मा. सदस्य मिलनजी म्हात्रे यांनी या ठिकाणी जे उल्लेख केलेले आहे. घोडेबाजार भरलेला मा. आयुक्त पदाचा वगैरे.

**मा. महापौर :-**

आपण एक मिनिट बसून घ्या.

**आसिफ शेख :-**

मी त्या विषयावर बोलत नाही.

**मा. महापौर :-**

आपण एकदा बसून घ्या.

**आसिफ शेख :-**

मी ठरावाचे बोलत नाही.

**मा. महापौर :-**

ठराव अजून झालेच नाही तर परवानगीचा प्रश्न येत नाही.

**आसिफ शेख :-**

तुमच्या कामकाजाची अशी पध्दत असेल ........

**मा. महापौर :-**

तुम्ही एक मिनिट बसून घ्या. मिटींग चालू होने से पहले मैने आपको निवदन किया था। परमिशन लेकर आप बोलिए। अन्यथा आप दोनो आपस मे लढते रहते हो। फिर उसमे सभा का टाईम हो जाता है। और शहर का नुकसान भी होता है। तो कृपया करके नेक्स्ट टाईम से आप विदाउट परमिशन कोई भी खडे नही होंगे। इसकी आप कृपया जानकारी लिजिए। अन्यथा जो अधिकार मे है। उस हिसाब से नियम से नियम बजाए जायेंगे और सन्मा सदस्या शानु गोहिल मॅडमजी मैने आपको बोला था आप बैठीये आपको मै टाईम देता हूँ।

**शानु गोहिल :-**

मैने आपसे परवानगी ली। सन्मा. सदस्या प्रभात ताई ने बोला उसके बाद मैने बोला।

**शरद पाटील :-**

प्रस्ताव कोणाचा आहे?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी बोलीए।

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्या शानु गोहिल ह्या ठराव वाचत असताना त्यांनी तेव्हा ठराव का वाचला? ही पध्दत बरोबर नाही ना. ह्यांनी ठराव का वाचू दिला नाही. ह्यांनी पहिला गोंधळ का घातला? ही पध्दत बरोबर नाही. चालणार नाही. हा ठराव वाचताना गोंधळ का केला त्यांना वाचायचे होते ना.

(सभागृहात गोंधळ)

**निर्मला सावळे :-**

आम्ही वाचलेला ठराव तुम्ही सभेमध्ये वाचून दाखवा.

**शरद पाटील :-**

ज्याचा प्रस्ताव आहे त्याला आपण बोलायला देत नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

म्हणून त्यांना दोन वेळा ठराव वाचायला देणार का?

**शरद पाटील :-**

ज्याचा प्रस्ताव असतो त्याला आपण बोलायला देतो.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्या शानु गोहिल ठराव मांडताना त्यांनी गोंधळ का घातला?

**मा. महापौर :-**

दोघांच्या ठरावाचे वाचन झाले. त्याची प्रोसिडींग पण झालेली नाही. रेकॉर्डींग पण झालेली नाही. आणि सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांना परवानगी दिलेली आहे. त्यांना ठराव किंवा जे काही ते वाचावे.

**एस. ए. खान :-**

अजून रिपोर्टींग झालेली नाही. सन्मा. सदस्या शानु गोहिल मॅडम.....

**चंद्रकांत वैती :-**

आमचा ठराव आम्ही वाचलेला आहे. तो आपण स्विकारलेला आहे. आम्ही परत तो वाचून देणार नाही. (सभागृहात गोंधळ)

**चंद्रकांत वैती :-**

आपल्याला ठराव दिलेला आहे. मग त्यांनी वाचला व पाठवला. तर मग परत ठराव कशाला वाचतात?

**एस. ए. खान :-**

ते ठराव परत कशाला वाचतात?

**चंद्रकांत वैती :-**

त्यांनी वाचता वाचता सांगतात की, घेवून आपल्याकडे आलेले. मग परत ठराव वाचायची गरज काय आहे? मा. महापौर साहेब, आमचा ठराव पहिला दिलेला आहे. त्यांचे वाचन सचिवांनी करावे. औषध वितरण किती लागले ते पहिले बघा. त्यांनी स्वतःनेच ........

**एस. ए. खान :-**

सुचक अनुमोदक सब कुछ हो गया।

**चंद्रकांत वैती :-**

आपण रेट कशाला ठरवता? रेट तर प्रशासनाने ठरवायला पाहिजे ना. प्रशासन काय भुमिका घेते? रेट काय नगरसेवकांनी ठरवायचे असतात का? रेट तुम्ही ठरवायचे? रेट ठरवणारे लोकप्रतिनिधी काय मग, प्रशासनाने काय ठरवले? लोकप्रतिनिधीने रेट ठरवायचे काय?

**चंद्रकांत मोदी :-**

प्रशासन का काम यह करेंगे क्या?

**एस. ए. खान :-**

हे मटन, चिकन खात नाही. लॉजमध्ये जात नाही. तर त्यांना रेट कसे काय माहिती पडले?

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर महोदय, हा विषय 'ज' च्या प्रस्तावामध्ये आलेला आहे. सन्मा. सदस्य शानु गोहिल ह्या प्रकरणाचा ठराव वाचत असताना मा. आमप्रकाशजी यांनी ठराव वाचायला सुरुवात केली त्यावेळेला जर आम्हाला मोठेपणा दाखवला असता तर, त्यांचा ही ठराव व्यवस्थित ऐकायला आला असता आणि तुम्ही तर परत पण तो ठराव वाचला. वाचला तर वाचला. हा ठराव आहे. आर्थिक निर्णय होतो तर आर्थिक निर्णयाचे निकष ठरवण्याचे अधिकार आपल्याला आहेत का? रितसर हा विषय विषयपटलावर यायला पाहिजे होता. प्रशासनाकडून याबाबत टिपणी यायला पाहिजे होती. 'ज' च्या प्रस्तावामध्ये हा विषय येण्याऐवजी आपल्या माहितीसाठी सांगतो. आमचा जो ठराव होता. ह्या ठरावामधल्या ओळी सचिवांनी वाचाव्या. त्या ठरावामध्ये स्पष्टपणे जे विषय महत्वाचे आहेत ते बोललेले आहेत. धोरणात्मक निर्णय आहे. आर्थिक निर्णय होतो. आणि ज्यावेळेला सभेच्या सुरुवातीलाच आपण लॉजचा विषय घेतला. ह्याबाबतीत सर्व सदस्यांच्या भावना अतिशय तीव्र आहेत, संतापजनक आहेत. त्यात काही वाद नाही. परंतु, लॉजचे रेटदेखील आपण ठरवले. आपल्या शहरात लॉजचे रेट पण आलेत?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्या देशामध्ये कायद्यामध्ये सर्व गोष्टी अपेक्षित आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

निदान तेवढे प्रकरण वगळून आपण शासनाला द्यावे. प्रशासनाला द्यायला पाहिजे होते. ह्या विषयात शासनाने निर्णय घ्यावे की, धोरणात्मक निर्णय आपल्याला 'ज' च्या प्रस्तावातून आणता येते का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, ठराव मैने दिया है। इसकी पार्श्वभुमी मै आपको बताना चाहता हू। ठराव मैने दिया है। खतगांवकर साहेब ठराव मी दिलेला आहे. मी ठरावाचे वाचन केलेले आहे. ह्यापूर्वी मा. महापौर साहेबांना दि. २८/११/२००७ हा ठराव मा. महासभेमध्ये घेण्यासाठी प्रस्ताव दिला. मा. महापौरांनी तसे आदेश संबंधीत खाते अधिकाऱ्याला दिले की, तुम्ही हा प्रस्ताव येत्या महासभेत आणावे. संबधीत खात्यांनी तसा प्रस्ताव मा. महासभेच्या टिपणीमध्ये आणलेला नाही. त्यानंतर मी 'ज' चा प्रस्ताव तयार केलेला आहे. ह्याच्यामध्ये उद्देश समजून घ्यावे. महापालिकेच्या व्यापाऱ्यांना लायसन्स देण्यासाठी दोन पत्रके निघालेले आहे. एका

पत्रकामध्ये महापालिकेमध्ये जावक क्रमांक दिलेला आहे. ५० रु. शुल्क फॉर्म फी दिलेली आहे. ते ऑफीशियल पत्र महानगरपालिकेच्या खात्यातुन निघालेले आहे. दुसऱ्या बाजुला महापालिकेने जाहिरातीचे एक पत्र काढलेले आहे. त्यामध्ये संबंधीत खात्याने १०० रु. फी फॉर्मचे घेतलेले आहे. एकाच डिपार्टमेन्टमधून दोन तऱ्हेचे फॉर्म देतात एकाचे तुम्ही ५० रु. ला देतात. आणि दुसरे परिपत्रक १०० रु. ला देतात. म्हणजे या शहरामध्ये जे व्यापारी तुम्हाला उत्पन्न देतात त्यांना फसवण्याचे काम हे प्रशासकीय अधिकारी करत आहे. मा. महापौर साहेब, ही गंभीर बाब आहे. एका बाजुला तुम्ही पत्र पाठवता, नोटीस पाठवता. ५० रु. फी भरा आणि नुतनीकरण करुन घ्या आणि नविन दाखला घ्या. दुसऱ्या बाजुला तुम्ही १०० रु. फीसाठी म्हणजे त्यांच्यावर किती अन्याय झालेला आहे. जेव्हा हा प्रशासकीय ठराव झाला. त्यावेळी मा. आयुक्त साहेबांनी ठराव केला होता. त्यामध्ये सर्व बाबींचा उल्लेख झाला नव्हता. म्हणून कुठल्या व्यापाऱ्याने किती पैसे भरायचे. हे ही कोणाच्या लक्षात आले नव्हते. त्यानंतर हा विषय एकवेळा नाही तीन वेळा बजेटच्या वेळी उपस्थित झाला की, २००२ मध्ये झालेला ठराव आज २००७ चालू आहे. व्यापारी पैसे भरायला तयार आहे. आपण बजेटमध्ये २ कोटी रु., ३ कोटी रु. चे उत्पन्न दाखवतो. ते होत नाही. ह्याचे कारण म्हणजे प्रशासकीय अधिकारी पेचमध्ये येते. कुठल्या खात्याला किती पैसे लावायचे म्हणून हा सुधारीत दर जो आम्ही दिला संबंधीत खात्याला त्यांनी पण त्याच्यामध्ये सांगितले की, हे करा. तुमचे बरोबर आहे. मी रितसर ठराव आणतो तरी त्यांनी ठराव आणलेला नाही. जर खरोख ह्या शहराच्या उत्पन्नामध्ये वाढ करायची असेल, व्यापाऱ्याला न्याय द्यायचे नसेल, कुठलेही राजकारण नाही. जर खरोखर सगळ्या व्यापाऱ्यांनी दिला नाही पाहिजे तर ह्या व्यापाऱ्यांच्या उत्पन्नामध्ये, शहराच्या उत्पन्नामध्ये महापालिकेला उत्पन्न मिळाले पाहिजे. मग हा ठराव २००२ सन्मा. सदस्य वैती साहेब आपण उपमहापौर म्हणून पाच वर्षे होता. तुम्ही कधी ह्याच्यावर विचार केला नाही. जेव्हा दोन वेळा, तीन वेळा आम्ही या शहराबद्दल ह्या ठरावामध्ये मा. महासभेत मी चर्चा केली. पण कोणी ह्या ठरावावर गांभीर्य घेतले नाही. कारण व्यापाराची कोणाची पडलेली नाही. मा. महापौर साहेब, मी आपल्याला विनंती करतो. आम्ही ठराव मांडलेला आहे.जर एखादा ठराव ह्यांचा असेल तर माझी काही हरकत नाही. ह्या मागच्या प्रशासकीय ठरावाला फेरबदल करुन आम्ही नविन सुचना करुन ठराव दिलेला आहे. आणि असा ठराव 'ज' च्या प्रस्तावामध्ये असा ठराव देतो आणि जर प्रशासनाने तसा खुलासा करावा आणि मतदानाची इच्छा असेल तर मतदान घ्यावे. नाहीतर आपण आदेश द्या की, ह्याच्यामध्ये बंधनकारक करत नाही. हा ठराव तुम्ही कायम करा. त्याच्यात कुठे रेट कमी जास्त असेल तर सुधारणा करावी. आणि त्याच्यामध्ये कोणाची सुचना असेल तर मी मान्य करायला तयार आहे. पण व्यापाऱ्यांचा आणि महापालिकेचा उत्पन्नाच्या दृष्टीने हा ठराव ह्या सभागृहामध्ये मंजुर व्हावा अशी आपल्याला आमची विनंती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, सदर प्रस्ताव चर्चेला आला आहे. आपल्या माहिती करिता सांगतो की.......

**आसिफ शेख :-**

सन्मा. पिठासीन अधिकारी ह्या ठिकाणी लक्ष अत्यंतपण महत्वाच्या विषयासाठी वेधू इच्छितो १४ की १५ तारखेला संक्रांत आहे. आणि नागपूर शहरात दुर्देवी घटना घडलेली आहे. आपल्याकडेच डी.आय.जी. होते. डॉ. सत्यपाल सिंग आता त्या ठिकाणी नागपुरचे डी.आय.जी. आहे. त्यांचा १२ वर्षाचा मुलगा काल त्याच्या वडीलांच्या मोटार सायकलच्या मागे बसून जात होतो. पतंग उडवायचा जो मांजा असतो तो काचेचा मांजा असतो. त्या काचेच्या मांजामुळे त्या मुलाचा मृत्यु झाला आणि ही घटना फार दुर्देवी झालेली आहे. एकुलता एक मुलगा आहे. पूर्ण नागपुर शहराला त्याचे दुःख झाले आहे. तर, आपल्याकडे असा प्रकार होता कामा नये. ह्यासाठी आपण आपल्या परिसरातील जेवढे पतंग विक्रेते आहेत. मांजे विक्रेते आहेत ह्यांना आपण आपल्या अधिकाऱ्यांमार्फत निर्देश द्यावे की, काचेचा मांजा कृपया कोणीही वापरु नये. साधा मांजा जो असेल तो साधा धागा पंतगसाठी वापरण्यात यावे. ह्याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन असा प्रकार आपल्या हद्दीत होता कामा नये. ह्यांकडे आपण कृपया लक्ष द्यावे. एवढेच मला बोलायचे होते. धन्यवाद.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. मी लक्ष देतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य आसिफ शेख साहेबांची चांगली सुचना आहे. अंमलात आणली पाहिजे. प्लॅस्टीकच्या पिशव्यांचा ठराव पास झाला. पण त्याची अंमलबजावणी अजून काही होत नाही, झाली नाही. मी पण सभागृहामध्ये एवढ्या वर्षापासून आहे. साहेब, हा प्रस्ताव आलेला आहे. ह्या शहरामध्ये मी एक छोटा व्यापारी आहे. माझे स्वतःचे गुमास्ताचे लायसन्स आहे. गेल्या २८ वर्षापासून मी माझा उद्योगधंदा ह्याच शहरामध्ये व्यवस्थित करतो. गेल्या ७ वर्षापासून नगरसेवक आहे. मला एवढे माहित आहे की, ३१ मार्चला जे बजेट आपले फायनल होते ते बजेट फायनल व्हायच्या अगोदर म्हणजे जानेवारी पासून प्रोसेस चालू होते की, येत्या वर्षाचा बजेट आपल्या महापालिकेचा जमा आणि खर्च हा कसा असावा ह्याच्यावरती आम्ही सर्व नगरसेवक लोक साधक - बाधक विचार करुन प्रत्येक लेखा शिर्षामध्ये त्याची मांडणी करत असतो. सर्व प्रथम स्थायीला बजेट होतो. त्यानंतर मा. महासभा फायनल करते आणि शेवटचे होणारे जे फिगर्स आहे ते त्या -

त्या डिपार्टमेन्टला पाठवले जातात. आज आपण जानेवारी महिन्यामध्ये आहोत. तर, तुम्ही आज हा ठराव वाचून कायम केला. आणि त्याचे इम्प्लीमेन्टेशन आज संध्याकाळपासून सुरु झाले. तर येत्या दोन वर्षात, दोन महिन्यामध्ये जी शेवटची अंतिम वसुली आहे. आता तुम्ही झाले साहेब, तुम्ही आढावा बैठक घेतात. आमच्या स्टॅन्डीगला आता तीन -चार वेळा बैठका झाल्या. त्याच्यात अधिकाऱ्यांवर ती आपण अंकुश ठेवतो की, तुमच्याकडून वसुली का झाली नाही? आणि ती वसुली त्यांनी करावी. असे आपण त्यांच्यावर सक्ती करतो. हे करत असताना आता राहिलेल्या रेटनुसार जर त्यांना आपण आदेश दिलेले आहे की, ती वसुली करा आणि त्यांनी केली पण उद्या कोणी एखादा अधिकारी बोलेल की, माझ्या बाजुच्या दुकानदाराला हा रेट लागला आणि मला हा रेट लागतो. वसुली करिता ३१ मार्च हे आपले फायनल वर्ष आहे. तिथंपर्यंत सन्मा. सदस्यांनी कुठे तरी हस्तक्षेप करु नये असे मला वाटते. कारण आता त्यांच्या पक्षाचे सदस्य सुध्दा त्यावेळेला स्थायी समितीमध्ये होते. ज्यावेळेला हे रेट नक्की झाले. मा. महासभेत सुध्दा त्यावेळी बसले होते. हे रेट नक्की झाले. त्यावेळेला आपण मंजुरी दिली. आणि आज एकदम ५० टक्के डेफिसेन्ट अमाउंट होते. म्हणजे एक करोड रुपये वसुल करायच्या आत तर आपले ५० लाख रु. त्यांना सोडायचे आहेत. हे जे डेफीसेसनचे जे अमाउंट आहे उद्या मी प्रस्ताव देतो की, ऑक्ट्रॉयचे रेट अर्धे करुया. व्यापारीला त्रास होतो. तुमच्या माहितीकरिता सांगतो. ऑक्ट्रॉयवाल्यांनी सुध्दा मोठमोठ्या फिगरच्या वसुल्या केल्या नाहीत. जाणूनबुजून सोडून दिले. काही प्रकरण नंतर येत आहेत आम्ही आहोत तिथे म्हणजे सांगायचा दृष्टीकोन असा आहे की, आपण एकीकडे रेट नक्की करायचे. मी रेट भरले. तुम्ही जे रेट नक्की केले ते रेट मी भरले. कशाला कुरबुड करायचे? साहेब माझे दुकान आहे. माझ्या इस्टॅब्लीशमेंट वर जो खर्च यतो. तो एक्सेप्टेबल असतो. तो पकडूनच माणूस व्यवसाय करतो. बिल्डर लोकांचे गेल्या तीन महिन्यामध्ये चार ते पाच हजार रु. वर फ्लॅटचे रेट गेले. ह्या ९० फुट रोडला जे १० लाख रुपयाचे दुकान मिळणार होते. ते आता ५० लाख रु. वर गेले. तर कुठला व्यापारी रडतो का? तिकडे दुकान खोलतात. इस्टाब्लीशमेन्ट चालू आहे. आता ही परिस्थिती भाईंदरमध्ये आहे ना. तुमच्या शहरामध्ये रेडी रेकनर रेट काय चाललेला आहे. हे तुम्ही बघितले का? आपण वर्षाला हजार रुपये भाव वाढवले. तिकडे फुटला चार हजार रु. वाढले. म्हणजे जो माणूस जो व्यापारी बँकेत लोन घेणार. आस्थापना चालवणार. कोणता माणूस लोन घेतो? ज्याची कॅपेसिटी नाही तो माणूस लोन घेतो. पण आज तो माणूस ५०-५० लाख रु. चे दुकान घेतो. शहरामध्ये १०-१२ लाख रु. खाली दुकानच नाही. साधा फ्लॅट घ्यायला घेतले तरी २० लाख रु. च्या खाली फ्लॅट नाही. ही परिस्थिती आहे. आपण ओरड करण्यात काय अर्थ आहे. जे इस्टाब्लीश बजेट आहे. जे इस्टाब्लीश फिगर्स आहेत. त्याला डॅमेज करण्याचा अधिकार कोणाला आहे? हा जो प्रस्ताव आहे तो ह्यांनी ३१ तारखेपर्यंत आणावा. त्यांचे सदस्य आहेत. आता स्थायी समितीचे मा. महासभेचे प्रस्ताव येतील की, महापालिकेचे या ठरावानुसार होणाऱ्या आर्थिक लाखो रुपयांचे नुकसान लक्षात घेवून मी माझे व्यक्तीगत सभागृहात विरोध नोंदवतो. सचिवांनी नोंद घ्यावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता जे डेफिसेन्ट बोललेले आहे. ह्याच्याबद्दल प्रशासकीय अधिकाऱ्यांनी खुलासा करावा. माझे हे मत आहे. ५० रु. फी आणि १०० रु. चे परिपत्रक हॅन्डबिल. ह्याचा ही खुलासा व्हावा म्हणजे महापालिका एका बाजुला ५० रु. फी ची नोटीस देतो आणि हॅन्डबिल १०० रु. चा काढतो. ह्याचाही खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी, आपण जो आता प्रस्ताव आणला त्याचे स्वगत करतो. काही ठिकाणी असे घडते ते मला दिसून आले. पण, हे जे चेन्जेस केले ते बजेटवर परिणाम घेणार आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माहिती घ्या ना.

**मा. महापौर :-**

बजेटवर परिणाम होणार आहे. आपण आता सभागृहाला जी माहिती दिली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही बजेटवर जे बोलता ते चुकीचे आहे. दोन कोटी रु. अपेक्षित केले होते. त्यावेळी फक्त ३० हजार रु. वसुली झाली होती.

**मा. महापौर :-**

वसुली वेगळा भाग आहे. मागणी वेगळा भाग आहे. आपण जो प्रस्ताव आणलेला आहे. नक्की स्वागतार्ह आहे. ह्याच्यामध्ये बरेचसे अजून राहून गेले असेल. ७९ नगरसेवक आहेत. काही नगरसेवकांना अजून माहिती नाही की, काय रेट आहे? किती कमी झाले? किती घ्यायला पाहिजे. आणि मी आपल्याला आश्वासन देतो की, पुढच्या मिटींगला रितसर प्रस्ताव आणू या. कारण का, खाली रेट कमी करुन लावू शकतो अशातला भाग नाही. तुम्ही बोलता की, दोन करोड रु. अपेक्षित करतो. आणि ३० हजार रु. ची आपण वसुली करता. कारण त्याच्यामध्ये काही नियम आहेत की, एखाद्याने लायसन्स काढलेले नाही. तर आपण त्याच्यावर काय कार्यवाही करायची? नियमसुध्दा त्यामध्ये नविन करुया. ज्यांनी लायसन्स घेतले नाही. पुढच्या मिटींगमध्ये रितसर तो विषय आणावा.

**चंद्रकांत वैती :-**

आमचा ठरावाच तसा आहे की, रितसर प्रस्ताव आणावा.

**शानु गोहिल :-**

ठराव तर वाचून झाला ना. तर सचिव साहेबांना ठराव वाचायला सांगा ना. ठराव दिलेला आहे ना.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, त्यांनी जो आधी ठराव मांडलेला आहे ना. त्याचा खुलासा करावा आणि ५० रु. ची फी आणि १०० रु. चे परिपत्रक काढले. त्याचा पहिला खुलासा करा ना.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची (२) 'ज' खाली जो प्रस्ताव दिलेला आहे ना. त्याबद्दल सर्वप्रथम मी खुलासा करतो. हा 'ज' चा प्रस्ताव करामध्ये फेरबदल करण्याचा आहे. अधिनियमामध्ये स्पष्ट तरतुदी आहेत काही सन्मा. सदस्यांनी येथे मांडलेले आहे. कोणत्याही करामध्ये फेरबदल करायचा असेल तर १ एप्रिल पूर्वी ते झाले पाहिजे आणि त्या आर्थिक वर्षामध्ये ते लागु व्हायला सोयीचे होईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रश्नच असा आहे की, ह्यामध्ये फेरबदल करायचा 'ज' चा प्रस्ताव असुच शकत नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी त्याचा खुलासा करतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

'ज' चाप्रस्ताव आणताच येत नाही. तोच महत्वाचा विषय आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याचा सविस्तर खुलासा करतो आणि आपल्या मा. महासभेमध्ये मागील बऱ्याच दिवसापासून मी ह्याच्यावर स्पष्ट कॉमेन्ट्स दिलेले आहेत. सन्मा. सदस्य भोईर साहेबांशी ही माझी चर्चा झालेली आहे. 'ज' चा प्रस्ताव कलम सेक्शन ४४ खाली काय म्हणतो. प्रश्न विचारता येतो. त्याच्यावर निर्णय होउ शकत नाही. त्याच्यावर सभागृहात सदस्याला........

**प्रफुल्ल पाटील :-**

आर्थिक बाब असेल तर निर्णय होवू शकत नाही. इतर बाब असेल तर निर्णय होवू शकतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब, तरी पण ते समावेश करुन घेणे म्हणजे 'ज' चा प्रस्ताव स्विकारले किंवा स्विकारले नाही. हा निर्णय होवू शकतो आणि त्यावर प्रशासनाने सविस्तर विषय पटलावर विषय घेवून त्याच्यावर सविस्तर निर्णय व्हायला पाहिजे. तर आपल्याकडे वेगळे पायंडे पडत आहेत. 'ज' च्या प्रस्तावाखाली निर्णय होत आहे. त्यात आर्थिक निर्णय होण्याचे संकेत होत आहे. हे घातक आहे. लोकशाहीला हे अपेक्षित नाही. सभागृहाच्या कामकाजाच्या नियमावली ह्या ठिकाणी स्पष्ट आहेत. 'ज' च्या प्रस्तावामध्ये पुरक प्रश्न विचारता येतो. आपण प्रस्ताव मांडला त्याबद्दल मी काही कॉमेन्ट करत नाही. प्रस्तावाची जी तरतुद आहे. त्याला मी अवगत करतो. सभागृह त्याच्यावर निर्णय करेल. ही वेगळी बाब आहे. पण 'ज' खाली सर्व कामकाज होत असेल. तर विषय पत्रिकेची आवश्यकता राहणार नाही.

**शरद पाटील :-**

'ज' च्या विषयावर ठराव होवू शकत नाही का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

'ज' च्या विषयावर अंतिम ठराव होवू शकत नाही. 'ज' चा विषय स्विकारला जावू शकतो.

**शरद पाटील :-**

त्यांनी आधीच ठराव का घेतला?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

'ज' चा प्रस्ताव आपल्या कोणाकडे कार्यान्वीत झाला ते मला सांगा ना. 'ज' चे प्रस्ताव आपल्याकडे १०० स्विकारलेले आहे. त्याच्यावर कुठे कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

खतगावकर साहेब, तुम्ही सभागृहाची दिशाभूल करु नये.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी आपल्याला अधिनियमात बोलतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या आधी 'ज' च्या ठरावामध्ये चार नेमणूका झालेल्या आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

धोरणात्मक निर्णय कोणत्याही कार्यविहित 'ज' च्या प्रस्तावाखाली झालेले नाही. आणि होणार सुध्दा नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही प्रोसिडींगमध्ये नोंद करा आणि 'ज' च्या प्रस्ताव होवू शकत नाही. हे पहिली नोंद करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नोंद घ्या ना. मी बोलतो तर ते नोंद होणार आहे. दुसरी बाब आर्थिक प्रस्तावासाठी कलम १४९ प्रमाणे रितसर प्रशासनाने प्रस्ताव दिला पाहीजे. आणि दरामध्ये फेरबदल असेल तर स्थायी समितीमध्ये चर्चा होवून मा. महासभेमध्ये यायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

खतगावकर साहेब, ह्यापूर्वी 'ज' चे प्रस्ताव सभागृहामध्ये आलेले आहे आणि पास केलेले आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब, 'ज' खाली कसलेही प्रस्ताव आलेले नाही. आणि ते अंतिम झालेले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी देतो.

**श्रीप्रकाश सिंग :-**

आप ऐसे क्यो. बोल रहे है की, प्रस्ताव आया नही। आप पहले देख लिजिए प्रस्ताव आया की नही?

**चंद्रकांत वैती :-**

एक गोष्ट मी निदर्शनास आणतो. त्याच्या प्रस्तावामध्ये लॉजींग - बोर्डींगला महापालिकेने १५ हजार रु. लावले होते. ह्यांनी ७ हजार ५०० रु. का केले?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, क्यों किया? तुम्ही दुसरा ठराव मांडा ना.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, त्यांनी जे मांडले त्याच्यात त्यांनी सांगितले. ह्याच्यात कुठे वाढवायचे असेल तर वाढवू शकता असे त्यांनी मांडलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर साहेब, ह्या ठिकाणी सभागृहामध्ये मगाशी असा एक विषय निघाला की, ह्या शहराला आयुक्त नाही. त्याच्यामुळे ह्या शहराचे कामकाज एकदम बंद आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, माझ्या ठरावाचे निर्णय द्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

निर्णय कशाला? चर्चा चालू आहे ना.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी आप बैठीए।

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्हीच बोलता, तुम्हीच निर्णय मागता. खरं म्हणजे तुम्ही निर्णय दिलेला आहे. मगाशी अशी चर्चा चालली होती की, मा. आयुक्त साहेब ह्या शहराचे नाही, या महापालिकेचे नाही. मा. आयुक्तविना कारभार चाललेला आहे. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल साहेबांचा प्रस्ताव बघितला तर मा. आयुक्त नेमायची गरज नाही. ह्यानांच प्रशासन देवून टाका. हा विषय कर बसवण्याचा कर वाढवण्याचा संपूर्ण प्रशासनाचा आहे. कुठल्याही नगरसेवकाला कर कसे असावे कसे बसवावे हे वैयक्तिकरित्या कुठलेही अधिकार नाही. हा विषय पॉलीसी मॅटर आहे. स्थायी समितीने, प्रशासनाने किंवा मा. महासभेने मा. महापौरांच्या परवानगीने एखादा विषय जर आणला तर त्या विषयानुसार योग्य ते रेट बदलने किंवा सुधारीत रेट देणे किंवा कमी करणे हा अधिकार मा. महासभेमध्ये प्रत्येंक नगरसेवकाला मत मांडण्यासाठी मिळते. परंतु, एकतर्फी प्रशासक, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी एक टेबल तुम्हाला दिलेले आहे. की, त्याप्रमाणे तुम्ही काम करा. आणि ते काय सांगतात. तुम्हाला कमी करायचे असेल तर तेमला सांगा. म्हणजे त्यांना मागच्या दाराने भेटा. आता त्यांना ह्या शहराचा किती कळकळा आहे. त्यांनी लॉजचे रेट १५ हजार वरुन साडेसात हजार रु. केले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही चुकीचे बोलता १५ हजार रु.चे आहे. नुतनीकरणचे ७ हजार ५०० रु. आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही जे विषय मांडता ते विषय मांडले की नाही ते जरा विचार करा.

**शरद पाटील :-**

लॉजींग बोर्डींग १५ हजार रु. आहे. मा. महापौर साहेब हा चुकीचा मॅसेज घालू नका. लॉजींग बोर्डीगचे १५ हजार रु. आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही सरळ सरळ ११ नंबरला लॉजींग बोर्डीगला १५ हजार लिहलेले आहे. आणि तीन वर्षाकरिता साडेसात हजार रु. लिहलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नुतनीकरण आहे.

**चंद्रकांत वैती :-**

तुम्ही कमीच केले ना. तुम्ही अर्ध्यावर आणले ना.

**प्रफुल्ल पाटील :-**

दुसरी बाब बघा. ह्यांना सौंदर्य प्रशासन, ब्युटी पार्लरचे रेट वगैरे कमी करायची किती हौस आहे. त्याच्या व्यतिरिक्त ते त्याच्याशी संबंधीत आहे तो व्यवसाय मेडीकल औषध विक्री ते सुध्दा १५०० रु. वरुन ७५० रु. केले. हजार रु. वरुन ५०० रु. केले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही चुकीचे बोलू नका. १५०० रु .....

**चंद्रकांत वैती :-**

व्हीडीओ पार्लरचे पण नोंद आहे. ह्यांनी आंदोलन केले होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही चुकीचे बोलू नका.

**प्रफुल्ल पाटील :-**

आता ह्यांनी मोठ्या मोठ्या लोकांचे ......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य पाटील साहेब, आपल्याला विषयच करायचा नाही. पुढच्या मिटींगमध्ये रितसर विषय आणायचा आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

हे काय बोलते की, तुम्हाला जर कमी करायचे असेल तर मला सांगा. म्हणजे प्रशासनाने ठरवले आणि आता आम्हाला गरज म्हणजे आम्ही रोज त्यांच्याकडे जायचे. साहेब, तुम्ही जरा कमी करुन द्या. भाईंदरच्या जनतेची ह्यांना खरोखर पडलेली होती. जसे व्यापाऱ्यांची पडलेली आहे. खास करुन मेडीकल फिल्ड लोकांची पडलेली आहे. तिथे १००० रु. चे ५०० रु. चे १५०० रु. चे ७५० रु केले. मग पाणपट्टी चे १०० रु. कशाला ठेवले? पान खात नाही. म्हणजे जो गरीब लोक आहे. त्यांचे आहे. तेच रेट ठेवले. ह्यांची जी फिल्ड आहे त्याचे अर्धे केले आणि हे प्रशासन नेमले त्यांना जरा तुम्ही सांगा की, अशा पध्दतीने आर्थिक व्यवहाराच्या बाबी जर त्या प्रस्तावाखाली आणता येत नाही.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. दुसरा विषय घ्या. पुढच्या मिटींगमध्ये रितसर विषय आणा. त्या अगोदर गटनेत्यांची बैठक घेउन चर्चा करुन घ्या. त्यानंतर रितसर विषय आणा.

(मा. महापौरांच्या आदेशाने सदरचा विषय तहकुब करण्यात आला.)

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे असे रुलिंग नसावे. कारण आता स्टॅन्डीगची मॅरोथॉन बैठक चालू होते. स्टॅन्डीगला अधिकार आहे. त्या हाउसला रेट नक्की करायचे. त्याच्यामध्ये डेफिसेशन होणार नाही. लक्षात घ्या. आपण महापौर आहात. परत हा विषय मा. महासभेत बजेटपुढे असा येणार आहे. त्यामुळे आपल्याला येथे कोणीही करायचे नाही. त्यांच्या ज्याकाही सुचना आहे. त्यांनी त्या स्टॅन्डीगला मांडाव्यात. स्टॅन्डीगला तुमचे जे काही असेल ते मांडा. आम्ही सर्व सदस्य आहोत. मा. महासभा आहे. बजेटच्या मा. महासभेपर्यंत हा विषय पेन्डीग ठेवावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पानपट्टीचे ३०० रु. आहे. म्हणजे सभागृहाची किती दिशाभूल करतात. माजी नगराध्यक्ष आपण आहात. वाचताना जरा नीट वाचा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य, प्रस्ताव वाचून दर अंतिम करु शकत नाही. पण आपण प्रस्ताव देवू शकता

(नगासचिवांनी प्रकरण क्र. १९ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत प्रशासकिय शिस्त लावणेबाबत.

(सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांनी प्रकरण क्र. १९ च्या ठरावाचे सभागृहात वाचन केले.),

**ठराव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत सध्या उपआयुक्त पदनामाची तीन पदे मंजूर आहेत. त्यापैकी एक पदावर महानगरपालिकेचे स्वतःचे उपआयुक्त व उर्वरित दोन पदावर राज्य शासनाकडील दोन अधिकारी प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१००५/वर्गीकरण/प्र.क्र.३७९/०५/नवि-२४ दि. ०४ मे २००६ नुसार शासनाने निश्चित केलेल्या आकृतीबंधाप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या 'ड' वर्गात समावेश असल्याने फक्त उपआयुक्त पदानामाची दोन पदे अनुज्ञेय आहेत. सदर शासन निर्णयानुसार मा. आयुक्त यांच्याकडे एक उपआयुक्तास कार्यमुक्त करणेबाबत कळविले असता त्यांनी दि. १५/०१/२००७ च्या पत्रान्वये दोन उपआयुक्त राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीने कार्यरत असल्याने त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी पूर्ण होईपर्यंत परत पाठवता येणार नाही असे कळविलेले होते. तथापि आयुक्तांनी एक उपआयुक्त (श्री. शेख) कार्यमुक्त झाल्यानंतर त्यांच्या जागी दुसऱ्या उपआयुक्तांची नेमणुक केली. वास्तविक राज्य शासनाला आयुक्तांनी नवीन शासन निर्णयानुसार तिसरा उपआयुक्त पाठवू नये असे कळवून तिसऱ्या नविन उपआयुक्तांची नेमणूक करावयास नकार द्यायला पाहिजे होता. परंतु महासभेची मान्यता न घेता आयुक्तांनी कार्यवाही केली आहे. दि. ०४ मे २००६ च्या शासन निर्णयानुसार फक्त दोनच उपआयुक्त अनुज्ञेय आहेत. एक उपआयुक्त महानगरपालिकेचा व एक उपआयुक्त राज्यशासनाचा असे प्रमाण ठेवणे बंधनकारक आहे. दोन्ही पदे एकाकी होत असल्याने त्यास आरक्षण लागू नाही. तथापि महानगरपालिकेतील अधिकारी महासभेत (ज) खाली आलेला प्रस्ताव दाखवून महापालिकेची दिशाभूल करुन कार्यवाही करित आहेत. अशाप्रकारे मा. महासभा दि. ०१/०६/२००७ विषय क्रमांक ५६ अन्वये केलेला ठराव रद्द करण्यांत येत आहे. अशा ठरावावर कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्यांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये कारवाई करावी.

तसेच दि. ०४ मे २००६ च्या शासन निर्णयानुसार दोनच उपआयुक्त अनुज्ञेय असल्याने प्रतिनियुक्तीवरील एक अधिकाऱ्यास कार्यमुक्त करुन शासनाकडे परत पाठविण्यांत यावे असा ठराव मांडत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

परत, तेच झाले. 'ज' मध्ये ठराव येतो का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता कसा ठराव होणार?

**मिलन म्हात्रे :-**

सभागृहाचा परत वेळ जाणार.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब, त्यांना बोलू या त्यांचे संपू द्या ते काय बोलतात ते.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या विषयात तुमचे रुलिंग झाले. ठराव टाकता येणार नाही. मग, ही चर्चा कशी काय सुरु होते.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे, त्यांना काय बोलायचे ते बोलू द्या.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तो नाही. त्यांनी 'ज' चा प्रस्ताव वाचलेला नाही ......

**शशिकांत भोईर :-**

प्रस्ताव वाचायची गरज काय आहे? सर्वांना प्रस्ताव दिलेला आहे. सर्वांनी वाचलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, पहिल्या प्रस्तावाचे वाचन सुरु झाले. त्याच्यानंतर ठरावाचे वाचन सुरु होते. आधी प्रस्तावाचे वाचन करावे. ठरावाचे वाचन करु नये. मी प्रस्तावक आहे. मी माझ्यावतीने प्रस्ताव वाचला पाहिजे. मी 'ज' चे प्रस्ताव भरपूर मांडले. त्यांनी प्रस्तावाचे वाचन करावे. आणि मग तुम्ही ठरवायचे की, हा ठराव घ्यायचा की नाही.

**मा. महापौर :-**

त्यांना काय बोलायचे आहे ते बोलू द्या. नंतर निर्णय घेवू ना.

**मिलन म्हात्रे :-**

प्रस्ताव वाचावे. पण, त्यांनी ठराव वाचायला सुरुवात केली. त्यांनी पहिला प्रस्ताव वाचवा. मी प्रस्ताव ठेवलेले आहे. प्रस्तावकांनी पहिला प्रस्ताव वाचावा. हा नियम आहे. तर त्यांनी प्रस्ताव वाचावे.

**शशिकांत भोईर :-**

मा. नगरसचिव साहेबांनी माझ्या प्रस्तावाचे वाचन करावे.

(नगरसचिवांनी सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी दिलेल्या 'ज' च्या प्रस्तावाचे वाचन केले.)

(मिरा भाईंदर महानगरपालिकेत प्रशासकिय शिस्त लावणेबाबत.)

**शशिकांत भोईर :-**

याच्यावर माझा ठराव आहे.

(सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी प्रकरण क्र. १९ च्या ठरावाचे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत प्रशासकिय शिस्त लावणेबाबत.

**ठराव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत सध्या उपआयुक्त पदनामाची तीन पदे मंजूर आहेत. त्यापैकी एक पदावर महानगरपालिकेचे स्वतःचे उपआयुक्त व उर्वरित दोन पदावर राज्य शासनाकडील दोन अधिकारी प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१००५/वर्गीकरण/प्र.क्र.३७९/०५/नवि-२४ दि. ०४ मे २००६ नुसार शासनाने निश्चित केलेल्या आकृतीबंधाप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या 'ड' वर्गात समावेश असल्याने फक्त उपआयुक्त पदानामाची दोन पदे अनुज्ञेय आहेत. सदर शासन निर्णयानुसार मा. आयुक्त यांच्याकडे एक उपआयुक्तास कार्यमुक्त करणेबाबत कळविले असता त्यांनी दि. १५/०१/२००७ च्या पत्रान्वये दोन उपआयुक्त राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीने कार्यरत असल्याने त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी पूर्ण होईपर्यंत परत पाठवता येणार नाही असे कळविलेले होते. तथापि आयुक्तांनी एक उपआयुक्त (श्री. शेख) कार्यमुक्त झाल्यानंतर त्यांच्या जागी दुसऱ्या उपआयुक्तांची नेमणुक केली. वास्तविक राज्य शासनाला आयुक्तांनी नवीन शासन निर्णयानुसार तिसरा उपआयुक्त पाठवू नये असे कळवून तिसऱ्या नविन उपआयुक्तांची नेमणूक करावयास नकार द्यायला पाहिजे होता. परंतु महासभेची मान्यता न घेता आयुक्तांनी कार्यवाही केली आहे. दि. ०४ मे २००६ च्या शासन निर्णयानुसार फक्त दोनच उपआयुक्त अनुज्ञेय आहेत. एक उपआयुक्त महानगरपालिकेचा व एक उपआयुक्त राज्यशासनाचा असे प्रमाण ठेवणे बंधनकारक आहे. दोन्ही पदे एकाकी होत असल्याने त्यास आरक्षण लागू नाही. तथापि महानगरपालिकेतील अधिकारी महासभेत (ज) खाली आलेला प्रस्ताव दाखवून महापालिकेची दिशाभूल करुन कार्यवाही करित आहेत. अशाप्रकारे मा. महासभा दि. ०१/०६/२००७ विषय क्रमांक ५६ अन्वये केलेला ठराव रद्द करण्यांत येत आहे. अशा ठरावावर कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्यांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये कारवाई करावी.

तसेच दि. ०४ मे २००६ च्या शासन निर्णयानुसार दोनच उपआयुक्त अनुज्ञेय असल्याने प्रतिनियुक्तीवरील एक अधिकाऱ्यास कार्यमुक्त करुन शासनाकडे परत पाठविण्यांत यावे असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर** **अनुमोदन :- सौ. नयना म्हात्रे**

**नयना म्हात्रे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

या अधिनियमाच्या कलम ४४ खाली अनुसूची प्रकरण २ 'ज' मध्ये सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेबांनी त्यांची इच्छा आणि त्यांचा प्रस्ताव या ठिकाणी त्यांनी मांडलेला आहे. तो मा. महापौरांनी विचारात घेवून प्रशासनाला निर्देश देणे अपेक्षित आहे. त्याच्यावर मला डायस पटला वरचे जे अधिकार आहे त्या अधिकाऱ्यात मी बोलतो. त्याचे धोरणात्मक निर्णय होणे अपेक्षित नाही. मग, प्रशासन अभिप्राय देईल. त्यावर धोरणात्मक निर्णय झाला पाहिजे.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेबांनी जो विषय आणलेला आहे. त्या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता या विषयाप्रमाणे स्पष्ट असे होते की, मिरा भाईंदर महानगरपालिका प्रायव्हेट लिमिटेड आपण काही अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करतो असा ठराव होतो. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अधिनियमानुसार मा. महासभेने दि. १२/०८/२००५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सर्व कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या आणि नियुक्त्यांसाठी पात्रता अर्हता ठरवण्याचे सेवा प्रवेश नियमांना मान्यता दिली होती. आणि यासाठी मा. महासभेने राज्यशासनाकडून ह्याची मंजूरी घेण्यासाठी एक पत्रव्यवहार शासनाशी केला होता. ज्याला शासनाकडून दि. २४/०५/२००५ रोजी मि.भा.न.प्र./११०६/०२/प्र.क्र./०२०६/नवि-२८, नगरविकास मंत्रालय ह्यांच्याकडून एक पत्र आले होते की, सेवाप्रवेश नियमामध्ये त्यांनी बऱ्याच म्हणजे ५० टक्के पेक्षा जास्त सुधारणा सुचवल्या होत्या. वास्तविक महापालिकेशी संबंधीत असलेला प्रत्येक विषय आपल्या विषय पत्रिकेवर मध्य प्रश्न इम्प्रिप्रेलेशन शासनाकडून आलेली पत्रे. विविध समित्यांकडून आलेले ठराव असे मा. महासभेचा अजेंडा देताना विषय येतात. ह्या विषयामध्ये शासनाकडून आलेले पत्र. म्हणून सन्मा. तत्कालीन आयुक्तांनी त्यावेळेला ते पत्र मा. महासभे समोर ठेवायला पाहिजे होते. लोकप्रतिनिधींच्या त्याच्या बाबतच्या त्यांनी सुचवलेल्या सुधारणा. ते पत्र जसे लोकप्रतिनिधीला लागू होते. तसेच ते पत्र प्रशासनाला देखिल लागू होते. प्रशासनाने त्याच्यात एवढे मोठे फेरबदल केलेले सुचवायला पाहिजे होते. उदा. महापालिकेने प्रतिनियुक्तीवरती येणाऱ्या पदाबाबत काही भुमिका घेतली नव्हती. परंतु, जे ह्या महापालिकेचे अधिकारी आहेत.

त्यांच्यामध्ये पाण्यासाठी अभियंता त्याची शैक्षणिक पात्रता काय असावी. शहर अभियंत्याची पात्रता काय असावी, कार्यकारी अभियंताची शैक्षणिक पात्रता काय असावी. त्याच्यामध्ये आपण आपले मत व्यक्त केले होते. परंतु, शासनाच्या नियमाप्रमाणे पी.डब्लू.डी. च्या नियमाप्रमाणे एक्झीकेटीव्ह इंजिनियरसाठी, सिटी इंजिनियर होण्यासाठी, ऑडीटर होण्यासाठी ज्या पात्रता आहेत. त्याच्यामध्ये पदवी प्राप्त त्याच्यासाठी त्यांचा शासकीय संस्थेने केलेला कामाचा अनुभव अशा काही आर्हता आणि नियम आहेत. आपण जो प्रकार केलेला आहे. त्याच्यामध्ये उपलब्ध असलेल्या अधिकाऱ्यांमध्ये असलेली शैक्षणिक पात्रता, अर्हता आणि अनुभव ह्याला अनुसरुन आपल्याकडे आपल्यापैकी आपल्या महापालिकेच्या कर्मचाऱ्यांपैकी कोणाला तरी पदोन्नती द्यायची आहे. कोणाला तरी ऑडीटर बनवायचे आहे. कोणाला तरी शहर अभियांता बनवायचे आहे, मग कोणाला तरी आयुक्त का बनवत नाही? आयुक्त पण आपल्याकडून निवडावा. उपायुक्त पण आपल्याकडून निवडावे. असे होत नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या ४५ ची एकमत जर असे म्हटले असेल, स्थायी समितीचे, मा. महासभेचे त्याला अधिकार आहे. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चा त्या कलमामध्ये चौथी सुधारणा अशी आहे की, त्या राज्य शासनाच्या अधीन राहून त्या नियुक्त्या करायच्या आहेत. आणि हा ही धोरणात्मक निर्णय आहे. मग हा 'ज' च्या प्रस्तावातून आणता येतो का? मागच्या काळामध्ये बऱ्याच भरत्या ह्या शहरामध्ये झाल्या. आस्थापनेचा खर्च ४२ टक्के गेलेला आहे. अशी तक्रार मी राज्य शासनाकडे केली. त्यांच्याकडून आपल्याकडे चौकशा आल्या. आपल्याकडून त्यांना मोगम उत्तरे दिली. कोणाला तरी वाचवण्यासाठी २८ टक्के, २९ टक्के, ३० टक्के असा खर्च केला. आस्थापनेचा खर्च दाखवताना राज्यशासनाला मेनक्रेडेट पत्र बनवून पाठवले. त्याच्यामध्ये जाणीवपूर्वक परिवहनचा २ करोड रुपये चा लॉस दडवला गेला. पाण्याचा लॉस १२ करोड रु. च्या आसपास आहे. तो दडवला जावा म्हणून पाण्याचे उत्पन्न दाखवले नाही. म्हणून पाण्याचा रेट दडवला गेला. विविध कन्सलटन्सी आपण नेमलेल्या आहेत. ह्या शहराचा कचरा उचलण्याचा ठेका ठेका पध्दतीने आहे. पावसाळे नाले सफाई ठेका पध्दतीने आहे. सुरक्षा रक्षक ठेका पध्दतीने आहेत. वन खात्यामध्ये १६५ कर्मचारी हे रोजंदारी कर्मचारी म्हणून काम करतात. फक्त दोन महिने त्यांना घरी बसायला सांगितले. फक्त आस्थापनेच्या खर्चामध्ये त्यांची नोंद येउ नये म्हणून आणि हा दडवलेला खर्च दाखवून ह्या अशा पध्दतीने प्रशासनाने शासनाला जी पत्रे पाठवली. कालसुध्दा मी मंत्रालयात होतो. ह्या विकास मी त्यांच्या निर्दशनास ज्या बाबी आणल्या ५ करोड रु. चे बिल देखील आणले. ५ करोड रु. चे टंडन समितीला, टंडन असोसिएटला जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन युनियन मिशनसाठी काम करण्याचे ते पॉईन्ट १९२५.३७ करोड रु. केंद्र सरकारकडून मंजुर करुन आणण्याचे काम त्याला दिले होते. आणि त्याच्या कमिशन पोटी आपल्याकडे एक रुपयासुध्दा आलेला नाही. मागे मा. महापौर साहेबांनी, मा. आयुक्त साहेबांनी प्रेस कॉन्फरन्स घेतली आणि त्याच्यामध्ये सांगितले ३९६ कोटी रु. आम्ही अंडर ग्राउंड ड्रेनिंग सिस्टिमसाठी हे मंजूर करुन आणले. त्याची तांत्रिक मंजूरी मिळाली. मी दुसऱ्या दिवशी मा. आयुक्त साहेबांकडे गेलो आणि सांगितले की, आपण कालच प्रेस कॉन्फरन्स घेतली. मग ह्याचे मंजूरी पत्र कुठे आहे. मंजूरी पत्र नाही आले. फक्त तांत्रिक मंजूरी मिळाली. मग जी तांत्रिक मंजूरी लक्षात ठेवून आधीच आपण टंडन असोसिएटला ३२ लाख रु. सी.डी.पी. चे दिलेले आहेत. आणि ५ करोड रु. चे बिल सादर करण्यात आले. जर त्याच्यावर मी ऑब्जेक्शन घेतले नसते. तर ५ करोड रुपयाचे बिल अदा केले गेले असते. मग, असे निर्णय आपल्याकडे घेणार आहोत काय? मग, ह्या गोष्टींना जबाबदारी कोणाची? आणि ह्या सगळ्या गोष्टी शासनाच्या निदर्शणास आणून दिलेल्या आहेत. दि. ०६/०५/२००७ चा जी.आर. आहे. तो जी.आर. ना.बा. पाटलांचा आहे. ना.बा. पाटीलांचा जी.आर. काय म्हणतो की, महानगरपालिकेच्या आस्थापनेचा खर्च ३० टक्के पेक्षा वर जाता कामा नये. आणि ३५ टक्के पेक्षा वर गेला असेल तर कुठच्याही प्रकारचे पदनिर्मितीचे किंवा नियुक्तीचे नविन प्रस्ताव शासनाकडे पाठवू नये. अत्यावश्यक बाब असल्या खेरीज ते पाठवू नये. असे स्पष्ट संकेत आहेत. मग, आपल्या मधलेच काही लोक विविध पदांकरीता नेमता येतील का? असा जर प्रकार असेल तर प्रशासनाने ह्या बाबतीत खुलासा करावा. जर, असे ठराव आणता येत असतील तर ह्या विषयात आमचाही एक वेगळा ठराव आम्ही आधी वाचून घेतो. सन्मा. सदस्य इनामदार साहेब, आपण आपला ठराव वाचून घ्या.

(सन्मा. सदस्य जुबेर इनामदार यांनी प्रकरण क्र. १९ च्या ठरावाचे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १९**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत प्रशासकिय शिस्त लावणेबाबत.

**ठराव क्र.**

मुंबई प्रांतिक महानगरअधिनियम १९४९ चे अधिनियमानुसार मा. महासभेने दि. १२/०८/२००५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीसाठी व नियुक्तीसाठी पात्रता व अर्हता ठरवणाऱ्या सेवा प्रवेश नियमाने मान्यता देउन मनपा / सा.प्र.३३०/२५९९/०५-०६ दि. २७/०२/२००६ च्या पत्रानुसार शासनाच्या मंजूरीसाठी सादर केला आहे. आजपर्यंत शासनाची मंजूरी मिळालेली नाही. दरम्यानचे काळात सेवा प्रवेशनियमाना अनुसरुन मोठया प्रमाणात महापालिकेकडून पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत. दि.२४/०५/२००५ रोजी मि.भा.न.प्र.-११०६-०२/प्र.क्र.०२/०६/न.वि.-२८ नगर विकास विभाग मंत्रालय, मा.कक्ष अधिकारी नगरविकास विभाग यांच्याकडून प्रस्तावित सेवा प्रवेश नियमामध्ये बदल करण्याचे अनिवार्य असल्याबाबतचे पत्र

दिले असून सदर पत्रानुसार सेवा प्रवेश नियमामध्ये सुधारित करुन प्रस्ताव महासभेने सादर करायला पाहिजे होता. त्या पत्राच्या अनुशंगाने महासभेसमोर सुधारित प्रस्तावासाठी मा. आयुक्तांनी जाणीवपूर्वक विषय न आणता पत्र क्र. दि. १५/९/२००६ मनपा/आस्था/१००/१३४७/०६-०७ नुसार शासनास सदर बाबत पुर्तता करण्याचे काम सुरु असल्याचे थातूर मातुर उत्तर देउन वेळ मारुन नेली आहे. त्यामुळे महापालिका सेवा प्रवेश नियमा शासनाकडून मंजूर करुन घेउ शकली नाही. मात्र महापालिकेच्या ठरावाप्रमाणे पदोन्नत्या देउन महापालिकेचा आस्थापनेवर मोठया प्रमाणात नियुक्त्या व पदोनित्या देण्याचे काम सुरू केले आहे. त्यामुळे महापालिकेच्या आस्थापनेच्या खर्च ४२ टक्केचे वर गेला आहे. महाराष्ट्र शासनाने प्रसिद्धी केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे ३५ टक्के पेक्षा अधिक आस्थापनेवरचा खर्च असल्यास नविन पद निमित्तीचे प्रस्ताव शासनाकडे पाठू नये असे स्पष्ट संकेत दिले आहेत. त्याच निर्णय क्र. संकिर्ण-१००५/वर्गीकरण/प्र.क्र./३९७/०५/न.वि-२४ दि. ०४/०५/२००६ याच निर्णयामध्ये परिशिष्ट दोन मध्ये असलेल्या आकृती बंधाचा आधार घेउन सुचविलेले पदोन्नत्या आहेत. आस्थापनेचा वाढत्या खर्चामुळे शहराचा विकास कामांना मिळणारा निधी दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. यापुढे महापालिकेने अत्यावश्यक परिस्थिती खेरीज कोणत्याही पदोनिमित्तीचे ठराव शासनाकडे मंजूरीसाठी पाठवू नये असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- जुबेर इनामदार** **अनुमोदक :- हरीश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे.**

**हरीश्चंद्र म्हात्रे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. पिठासीन अधिकारी, याठिकाणी सन्मा. उपायुक्त, मुख्यालय खतगावकर साहेब ह्यांनी अगोदर खुलासा केलेला आहे की, 'ज' चे प्रस्ताव मा. महापौरांनी प्रशासनाला निर्देश द्यायचे असतात, प्रशासनाने त्यापुढची कार्यवाही सुरु करायची असते. त्याचा वैज्ञानिक ठरावाला स्वरुप प्राप्त होत नाही. तरी 'ज' चे प्रस्ताव आले नाही असे आपण म्हणतो. तर, महापालिका स्थापन झाल्यापासून महानगरपालिकेच्या दुसऱ्या निवडणूका आहेत. बरेच 'ज' चे प्रस्ताव आपल्याकडे आलेले आहेत. आणि आपण मंजूर केलेले आहेत. तर आता 'ज' च्या प्रस्तावाचा पायंडा पडलेला आहे? 'ज' च्या प्रस्तावाचा ठराव झालेला आहे. त्याच्यावर कार्यवाहीसुध्दा झालेली आहे. दुसरी गोष्ट म्हणजे ह्या ठिकाणी दोन प्रस्ताव आलेले आहेत. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील आणि शशिकांत भोईर यांनी सुचक आणि अनुमोदन केलेले आहे. तर, ह्यामध्ये मजेशीर बाब अशी आहे की, आपले मिरा भाईंदर महानगरपालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्था ही स्वायतत्ता आहे त्याला कोणत्याही स्वायतत्ता संस्थेला कोणताही आपण निर्णय घेवू शकतो. हे आपले सेल्फ गर्व्हमेन्टच आहे. जसे राज्यशासन असते, केंद्रशासन असते. तसे आपली महानगरपालिका कोणत्याही प्रकारे निर्णय घेण्यासाठी आपण सक्षम असतो. आपल्याला हवे असलेले निर्णय त्यामध्ये पारीत करुन या ठिकाणचे गर्व्हमेन्ट प्रशासन आपण चांगल्या पध्दतीने चालू शकते. पध्दत कशी अवलंबवायची, रित कशी अवलंबवायची हे आपल्यावर असते. तर, सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी जी ह्या ठिकाणी भुमिका मांडलेली आहे. तर, त्या भुमिकेशी आम्ही सहमत आहोत. कारण या ठिकाणी आपण सेवा भरती नियमाला आपण मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६५ पोटकलम १ अन्वये 'अ' व 'ल' च्या तरतुदी नुसार मा. महासभेने दि. १२/८/२००५ रोजी ठराव क्र. २९ अन्वये मान्यता दिलेली आहे. पण ते शासनाच्या मंजुरीच्या अधीन राहून आपण काय केले. आपल्या शहरातील जे ह्या ठिकाणी नागरीक आहेत, कर्मचारी आहेत. तर अशा कर्मचाऱ्यांचे कुठेतरी भले व्हायला पाहिजे. त्यांनी एवढे वर्ष कामं केलेली आहेत. त्या कामाबद्दल त्यांना रिटायरमेन्टच्या अवस्थेपर्यंत प्रमोशन मिळाले पाहिजे. हा एक उदात्त हेतु आणि प्रामाणिक भावना. सर्व सन्मा. सदस्यांची किंबहूना या या मा. महासभेची होती. आणि त्या दृष्टीकोनातून आपण आपल्या येथील कर्मचारी वर्षानुवर्षे काम करीत आहेत. त्यांना आपण पदोन्नती दिलेली आहे. परंतु, शासनाच्या मंजुरीच्या अधीन राहून त्यांना ते दिलेले आहे. अजून मंजूरी मिळाली नाही. ही गोष्ट सत्य आहे. तरी आपण आपल्या कर्मचाऱ्यांचे, अधिकाऱ्यांचे नुकसान करायचे नाही. ही पण त्याच्यामध्ये भावना आहे. याठिकाणी जर असे असेल तर सन्मा. सदस्य वैती साहेबांनी त्याठिकाणी नमुद केलेले आहे. विषयात केलेले आहे की, सगळच आपल्याला त्या ठिकाणी करायचे आहे. आपल्याला आयुक्त नको, उपायुक्त नको, आपल्याला मुख्य लेखाधिकारी नको, शहर अभियंता नको, आपल्याला नगररचनाकार नको, आपल्याला सहाय्यक नगररचनाकार नको किंवा हार्डवेअर इंजिनियर नको. हे सगळे नको असतील, शासनाच्या मार्फत प्रतिनियुक्तीवर ही जी मंडली येते तर आपण शासनाच्या विरोधत निर्णय घेतो असा ह्याचा अर्थ ह्याठिकाणी होतो शेवटी प्रतिनियुक्तीवर कोणाला पाठवायचे? काय पाठवायचे? हे अधिकार आपल्या महानगरपालिकेचे किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेचे असूच शकत नाही. हे अधिकार राज्य शासनाचे आहेत. राज्यशासनाला योग्य वाटेल त्या अधिकाऱ्याला ह्या ठिकाणी या पदावर राज्यशासनावर पाठवू शकतो. प्रतिनियुक्तीवर पाठवू शकतो. जर राज्यशासनाकडून आलेले आयुक्त हे ह्या ठिकाणी संपूर्ण प्रशासनाचा प्रमुख असतो. त्यांनी हे पहायचे असते की, हे काम ह्या ठिकाणी प्रशासनाच्या मार्फत चाललेले आहे. तते सोग्य पध्दतीने चाललेले आहे की नाही. त्यामध्ये नागरीकांचे हित कितपर्यंत जोपासले जाते, ठेकेदाराचे हित कितपर्यंत जोपासले जाते हे सर्व बघायचे काम कोणाचे काहे? मा. आयुक्त म्हणून शासनाने

पाठवलेल्या अधिकाऱ्याचे काम असते. परंतु, जर असे प्रकार व्हायला लागले की, प्रतिनियुक्तीवर अधिकारीच नको. तर मग आपल्या मधल्या आपल्याकडे एवढे चांगल्यात चांगले सेटींग करणारे अधिकारी आहेत की, विचारुच नका. असे चांगले अधिकारी पण आपल्याकडे आहेत की, परफेक्ट सगळ्यांना मॅनेज करुन चालणारे आहेत. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी सुचना मांडलेली आहे की, ५६ खाली कार्यवाही करा. तर माझे असे म्हणणे आहे की, असा अधिकारी कोण आहे? त्या अधिकाऱ्याचे नाव पण आपण या ठिकाणी घ्यायला पाहिजे की, जो ह्या पध्दतीने हे सगळे मॅनेज करतो. आपण म्हणता ५६ अन्वये कार्यवाही करा. आपल्या मताशी मी सहमत आहे. कार्यवाही केली पाहिजे. आम्ही तर कधीपासून ओरडतो. जोपर्यंत या ठिकाणी एक-दोन लोकांना म्हणजे प्रशासनात नालायक अधिकारी आहेत. काही लोक नक्की नालायक आहेत. पण, अशा नालायक अधिकाऱ्यांना घरी बसवायचे काम आपणच केले पाहिजे. आपण त्यांची नावे सांगा. मा. महापौरांनी या शहरामध्ये चांगला मॅसेज पाठवावा की, ह्या ठिकाणी असे असे प्रस्ताव येत असतात. तर ५६ नुसार कार्यवाही करा. हे सदस्यांचे काम नाही. किंवा मा. महासभेचे काम नाही. हे काम मा. आयुक्त साहेबांचे आहे, प्रशासनाचे आहे. मा. महापौर साहेब, तुमचे काम आहे. तुम्ही जर शहरात चांगला मॅसेज पाठवला की, अशा लोकांना घरी बसवले. एक-दोन लोकांना खरंच घरी बसवा. प्रशासन नाही सुधारत तर सांगा. मग आम्ही राजीनामा देवू. जर प्रशासन सुधारले नाही. तुम्ही तशी कार्यवाही करा ना. कार्यवाही करत नाही. आपण शासनाच्या मंजुरीच्या अधिनियमात वाटेल तसे निर्णय घेवू शकत नाही. शेवटी ह्या ठिकाणी शासन आहे. शासनाचे निर्देश आपण पाळले पाहिजे. शासनाचे आदेश पाळले पाहिजे. जर, शासनाचे निर्देश, आदेश पाळले नाही. तर पुन्हा ही महानगरपालिका बरखास्त होवू शकते. कारण मागचा इतिहास बघा. चुकीच्या निर्णयामुळे आपली नगरपालिका बरखास्त झालेली आहे. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांना जास्त अनुभव आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. सन्मा. सदस्य आसिफ शेख साहेब आपण बसून घ्या. सन्मा. सदस्य शशिकांत भोईर, इनामदार साहेब आपण आपला ठराव द्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर साहेब, या ठिकाणी उपायुक्त खतगावकर साहेबांनी म्हटले आणि मा. महापौरांनी ह्याच्यावर सांगितले की, निर्णय घ्या. तर प्रशासन आपला अहवाल तयार करेल. मला फक्त महानगरपालिकेच्या किंवा सभागृहाला एकच गोष्ट निदर्शणास आणून द्यायची आहे की, ज्यावेळी आमचा आकृतीबंध मंजूर झाला. त्यावेळेला तीन उपायुक्तांची पदे होती. तीन उपायुक्तांची पदे असताना दोन उपायुक्त आपण भरलेले होते. एक उपायुक्त पद हे रिक्त होते. दोन उपायुक्त पद भरताना एक प्रतिनियुक्तीवर पद भरावे आणि एक पद सरळ सेवेतून भरावे. अशा पध्दतीने आपण निर्णय घेतला होता. तर प्रतिनियुक्ती एक उपायुक्त झाले आणि एक सरळ सेवेतुन एक उपायुक्त झाले. तिसरे उपायुक्त पद हे रिक्त होते. हे भरण्यात आले. परंतु, त्याच्यानंतर शासनाचा हा एक निर्णय झालेला आहे. हा शासनाचा निर्णय आल्यानंतर ह्या शासनाकडे ३८ अधिकाऱ्यांच्या पदांचा एक आकृतीबंध तयार केलेला आहे. मला प्रशासनाकडून हा खुलासा हवा की, हा आकृतीबंध आपल्याला लागू आहे की नाही? ह्या आकृतीबंधमध्ये उपायुक्तांच्या फक्त दोनच पोस्ट असाव्या असे स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे. आणि त्या कोणाला असाव्यात तर 'ड' वर्ग महानगरपालिकेला. आणि ह्याच्याध्ये त्यांनी स्पष्ट म्हटलेले आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिका ही 'ड' वर्ग महानगरपालिका आहे. जर ह्या आकृतीबंधानुसार गेलो तर तिसरे उपायुक्त पद साहेब आपल्याकडे राहत नाही. आणि ह्या शासन निर्णयामध्ये पॅरेग्राफ क्र. ६ मध्ये स्पष्ट लिहलेले आहे की, आकृतीबंधामध्ये वगीकरण निहाय मंजूर केलेल्या पदसंख्येपेक्षा अधिक पदे एखाद्या महानगरपालिकेस सध्या मंजूर असतील तर आपल्याकडे आधी तीन पदे मंजूर होती. आणि त्या पदावर अधिकारी कार्यरत असतील. कार्यरत होते. व असे अधिकारी सेवेत असेपर्यंत किंवा ते पदोन्नत होईपर्यंत सदर ज्यादा पदे अस्तित्वात राहतील. जर तीन पदे होते. तर आपल्या अस्तित्वात तीन पदे राहिले असतील. दोन होते तर दोनच आणि एक पद रिकामी. तद्नंतर अशी ज्यादा पदे आपोआप रद्द होतील. म्हणजे तिसरं पद हे आपोआप रद्द होते. स्थानिक परिस्थिती व गरज विचारात घेता ह्या शासन निर्णयानुसार मंजूर पदांपेक्षा जास्त पदे किंवा अतिरिक्त पदे निर्माण करण्याची आवश्यकता असल्यास महानगरपालिकेला तसे वाटल्यास महानगरपालिकेचा आस्थापनेचा २० टक्के वाढीच्या मर्यादेपेक्षा कमी असल्यास महानगरपालिकेच्या प्रस्तावानुसार शासन जास्तीच्या आवश्यक पदांना स्वतंत्र आदेशाने मंजूरी देईल. आता मुद्दा क्र. ६ मध्ये पुढे त्यांनी असे म्हंटले की, तसे ज्या - ज्या महानगरपालिकांमध्ये संविधानीक आणि इतर आवश्यक पदांची मंजुर पदसंख्या आकृतीबंधान्वये दर्शविलेल्या पदांपेक्षा कमी असेल अशा महानगरपालिकेने योग्य तो समर्थनाचा प्रस्ताव शासनाकडे मंजूर करण्यासाठी पाठवावे. याचा अर्थ असा की, आकृतीबंधामध्ये तीन पदे मंजूर झाली होती. त्याच्यातली दोन भरण्यात आली होती. त्याच्यानंतर हा जो शासनाचा निर्णय आला त्यानुसार दोन पदं उपायुक्त केली गेली. त्यानुसार जर तीन पदे भरलेली असतील. तर तिसऱ्या पदाचा जेव्हा कालावधी संपला असता तीसरे पद रिकामी करायला लागले असते. तिसरे पद भरले गेले नव्हते. तिसरे पद हे आता भरलेले आहे. आणि ह्याच्यात असे म्हटलेले आहे की, तिसऱ्या पदाची म्हणजे ज्यादा पदाच म्हणजे आकृतीबंधामध्ये दोन पदे लिहले. त्याच्यामध्ये तो निर्णय आहे. आणि तिसऱ्या

पदाची जर गरज वाटली तर तुम्ही प्रशासनाला तसा महानगरपालिकेचा प्रस्ताव पाठवावा. असा आपण प्रस्ताव पाठवलेला का? की, तिसरे उपायुक्त पद आम्हाला पाहिजे आणि ते निर्माण करा. तिसरे उपायुक्त पद जे भरलेले आहे. ते उपायुक्त पद रद्द करावे. अशा प्रकारचा तो ठराव आहे. हा विषय असल्या प्रकारचा आहे. मला त्याच्यावर मा. उपायुक्त साहेबांनी माहिती द्यावी की, हे तिसरे उपायुक्त पद आहे ते आपण कशा पध्दतीने पद भरले? जर तुम्हाला हा शासन निर्णय लागू नाही का? किंवा शासन निर्णय लागू झाल्यानंतर तुम्हाला प्रशासनाला योग्य वाटले म्हणून तुम्ही वेगळा प्रस्ताव महानगरपालिकेला न सांगता, किंवा महानगरपालिकेची परवानगी घेवून तुम्ही तसा वेगळा प्रस्ताव सादर करुन त्याला शासनाने मंजुरी दिलेली आहे. आणि नंतर हे तिसरे उपायुक्त पद भरलेले आहे का? ह्याची माहिती द्या.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, मगास पासून 'ज' च्या प्रस्तावावर चर्चा चालू आहे. 'ज' च्या प्रस्तावाखाली आर्थिक बाबी आम्ही मंजूर करु शकत नाही. ते आम्हाला मान्य आहे. 'ज' च्या प्रस्तावाखाली एखादा ठराव पण मांडू शकत नाही. असे आपण म्हणालात किंवा आस्थापनेबाबतसुध्दा आम्ही निर्णय घेवू शकत नाही. मग ते अधिनियमामध्ये 'ज' चा प्रस्ताव येण्याचे प्रयोजन काय आहे? ते पण ह्याच्यासोबत सांगा. म्हणजे कशासाठी? ह्याचा खुलासा करा. म्हणजे आम्हालाजरी काही करायचे असेल. सभासदांना विषय पत्रिकेवर विषय आणायचे असतील तर त्यासाठी काय करायला पाहिजे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

आणि ह्याच्या अगोदर जे निर्णय झालेले आहे. त्याबद्दल काय? मा. उपायुक्त साहेब, ह्याच्या अगोदर 'ज' च्या प्रस्तावात निर्णय झालेले आहे. त्याच्याबद्दल तुम्ही काय करणार? ते पण सांगा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य पाटील साहेबांनी ह्या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केला. त्याचा खुलासा मी करु इच्छितो. शासनाने राज्यतील महानगरपालिकेसाठी कर्मचारी, अधिकाऱ्यांसाठी आकृतीबंध निश्चित केलेला आहे. त्यामध्ये महानगरपालिकेचा दर्जा निश्चित करुन ते आकृतीबंध निश्चित केलेला आहे. आणि आपली महापालिका ही 'ड' वर्गामध्ये समाविष्ट होते आणि तो आकृतीबंध निश्चित केलेला आहे. त्यामध्ये उपायुक्त पदाबाबत जी चर्चा होते. त्यामध्ये 'ड' वर्गाच्या महापालिकेला दोन उपायुक्तांची संख्या निश्चित केलेली आहे. ही वस्तुस्थिती आहे. आणि ते बरोबर आहे. हा आकृतीबंध राज्यशासनाने निश्चित करण्यापूर्वी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर राज्यशासनाकडून एकूण तीन उपायुक्तांचे पद मंजूर होते. त्यापैकी राज्यशासनाचे वर्ग-१ अधिकारी मिरा भाईंदर महानगरपालिकेवर सामावले गेले. आणि दोन पदांना राज्यशासनातुन प्रतिनियुक्तीवर मुख्याधिकारी कार्यरत होते. त्या आकृतीबंधाच्या शासन निर्णयामध्ये शासनाने जे जास्तीचे उपायुक्त आहेत किंवा त्या आकृतीबंधापेक्षा कमी उपायुक्तांची संख्या असेल तर त्या ठिकाणी विशेष प्रावधान अधिनियमात निर्णयात केलेले आहे. त्याप्रमाणे जास्तीचे उपायुक्तांची संख्या कार्यरत उपायुक्त त्या ठिकाणाहून बदली झाली किंवा त्यांची सेवा संपुष्टात आली तर ते जास्तीचे पद आपोआप संपुष्टात येते. असे त्याच्यात नमुद आहे. ही वस्तुस्थिती आहे. किंवा कमी असेल तर महानगरपालिकेने त्याचा जो आस्थापनेचा खर्च आहे. विहित मर्यादेत ते विचारात घेवून आवश्यकता असल्यास जास्तीचे उपायुक्तांची मागणी करावी अशी सुध्दा तरतुद आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बाबतीत त्या आकृतीबंधाच्या शासन निर्णयाप्रमाणे जर विचार केला. तर आपल्याकडे एक उपायुक्त पद जास्तीचे होते. आणि त्या पदावर सन्मा. अजिज शेख हे कार्यरत होते. त्यांची बदली कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर उपायुक्त म्हणून झालेली आहे. त्या तारखेला वास्तविक ते पद संपुष्ठात यायला पाहिजे होते. महानगरपालिकेच्या प्रशासनाने परस्पर मा. महासभेला विचारात न घेता असे कोणतेही उपायुक्ताचे पद कार्यन्वीत रहावे किंवा जिवीत रहावे असा कोणताही प्रस्ताव प्रशासनाकडून सादर केलेला नाही. ही वस्तुस्थिती आहे. पण ते शासनाने ते पद संपुष्टात न आणता. नव्याने आपल्याकडे उपायुक्तांची प्रतिनियुक्तीवर नियुक्ती केलेली आहे. ही वस्तुस्थिती आहे. आणि ते आपल्याकडे सध्या कार्यरत आहेत. ह्यामध्ये शासनाने जो निर्णय घेतलेला आहे. अशा प्रकारची वस्तुस्थिती आहे की, प्रशासनाकडून कोणतीही मागणी केलेली नाही. दुसरा मुद्दा ह्या ठिकाणी उपस्थित झालेला आहे की, 'ज' च्या प्रस्तावाबाबत. हा अधिनियम वाचत असताना एक-एक सेक्शन वाचून त्याचा फायनल अर्थ काढता येत नाही. काही सन्मा. सदस्य खुप सिनियर आहेत. त्यांना या कामकाजाची कल्पना आहे. काही सदस्य नविन आहेत. कोणताही लॉ, कोणताही सेक्शन हे सामुहिक वाचायला पाहिजे. एकाचाच अर्थ वाचायचा आणि त्याचा संदर्भ फायनल काढायचा हे अपेक्षित नाही. हे राहत असताना इतर संदर्भाचा अर्थ आपल्याला इगनॉर करता येत नाही. हे ही विचारात घ्यायला पाहिजे. बेसिक प्रिन्सिपल लॉ सभाशास्त्राप्रमाणे असा आहे की, मा. महासभेचे कामकाज हे विषय पत्रिकेवर विषय घेवून करावे. विषयपत्रिका मा. महासभेच्या कामकाजामध्ये निश्चित होत असताना मा. आयुक्त प्रस्ताव तयार करून मा. महापौर साहेबांकडे सचिवांच्या माध्यमातून सादर करतात. आणि मा. महापौरांना मा. आयुक्त साहेब जे डॉकेट सबमिट करतात. त्याच्यातून विषय पत्रिका निश्चित करतात. तर त्यामध्ये एखाद्या सदस्यांना एखादा विषय मा. महासभेच्या कामकाजामध्ये घ्यायचा असेल तर त्यांनी तो प्रस्ताव विहीत मुदतीत मा. आयुक्त साहेबांकडे

द्यायला पाहिजे. आणि त्यावर विभागाचे अभिप्राय घेवून मा. आयुक्तांनी मा. महासभेला घेणे अपेक्षित असेल तर तो सचिवांमार्फत मा. महासभेसाठी मा. महापौरांकडे तो प्रस्ताव सादर केला जातो. ही एक पद्धत आहे. आणि त्याच्यासाठी ७ दिवसाची नोटीस आहे. ह्या शिवायविषय पत्रिका निश्चित केल्यानंतर एखाद्या सदस्याला कामकाजात भाग घेत असताना विविध प्रस्ताव आहे. त्याच्यामध्ये लक्षवेधी आहे. प्रश्न आहेत, ज प्रस्ताव आहे, म चा प्रस्ताव आहे, इ चा प्रस्ताव आहे. ह्याच्यात खुप प्रकारचे कामकाज आहेत. ह्याचा अर्थ विषय पत्रिकेवर विषय न घेता सर्वेच जर निर्णय करत असाल तर विषय पत्रिकेवर विषय घेवून निर्णय करणे ह्या निर्णयाला बाधा येउ शकते की नाही. हा माझा प्रिन्सिपला आहे. ज च्या प्रस्तावावर निर्णय करू नये असे नाही. जे निर्णय करण्यासारखे असतील आता समजा एका ठिकाणी झाकणाचा विषय निघाला, एखाद्या ठिकाणी खड्डा पडलेला आहे जे कामकाज होउ शकते आणि ते ज च्या प्रस्तावात आणलेले आहे. त्याच्यावर निर्णय करायला कोणाचीही ना नाही. एखाद्या सदस्यांनी अशी भावना ज खाली व्यक्त केली आणि ते करणे आवश्यक आहे. त्याच्यासाठी लॉ दाखवून तो विषय बाजुला करणे हे ही बरोबर नाही. कामकाजातले जे धोरण आहेत ते समजुन घेण्याचा मुद्दा आहे. आता, मा. अग्रवाल यांनी ज च्या प्रस्तावाखाली शहरांमधील व्यवसायीकांची जी एन ओ सी दिली जाते. त्याच्यावर विषय मांडलेला आहे. त्यांची भावना प्रामाणिक आहे आणि सन्मा. गोहिल मॅडम ने सुद्धा त्याबाबतीत विषय मांडलेला आहे. त्यांची सुद्धा भावना प्रामाणिक आहे. पण ते करत असताना इतर सेक्शन इग्नोर करता येणार नाही. १४९ मध्ये क्लीअर कट म्हटलेले आहे की, एखाद्या करामध्ये बदल करायचा असेल तर ह्याची विहित पद्धत आहे म्हणजे ते सोडून फक्त ज खालीच फायनल करा असे होवू शकत नाही ज खाली तुमची भावना लक्षात घेवून ते स्विकारले पाहिजे आणि प्रशासनाला मा. महापौरांनी डायरेक्शन करायला पाहिजे. की हा प्रस्ताव येणाऱ्या सभेत किंवा पुढच्या सभेत सर्व इत्तंभुत अभ्यास करून सादर करायला पाहिजे. असे सभाशास्त्राचे कामकाज आहे. म्हणजे ज खाली प्रस्ताव आले त्याच्यावर निर्णय करू नये असे स्पष्ट मी म्हणत नाही. पण इतर अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन करून निर्णय करणे अपेक्षित नाही. ज च्या प्रस्तवामध्ये आपल्याकडे विविध उपविधी आहेत. त्याच्यामध्ये तरतुद आहेत. जर तत्काळ सभेमध्ये तीन दिवसाच्या आत किंवा एक दिवसांच्या आत सुचना देवून ते वर्तमान पत्रात प्रसिद्धी करून त्याच्यावर कामकाज होण्याची तरतुद असेल तर निश्चित निर्णय करता येतो. आपले सर्व सभा कामकाजाचे निर्णय अंतिम झालेले नाही. त्यामुळे आपली महापालिका ही नव्याने आहे. म्हणून हे प्रश्न निर्माण होतात. कारण या ठिकाणी जी वस्तुस्थिती कामकाजात होते मॅक्झीमम हे विषय पत्रिकेवर घेवून होणे हे अपेक्षित आहे. असे माझे मत आहे. सन्मा. पाटील साहेबांचा जो मुद्दा आहे. तर साहेब, आम्ही प्रस्ताव सादर केलेला नाही. शासनाने जो अद्यादेश निर्णय घेतलेला आहे तो विचारात घेवून ते निर्णय होणे अपेक्षित होते. ह्या मताशी मी सहमत आहे. पण ते पद संपूष्ठात न आणता आपल्याकडे एक जास्तीचे उपायुक्त शासनाने पाठवलेले आहे. ही मी सभागृहाला वस्तुस्थिती सादर करतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

ह्याठिकाणी साहेबांनी जे विश्लेषण केले. ते एकदम योग्य आहे आता त्यांनी दोन्ही ज चे प्रस्ताव कसे एकत्रिकरण केले ते चुकीच्या पद्धतीने केले. म्हणजे सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांचा जो ज प्रस्ताव आहे तो आर्थिक बाबतीत आहे आणि विशेषतः तो कराच्या बाबतीत आहे. कराच्या बाबतीत प्रशासन सुद्धा एकदा लावलेला टॅक्स कमी करू शकत नाही. हे त्यांना माहित आहे. एकदा घरपट्टी लावली तर ती जर कमी करायची असेल तर केवढी मोठी प्रोसीजर करून सुद्धा ती अवैद्य ठरते. हा विषय आहे. आणि दुसरी जी बाब आहे ना ती प्रशासनान जी काही गडबड केलेली आहे. आता त्यांनी स्वतःच्या तोंडाने कबूल केले की, आम्हाला माहिती आहे तिसर पद आमचे व्यापगत झालेले आहे. म्हणजे संपलेले आहे. जेव्हा शेख साहेब सोडून गेले तेव्हा ते पद रिक्त झाल्यानंतर तिसर पद भरायचे नाही. कारण त्यानंतरचा शासन निर्णय आलेला आहे. त्याच्यात दोनच पद आहे. आता तिसर पद जर भरायचे होते असे जर महापालिकेला वाटले किंवा प्रशासनाला की, तिसऱ्या पदाची गरज आहे. तर त्यांना तसा महानगरपालिकेच्या मा. महासभेपुढे प्रस्ताव आणायला पाहिजे होता. पण तो न आणता त्यांनी शासनाकडे परस्पर प्रस्ताव पाठवलेला आहे. म्हणजे प्रशासनाने हा विषय जर लपवलेला होता. तो प्रशासन, कसा विषयपत्रिकेवर विषय आणेल? म्हणजे प्रशासनाकडे आम्ही अपेक्षाच करू शकत नाही. उलट आम्हाला आश्चर्य वाटते की, हे घडले कसे? ठिक आहे. आज आपल्याला गरज आहे. आम्ही सगळी जण तूम्हाला मदत करू. आम्ही तुम्हाला नवीन ठराव करून देउ की, तिसरे उपायुक्त पद निर्माण करण्यात यावे. कारण आकृतीबंध आमचा आल्यानंतर.....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

यापुर्वी अनुसुचित जातीतुन उपायुक्त नेमावे अशी सभागृहामध्ये चर्चा झाली होती. आणि त्याच्यावर खुप मोठी मागणी होती. तर मा. महासभेमध्ये एक निर्णय असा झाला होता की, जास्तीचे उपायुक्त पद मंजुर करावे. अनुसुचित जाती करिता जास्तीचे उपायुक्त मंजुर करावे. तो प्रस्ताव आपण शासनाकडे सादर केलेला आहे. पण तो अद्याप मंजुर झालेला नाही असे होउ नये की हा विषय कोणी मांडला नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी उद्या असे म्हणेल की, ओ.बि.सी. चे एक उपायुक्त पद निर्माण करावे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पण तो प्रस्ताव अजून मान्य झालेला नाही. तो प्रस्ताव आपण शासनाकडे सादर केलेला आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. उपायुक्त साहेब, उपायुक्त हे पद कोणत्या वर्गासाठी आरक्षित होता? पूर्वीचे जे उपायुक्त पद होते ते उपायुक्त रोस्टर प्रमाणे कोणासाठी आरक्षीत होते. खुल्या वर्गासाठी होते की, मागासवर्गीयासाठी होते. की, एस.टी साठी होते? एन.टीसाठी होते? कोणासाठी होते?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ज्यावेळेस सामावून घेण्यात आले होते त्यावेळेस एकांकी पद होते म्हणून सामावून घेतलेले आहे. त्यावेळी पद राखीव नव्हते पण रोस्टर ज्यावेळेला तपासलेले गेले. ते एकत्रित रोस्टर तपासण्यात आला होता.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

रोस्टर प्रमाणे उपायुक्त पद हे आरक्षित होते. त्यानंतर असताना देखील सरळ सेवेने प्रतिनियुक्तीवर आलेले पानपट्टे साहेब यांची आपण मा. महासभेने नियुक्ती केली.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या ठरावातच म्हटलेले आहे. एकाकी फक्त एकच पद महापालिका आस्थापनेवर असल्यामुळे एकांकी पदाला आरक्षण लागू नसल्यामुळे त्याठिकाणी पाणपट्टे साहेबांना सामावून घेण्यात आलेले आहे. त्यामुळे ते पद आरक्षणासाठी होते असे म्हणणे अपेक्षित नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ठिक आहे. पानपट्टे साहेबांची त्याच्यावर आपण नियुक्ती केली.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पानपट्टे साहेबांना समावून घेतलेल्या ठराव सभागृहातच मान्य केलेले आहे. की ते पद एकाकी व्हावे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

बरोबर आहे. मा. महासभेनेच हा ठराव केला होता आणि मा. महासभेनेच पानपट्टे साहेबांची त्याच्यावर नेमणूक केली त्यांच्यानतर माझे असे म्हणणे आहे की, उपायुक्त पद हे मागासवर्गीय होते. तर मागासवर्गीयचे पद आपण कसे भरणार? त्यासाठी आपण हे पद आरक्षित केले होते. मी माझ्या ठरावामध्ये असे म्हटले होते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुचित प्रकरण क्र. २ नियम १, प्रारूप नियम २००२ कलम नं ब अन्वये कार्यवाही करून त्वरित अंमलबजावणी होणेस ही सभा मंजुरी देत आहे. तसेच उपायुक्त संवर्गातील जुनी तीन पदे व एक नविन पद निर्मितीस देण्यास मंजुरी देत आहे. आणि त्यानंतर मा. आयुक्त साहेबांनी असे एक पत्र शासनाला पाठवलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. सदस्या ज्योत्स्ना हसनाळे मॅडम, आपण ते पुन्हा मला वाचून दाखवावे. कारण मी ऐकले नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

पुर्ण ठराव वाचू का?

**प्रफुल्ल पाटील :-**

नाही शेवटचे वाचून दाखवा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

उपायुक्त या पदावर मिरा भाईंदर आस्थापनेवर अनुसुचित जातीचा वर्ग – २ अधिकाऱ्यामधुन ज्याचा कार्यकाल १ वर्षापेक्षा जास्त झाला आहे. व शैक्षणिक पात्रता पदवीधर एल.जी.सी.एस. परिक्षा प्रथम उत्तीर्ण असेल. तसेच मागील तीन वर्षाचा गोपनिय अहवाल तपासुन त्वरीत पदोन्नती देण्यास ही सभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे. तसेच मा. सचिव साहेबांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुचित प्रकरण क्र. २ नियम १ प्रारूप नियम २००२ कलम न ब अन्वये कार्यवाही करून त्वरीत अंमलबजावणी होणेस ही सभा मंजुरी देत आहे. तसेच उपायुक्त संवर्गातील जुनी तीन पद व नविन एक पदे निर्मितीस मंजुरी देण्यात येत आहे.

**चंद्रकांत वैती :-**

आपण तो ठराव केला होता ०१/०६/२००७ ला त्यानंतर ती तहकूब सभा झाली होती आणि ०८/०६/२००७ ला पुन्हा ह्याच्यावर चर्चा झालेली होती. त्यावेळेला साधारण पण निवडणूकीचे वातावरण होते. ही गोष्ट आपण.....

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आपण त्यावेळेला उपमहापौर होते वातावरण व्यवस्थित नव्हते हे मान्य आहे. पण आपण ह्याच मा. महासभेमध्ये मान्य केलेला आहे.

**चंद्रकांत वैती :-**

ठिक आहे. ठराव तो झाल्यानंतर आपल्या शासनाकडून जे परिपत्रक आलेले आहे. त्याच्यामध्ये ३८ अधिकाऱ्यांच्या संवर्गाची नोंद आहे आणि त्याच्यामध्ये ते पद कमी झालेले आहे. सन्मा. शशिकांत भोईर

साहेबांनी तो प्रस्ताव आणला. त्या प्रस्तावामध्ये प्रशासकिय शिस्त लागावी अशा प्रकारचा त्यांनी विषय आणलेला आहे. आणि त्यांचा विषय महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक सर्व महानगरपालिकांसाठी लागु केलेला आहे. त्याच्यामध्ये ३८ संवर्गातील अधिकाऱ्यांची ही नोंद आहे. ही महानगरपालिका ''ड'' वर्गामध्ये मोडते. त्याला दोनच उपायुक्त लागू शकतात. ही बाब सत्य आहे. आपण ही साहेब ते कबुल केलेले आहे. आपल्याला असे वारंवार पदनिर्मितीचे प्रस्ताव देखिल पाठवता येणार नाही आणि प्रशासकिय शिस्त असावी की, एकांकी पद असेल तर, एकांकी पदासाठी आपण रिझर्व्हेशन कुठपर्यंत लावू शकतो याबाबत आपण खुलासा नंतर करावा आणि इनामदार साहेबांनी अशी एक सुचना केली होती की, नविन पद निर्मीतीचे प्रस्ताव पाठवू नये. तो पदनिर्मीतीचा जो ठराव केलेला आहे ती उपसुचना म्हणून ह्या ठरावामध्ये घ्यावी आणि भविष्यामध्ये तशा प्रकारचे आपण पदनिर्मितीचे किंवा पदोन्नतीचे ठराव पाठवताना सभागृहासमोर चर्चा केली पाहिजे. आणि ह्या विषयामध्ये आपल्याकडे एक जास्तीचे उपायुक्त पद आहे. हा उपायुक्त परत पाठवता येईल का? त्या ऑर्डर मध्ये राज्यशासनाच्या ना. बा. पाटलांच्या जी. आर. मध्ये ३८ संवर्गाची पदे आहेत. त्या पदानुसार एका अधिकाऱ्यांची मुदत आपल्याकडची संपेपर्यंतची वाट बघायची आहे. ह्या विषयात देखील खुलासा होणे गरजेचे आहे. सन्मा. सदस्य इनामदार साहेब, आपण आपला ठराव उपसुचना म्हणून ह्याला क्लब करावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

**जुबेर इनामदार :-**

मी केलेला ठराव उपसुचना म्हणून आपण त्याला मान्यता द्यावी. त्याचा समावेश करून घेण्यात यावा.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर साहेब, याठिकाणी महत्वाची बाब अशी आहे की, गोविंद परब हे आस्थापनाचे मोठे अधिकारी आहेत. हे जे ठरवतात ती पुर्व दिशा असते. अध्यादेश वगैरे वाचून दाखवतात त्याचा व्यवस्थित अर्थ पण सांगतात. त्यांनी मला ह्याठिकाणी स्पष्टपणे सांगावे की, एका संवर्गाची दोन पदे असल्यानंतर किती आरक्षण लागू असते. त्याची त्यांनी माहिती द्यावी. उपायुक्तांचे दोन पद आहे. मग त्याला आरक्षण लागू होते का?

**गोविंद परब :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो, एका संवर्गाचे जेव्हा दोन पदे असतील तर त्याला सरळ सेवेने भरायचे असेल तर पहिले पद एस.सी. ला जाते आणि दुसरे पद खुला प्रवर्गाला जाते.

**प्रफुल्ल पाटील :-**

ह्या दोन पदांपैकी जर प्रतिनियुक्तीवर एक पद आला असेल आणि एकच शिल्लक राहिला तर त्याला आरक्षण लागू होईल का?

**गोविंद परब :-**

प्रतिनियुक्तीवर पद जर शासनाने पाठवले तर प्रतिनियुक्ती पदाला आरक्षण नाही. त्यामुळे एकच पद राहते. त्यामुळे एका पदाला आरक्षण येणार नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

साहेब, माझे म्हणणे एकच आहे. जेव्हा दोन उपायुक्त असतात. कुठल्याही संस्थेमध्ये कुठलाही असु दे. एक पद कुठलेही असले तर त्याला आरक्षण लागू नाही. पण एका संवर्गाची दोन पदे झाली तर एका पदाला आरक्षण लागु होते. पहिले आरक्षण एस.सी. ला जाते. दोन पेक्षा जास्त असली तर दुसरे आरक्षण एस.टी. ला जाते. त्याच्यापेक्षा जास्त पदे असेल तर तीसरे आरक्षण एन.टी. ला जाते. ए.बी.सी.डी., एन.टी. ला जाते. अशा पद्धतीने मला तुम्हाला एकच प्रश्न विचारायचा होता. जेव्हा आमच्याकडे शासन प्रतिनियुक्तीवर अधिकारी पाठवतात. तर शासनाला माहित नाही येथे दोन पदे आहेत. तर त्या दोन पदांपैकी एका पदाला आरक्षण लागलेले आहे. म्हणजे शासन जर खर असेल तर खर असेल आणि आरक्षण जर बुडत असेल तर मग तशी आरक्षणे सगळीच बुडवायची. आम्ही जेव्हा करतो. जेव्हा आम्ही २८ शिक्षकांच्या नेमणूका करा असा जेव्हा ठराव केला. तेव्हा तुम्ही लोकांनी सांगितले ठिक आहे. २८ च्या २८ होतील आणि त्याच्यातले १३ बाहेर राहिले. कारण आरक्षण लावले. आता ह्या ७१ संगणक चालकांचे जेव्हा आम्ही सांगणार की, तुम्ही आस्थापनेवर घ्या तेव्हा तुम्ही लगेच सांगणार हो आम्ही आस्थापनेवर घेतले आणि ७१ मधले तुम्ही ३५ घेतले...

**चंद्रकांत वैती :-**

शासनाला माहिती काय दिली की, आमच्याकडे बॅकलॉग भरायचा आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही त्याच्यातले ३५ संगणक चालक बुडवणार आणि ३५ संगणक चालक एस.सी., एन.टी. वगैरे भरणार. म्हणजे आम्ही करायचे त्यावेळेला आम्ही आरक्षण नियमाचे काटेकोरपणे लावायचा आणि जेव्हा शासनाची दोन पदे होती त्यांना माहित होते की, एका पदाला आरक्षण लागू होते. मग प्रतिनियुक्तीवरचा अधिकारी आम्हाला मागासवर्गीय का नाही पाठवला. मग तो एस.सी. चा का नाही पाठवला?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब हा ठराव झाला त्यावेळेला माझे हेच म्हणणे होते जे तुम्ही आता म्हणालात ना तेच मला म्हणायचे होते की, प्रतिनियुक्तीचा अधिकारी जर शासनाने पाठवायचा होता तर मागासवर्गीयांचे आरक्षण असताना मागासवर्गीयांचा उपायुक्त का नाही पाठवला? किंवा ज्यावेळी आपण भरती करत असताना........

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मॅडम, ह्या उपायुक्त पदाबाबत आणि मागासवर्गीय अनुशेष बाबत मी ह्या सभागृहामध्ये शंभर वेळा बोललो असेल. साहेब आपल्या भावनेशी मी प्रामाणिक आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

माझ्या भावना वेगळ्या आहेत. माझ्या भावना अशा आहेत की, एक ही आरक्षण देवू नये सगळ्यांना असेच घ्यावे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला मुद्दा सांगतो की, मागासवर्गीय आरक्षणाबाबत मी आपल्याला शंभर वेळा सांगितलेले आहे. मुद्दा असा आहे की उपायुक्तांची तीन पदे आहेत आणि प्रतिनियुक्ती पदासाठी आरक्षण लागू नाही. तुम्ही ते समजून घेण्याचा मुद्दा आहे. ज्याअर्थी दोन पदांना आरक्षण लागू नाही. एक पद आहे. एक पद एकाकी असल्यामुळे मा. महासभेने याठिकाणी निर्णय घेतलेला आहे. आपण म्हणता की, तीन पदांपैकी एक पद अनुसुचित जातीला द्यायला पाहिजे. त्या भावना विचारात घेउन..

**प्रफुल्ल पाटील :-**

दोन खरे म्हणजे १०० टक्के अधिकार..

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रतिनियुक्तीच्या पदाला आरक्षण लागू नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

ही शासनाने काढलेली पळवाट आहे. त्याला आरक्षणाचा कायदा बाजूला राहिला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्या महापालिकेमध्ये आपण पूर्ण आरक्षण भरलेले आहे. या कामकाजासाठी विधीमंडळाची एक समिती असते. अनुसूचित जातीची एक समिती असते. त्यांनी या महापालिकेचे प्रशासकीय कामकाज तपासलेले आहे. याला कोणी बघणार नाही असे नाही. नियमबाह्या कोणालाही काही करता येत नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

अनुसूचित जाती कल्याण समितीला आपल्या मा. आयुक्तांनी सुद्धा कळवलेले आहे की, अनुशेष भरायचा आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जशी सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांची धारणा होती. तशीच समितीची धारणा होती. जर तीन पदे असतील तर एक पदाचा उपायुक्त का असायला नाही पाहिजे?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. आयुक्तांची आणि समितीची जेव्हा बैठक झाली. त्यावेळेला त्यांनी आपल्याला त्याची विचारणा केलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते मिनिटस जर तुम्ही पाहिले तर तिथेसुद्धा मी हेच मुद्दे मांडलेले आहेत की प्रतिनियुक्तीच्या अधिकाऱ्याला अनुशेष राहात नाही. त्या ठिकाणीसुद्धा ते मुद्दे मांडलेले आहेत. मग त्यानंतर अनुसुचित जातीचा अहवाल प्रधान सचिवांसमोर जातो. प्रधानसचिवांना साक्षीला बोलवतात. त्याठिकाणी अंतिम होउन तो विधीमंडळाला सबमिट झालेला आहे. याच्यात जर कोणती चुक असती तर आम्हांला पाचारण झाली असती.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आपण हा ठरावाचा अहवाल त्यांना पण कबूल केलेला आहे की असा असा ठराव झालेला आहे. आणि आम्ही भरणार आहोत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तो दुरुस्ती ठराव शासनाला पाठवलेला आहे. ते पद मंजूर झालेले नाही. या बाबतीत मी निवेदन केलेले होते. मुद्दा मांडला होता. त्याच्यात तो मुद्दा सांगायचा राहून गेला होता म्हणून मी दुबारा सांगितलेला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

याठिकाणीा महत्त्वाचा प्रश्न काय आहे की, ''ज'' चा प्रस्ताव का आणला? कारण आतापर्यंत पालिकेच्या प्रशासनाने आम्हांला कोणत्याही निर्णयाच्या संदर्भात कळवलेले नाही. जेव्हा आमच्या लक्षात आले की, पहिली तीन पदे मंजूर होती. त्याच्यानंतर त्याची दोन पदे......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

शासनाने एक पद संपूष्टात येउन जी कार्यवाही व्हायला पाहिजे होती ती न करता. एक उपायुक्त आपल्याकडे पाठवलेला आहे. ही वस्तूस्थिती आपल्या निदर्शनास आणलेली आहे. त्या आकृतीबंधाने आपल्याला जर त्याच्यात निर्णय करायचा असेल तर आम्हीही त्याच्यात काही म्हणू शकत नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणूनच आम्ही ठराव केला.या आकृतीबंधाप्रमाणे तिसरे पद निर्माणच होत नाही. आणि या नियम क्र. ०६ मध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की, जे तिसरे पद अस्तित्वात होते त्याची मुदत संपल्यानंतर त्यांना पाठवायचे आणि नविन भरायचे नाही आणि तुम्हांला जर आवश्यक वाटले तर तिसरे पद तुम्ही भरा. मग या गोष्टी तुम्हांला जर माहिती होत्या तर तिसऱ्या पदावर उपायुक्तांना रुजू कसे करु दिले? म्हणजे तिसऱ्या पदाच्या उपायुक्ताला तुम्ही रुजू कसे करु दिले? म्हणजे तिसऱ्या पदाच्या उपायुक्ताला तुम्ही रुजू करुन घ्यायला नको होते. आणि जर प्रशासनाला खरेच वाटते की तिसऱ्या पदावर उपायुक्त असावा. तर तुम्ही तसा प्रस्ताव आणा. अजूनही आणा. आम्ही नाही म्हणणार नाही. जर तुमच्याकडे खूप कामे असतील तर. म्हणजे हा विषय ''ज''च्या प्रस्तावाखाली येणारा आहे की, नाही एवढेच तुम्ही सांगा. म्हणजे आम्ही ह्या गोष्टी आणल्या प्रशासनाच्या सगळ्या गोष्टी बाहेर पडल्या. तिसरा उपायुक्त हा बेकायदेशीर नेमलेला आहे. हे ''ज'' चा प्रस्ताव आणल्यामुळे माहिती पडले.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, आज या ठिकाणी प्रकरण क्र. १९ वर चर्चा होते. सन्मा. नगरसेवक श्री. प्रफुल्ल पाटील साहेब आणि सन्मा. नगरसेवक श्री. शशिकांत भोईर साहेब, यांचा ''ज'' चा प्रस्ताव आहे. त्याच्यामध्ये त्यांनी म्हटलेले आहे की, ०१ जून २००६ च्या मा. महासभेत विषय क्र. ५६ अन्वये शासन निर्णयाच्या विरोधात ठराव करण्यांत आला. मा. खतगांवकर साहेब प्रकरण क्र. १९ वर चर्चा चालू आहे. सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब आणि सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर साहेब, यांचा ''ज'' चा प्रस्ताव आहे. तर माझ्या माहितीप्रमाणे, जो क्र. ५६ चा विषय आहे. त्याच्यावर जो ठराव झालेला आहे. तोपण ''ज'' च्या प्रस्तावाखाली झालेला आहे. तर तो ठराव चुकीचा आहे की बरोबर आहे याची एक माहिती द्यावी. त्याच्यानंतर सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, आपण तिथे म्हटलेले आहे की, शासन निर्णयाच्या विरोधात ठराव करण्यांत आला. तर माझ्या माहितीप्रमाणे आपण दोघेही त्यावेळी मा. महासभेमध्ये होते आणि तेव्हाच तो ठराव पास करुन घेण्यांत आलेला आहे. आणि साहेब त्याच्यानंतर तुम्ही म्हटलेले आहे की, काही अधिकारी व कर्मचारी शासन निर्णयाच्या विरोधात दुसऱ्या पदोन्नतीबाबत बेकायदेशिरपणे ठराव करुन घेत आहेत. त्यांची नावे आपल्याला माहिती असतील तर कृपया आपण ती सभागृहासमोर सांगावीत. आणि मा.श्री. गोविंद परब साहेब, आपल्याला एक प्रश्न आहे की, जे एक उपायुक्त पद आहे. त्या एका पदाला आरक्षण लागू होत नाही असे आपले म्हणणे आहे तर त्या एका पदावर मागासवर्गातील अधिकारी जाउ शकत नाही असा त्याचा अर्थ होतो की नाही? एक पद असेल तिथे आरक्षण लागू होत नाही. याचा अर्थ तिथे मागासवर्गातील अधिकारी बसू शकत नाही असा तर होत नाही ना?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

त्यांचा मुद्दा फिरून त्याच मुद्दाला येतो. आपल्याकउे महापालिकेला एक पद होते. याचा मा. महासभेने ते पद भरलेले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब माझे म्हणणे असे आहे की, एकाकी पदाला आरक्षण लागू होत नाही असे तुम्ही म्हणता, याचा अर्थ त्या एकाकी पदावर मागासवर्गाचा अधिकारी बसू शकत नाही का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

बसू शकतो. पण त्यावेळेस मा. महासभेने निर्णय केला. जर पद रिक्त असेल तर बसू शकतो. पण जे निर्णय झालेले आहेत. ते डावलून दुसरे काहीतरी करा असे करता येत नाही. एकदा एखाद्या प्रकरणात आपण निर्णय घेतला. ते कार्यान्वित आहेत. मग त्यांना सेट्रीगेट करा आणि दुसरा निर्णय करा असे होउ शकत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब माझा पहिला प्रश्न होता की ''ज'' च्या प्रस्तावाखाली केलेला ठराव चुकीचा आहे की बरोबर आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

सभागृहाला मी सर्वोच्च मानतो. चुकीचा आणि बरोबर हे कॉमेन्टस मी करु शकत नाही. तुम्ही गैरसमज करु नका. मी सभा कामकाजाची पद्धत सांगितली. त्यांनी ठराव मांडला तो चूक होता की बरोबर होता हे मी आज सांगू शकत नाही. तुम्ही त्याच्यात असे काही विषयांतर करु नका. मी फक्त कामकाजाची पद्धत सांगितली की कसे करायला पाहिजे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

हा ठराव सभागृहामध्ये आला. त्यावेळेला सभागृहामध्ये चर्चा झाली. चर्चा चालू असतांना काही सदस्य त्या चर्चेवर बोलले, काही सदस्य गप्प राहिले. नंतर हा ठराव मताला पडला नाही. सर्वानुमते मंजूर झाला. तो शासनाकडे पाठवलेला आहे. शासन मंजूर करेल की नाही ते आपल्याला नंतर कळेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रशांत पालांडे यांनी या ठिकाणी प्रश्न विचारला की, १ जून २००६ ला क्र. ५६ चा जो ठराव झालेला आहे. त्यावेळेला आम्ही सभागृहात होतो. आम्ही का मांडले नाही? आपले म्हणणे एकदम बरोबर आहे. आणि तुमच्या ठरावाशी आम्ही सहमत पण होतो. पण जेव्हा ४ मे २००६ चा आकृतीबंधाचा शासन निर्णय आम्हांला मिळाला. त्या शासन निर्णयामध्ये पाहिले तर उपायुक्त पदे ही फक्त दोनच आहेत आणि म्हणून या शासन निर्णयाच्या विरोधात आपला ठराव झालेला आहे असे आता आम्ही म्हणतो.

**प्रशांत पालांडे :-**

म्हणजे ठराव मांडल्यानंतर तुम्हांला ते मिळाले काय?

**प्रफुल्ल पाटील :-**

४ मे २००६ ला हा शासन निर्णय आला आहे. पण तो आमच्या हातात आला नव्हता. आमच्या हातात आला आणि जेव्हा समजले की दोनच उपायुक्त पदे आहेत आणि इथे तीन भरली आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

म्हणजे हा ठराव पास झाल्यानंतर तुमच्या हातात तो शासन निर्णय आला का?

**प्रफुल्ल पाटील :-**

होय आमचा ठराव आणि सुचना मंजूर करुन घ्या.

**प्रशांत पालांडे :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब अधिकाऱ्यांची नावे माहिती असतील तर आपण आम्हांला सांगावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. आयुक्तांपासून सगळे अधिकारी.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर साहेबांनी जो प्रस्ताव आणि सुचना मांडलेली आहे आणि सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार साहेबांची सुचना समावेश करायला सांगितलेली आहे ती मी स्विकारत आहे आणि प्रशासनाला असे निर्देश देत आहे की पुढच्या मिटींगमध्ये प्रशासनामार्फत रितसर सादर करावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

हा प्रस्ताव तुम्ही घ्या आणि आमचा पुढचा प्रस्ताव आहे तो तुम्ही पुढच्या सभेत घ्या.

**शशिकांत भोईर :-**

तो पुढच्या सभेत जसाचा तसा घ्या.

**चंद्रकांत वैती :-**

आत्ता ठराव आला याला कोणाचे ऑब्जेक्शन नाही मग तुम्ही पुढच्या सभेत प्रस्ताव काय पाठवणार? राज्य शासनामार्फत जो जी.आर. आलेला आहे त्या जी.आरमध्ये चूक आहे ती आपल्या निदर्शनास आणली. हा ठराव तुम्हांला घ्यावा लागेल.

**मा. महापौर :-**

प्रशासनाकडून रितसर माहिती येउ द्या. तुम्हांला मान्य आहे का?

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही हा ठराव घ्या. प्रशासन तुम्हांला मत देईलच.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**शशिकांत भोईर :-**

प्रकरण क्र. १९ घ्या. क्र. २० चे प्रकरण पुढच्या सभेत घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

तिसरे पद करायचे झाल्यास तुम्ही तसा रितसर प्रस्ताव आणा हा ठराव आत्ता मंजूर करुन घ्या.

**प्रकरण क्र. १९:-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत प्रशासकीय शिस्त लावणेबाबत.

**ठराव क्र. १८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत सध्या उपआयुक्त पदनामाची तीन पदे मंजूर आहेत. त्यापैकी एक पदावर महानगरपालिकेचे स्वतःचे उपआयुक्त व उर्वरित दोन पदावर राज्य शासनाकडील दोन अधिकारी प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१००५/वर्गीकरण/प्र.क्र.३७९/०५/नवि-२४ दि. ०४ मे

२००६ नुसार शासनाने निश्चित केलेल्या आकृतीबंधाप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या 'ड' वर्गात समावेश असल्याने फक्त उपआयुक्त पदानामाची दोन पदे अनुज्ञेय आहेत. सदर शासन निर्णयानुसार मा. आयुक्त यांच्याकडे एक उपआयुक्तास कार्यमुक्त करणेबाबत कळविले असता त्यांनी दि. १५/०१/२००७ च्या पत्रान्वये दोन उपआयुक्त राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीने कार्यरत असल्याने त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी पूर्ण होईपर्यंत परत पाठवता येणार नाही असे कळविलेले होते. तथापि आयुक्तांनी एक उपआयुक्त (श्री. शेख) कार्यमुक्त झाल्यानंतर त्यांच्या जागी दुसऱ्या उपआयुक्तांची नेमणुक केली. वास्तविक राज्य शासनाला आयुक्तांनी नवीन शासन निर्णयानुसार तिसरा उपआयुक्त पाठवू नये असे कळवून तिसऱ्या नविन उपआयुक्तांची नेमणूक करावयास नकार द्यायला पाहिजे होता. परंतु महासभेची मान्यता न घेता आयुक्तांनी कार्यवाही केली आहे. दि. ०४ मे २००६ च्या शासन निर्णयानुसार फक्त दोनच उपआयुक्त अनुज्ञेय आहेत. एक उपआयुक्त महानगरपालिकेचा व एक उपआयुक्त राज्यशासनाचा असे प्रमाण ठेवणे बंधनकारक आहे. दोन्ही पदे एकाकी होत असल्याने त्यास आरक्षण लागू नाही. तथापि महानगरपालिकेतील अधिकारी महासभेत (ज) खाली आलेला प्रस्ताव दाखवून महापालिकेची दिशाभूल करुन कार्यवाही करित आहेत. अशाप्रकारे मा. महासभा दि. ०१/०६/२००७ विषय क्रमांक ५६ अन्वये केलेला ठराव रद्द करण्यांत येत आहे. अशा ठरावावर कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्यांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये कारवाई करावी.

तसेच दि. ०४ मे २००६ च्या शासन निर्णयानुसार दोनच उपआयुक्त अनुज्ञेय असल्याने प्रतिनियुक्तीवरील एक अधिकाऱ्यास कार्यमुक्त करुन शासनाकडे परत पाठविण्यांत यावे असा ठराव मांडत आहे.

**सदर ठरावात सुचक :- श्री. प्रफुल्ल पाटील व अनुमोदक :- श्री. याकूब कुरेशी यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर मानधनावर पदे भरण्याकरिता मनपा/संस्था/१८८५/४५६/०७-०८ दिनांक २२/१०/०७ अन्वये जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे. त्यामध्ये मानधनावरील पदे आरक्षणातून भरण्यासाठी प्रस्तावित केले आहे.

मानधनावरील पदे भरण्याकरिता आरक्षण लागू करावे असे कोणत्याही नियमात नसताना आज दि. १/११/२००७ रोजीच्या सभागृहात या विषयावर झालेल्या चर्चेत आस्थापनेवरील श्री. गोविंद परब यांनी मध्येच येउन सदर विषयासंदर्भात खोटी माहिती दिली. तसेच, सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उद्धट उत्तरे दिली. त्यांचे सदर जाहिर नोटीस मधील भरतीबाबत केलेले खोटे, नियमबाह्य निवेदन व उद्धटपणे वागणे, गैरवर्तन करणे, त्यांच्याकडे असलेल्या खात्याचा कार्यभार योग्यरितीने न सांभाळणे या कारणास्तव त्यांची आस्थापना विभागातून त्वरित बदली करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचकः- श्री. शशिकांत भोईर.　　　अनुमोदक :- श्रीम. नयना गजानन म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब माझे प्रकरण क्र. २० पुढच्या सभेत घ्यावे अशी मी आपणांस विनंती करत आहे.

**प्रकरण क्र. २० :-**

निश्चित केलेल्या पदावर प्रतिनियुक्तीने नेमणूका न करता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ (१) नुसार नेमणूका करणेबाबत.

(सदर प्रस्ताव पुढील सभेत घेण्यात यावे असे ठरले.)

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, मिरा भाईंदर शहरामधील व्हिडीओ सेंटर, लॉजिंग आणि वरचे वर चालणारे अनैतिक व्यवसाय......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर साहेब, आपण आत्ता जो ठराव मांडला होता की आपल्याला एक उपायुक्त परत पाठवायचा आहे तर त्याबद्दल मी असे सांगतो की प्रशासनाकडून पूर्ण रितसर माहिती आल्यानंतर.....

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्हांला प्रशासनाने जी माहिती दिली त्याच्या आधारे तुम्ही ठराव मंजूर करा म्हणजे आम्ही तुम्हांला ठराव दिला की आज लगेच उपायुक्त परत पाठवा असे होत नाही.

**शशिकांत भोईर :-**

त्याच अनुषंगाने मी गेल्या मिटींगमध्ये आपल्याला बोललेलो की आले आहेत. साहेबांनी सभागृहाला चुकीची माहिती दिलेली. मी त्यावेळेसही भांडत होतो. आत्ता सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील यांनी स्पष्टीकरण दिले तेव्हा सर्व सभागृहाला माहिती पडले. नाहीतर स्पष्टीकरण दिले तेव्हा सर्व सभागृहाला माहिती पडले. नाहीतर सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर बोललात म्हणून वेडेवाकडे बोलतात असे नाही.

**शरद पाटील :-**

मिरा भाईंदर शहरातील लॉजिंग, व्हिडीओ सेंटर आणि रस्त्यावर चालणाऱ्या अनैतिक व्यवसायाबद्दल महापालिकेतसुद्धा वारंवार विषय निघाला असता आणि पोलिस स्टेशनलासुद्धा तक्रारी केल्या असता त्याच्यावर कोणतीही कायदेशीर कार्यवाही होत नाही. नागरिकांच्या तक्रारी लोकप्रतिनिधी म्हणून आमच्याकडे येत असतात. आपण वारंवार तक्रारी करुनही त्याच्यावर कोणतीही कार्यवाही केली जात नाही. आज या शहरामध्ये जर कार्यवाही होत नसेल. त्याच्यावर जर कुठेही कार्यवाही करायला गेल्यावर या महानगरपालिकेतील भारतीय जनता पार्टीच्या तीन नगरसेवकांवर पोलिसांनी कार्यवाही केली आहे. जर ती परवानगी आपल्याकडून दिली गेली नसेल तर आपण पोलिसांना त्याबद्दल पत्र देउन त्यांची माहिती मागवली असेल तर त्याचा खुलासा करावा आणि त्यांना परवानगी दिली नसेल तर पोलिसांना पत्र देउन त्या व्हिडीओ सेंटरवर कार्यवाही झाली पाहिजे.

**संजय तायशेटे (अधिक्षक, मार्केट परवाना विभाग) :-**

मा. महापौरांच्या परवागनीने बोलतो. सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील यांनी जो मुद्दा मांडला. अशा व्हिडीओ सेंटरबाबत महापालिकेकडून कोणालाही परवाना दिलेला नाही. आणि तद्नंतर सन्मा. नगरसेविका सौ. कल्पना म्हात्रे यांनी मागील मा. महासभेत जो विषय मांडला. त्यानुसार आपण मा. तहसिलदार ठाणे,मा. जिल्हाधिकारी ठाणे आणि मा. पोलिस अधिक्षक कार्यालय ठाणे यांना मनपा/परवाना/७५२/२००७-०८, दि. ०३/०१/२००८ अन्वये कार्यवाही करण्याकरिता मा. सभागृहाच्या भावना कळवलेल्या आहेत आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल किंवा काय कार्यवाही केली याबाबतीत माहिती आम्हांला अवगत करुन द्यावी अशी विनंती केलेली आहे.

**शरद पाटील :-**

मग त्याची माहिती आपल्याला आली नाही का? आपण त्यांना जे पत्र दिले आहे त्याचे काही उत्तर त्यांनी आपल्याला दिले का?

**संजय तायशेटे (अधिक्षक, मार्केट परवाना विभाग) :-**

अजून आलेले नाही.

**कल्पना म्हात्रे :-**

मग त्याची माहिती आजपर्यंत तुम्ही का मिळवली नाही?

**संजय तायशेटे (अधिक्षक, मार्केट परवाना विभाग) :-**

त्यांना आपण पत्र पाठवलेले आहे.

**शरद पाटील :-**

पत्र किती तारखेला पाठवले आहे?

**कल्पना म्हात्रे :-**

साहेब आम्ही २० तारखेला प्रश्न विचारल्यावर २ तारखेला हे प्रकरण झाल्यानंतर तुम्ही ३ तारखेला पत्र पाठवलेले आहे म्हणजे याची कार्यवाही तुम्ही नंतर केलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब सदर पत्र दि. २७/१२/२००७ ला एस.पी.ऑफीस आणि जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये गेलेले आहे.

**शरद पाटील :-**

अशा पद्धतीने जर या मिरा भाईंदरमध्ये असे व्यवसाय चालू झाले तर या व्यवसायाबद्दल या महापालिकेतील एखाद्या विभागाला नाव ठेवायची गरज लागणार नाही. नाव ठेवायचे प्रस्ताव आणायची गरज लागणार नाही तर हे नाव या विभागाला असेच पडले जाईल आणि आपण याच्यावर कसलीही कुठलीही कार्यवाही करत नाही. ही शरमजनक बाब आहे. आणि रस्त्यावर चालणारे अनैतिक व्यवसाय इतके खराब चाललेले आहेत की या समाजातील महिलांना त्या रस्त्यावर फिरणे मुश्किल झालेले आहे. एखादी महिला जर रिक्षासाठी उभी असेल तर तिलासुद्धा तसेच हातवारे केले जातात. त्या विषयावर आपण जर लक्ष घालत नसाल. इकडच्या स्थानिक पोलिस स्टेशनला त्याचे पत्र दिले आहे का?

**चंद्रकांत वैती :-**

गेल्या दोन वर्षापासून हा विषय या सभागृहात वारंवार चर्चेला येतो आणि मा. महासभा संपली तर अधिकारी समजतात की माझी जबाबदारी संपली. अधिकाऱ्यांनी आपल्या डोक्यातून हा विषय काढावा. एक तर

आपल्याकडे अधिकाऱ्यांचे नाकर्तेपण या गोष्टीतून स्पष्ट होते. भले महापालिकेची सगळी जबाबदारी नसेल परंतु महापालिकेने या विषयामध्ये विनिष्ट घेउुन पोलिसांना, मा. जिल्हाधिकाऱ्यांना, आणि राज्य शासनाला या विषयामध्ये माहिती दिली पाहिजे. ह्या ज्या परवानग्या असतात याच्यामध्ये निश्चितच महापालिकेची एन.ओ.सी. घेतली जाते. महापालिकेची एन.ओ.सी. नसेल तरीसुद्धा आपण त्यांच्यावर फार मोठी कार्यवाही करु शकत नाही. परंतु ह्या सभागृहाच्या भावना आहेत त्या अत्यंत तीव्र आहेत. या गोष्टी आपण निदर्शनास आणल्या पाहिजेत. नुसतेच ते नाही तर या महापालिकेच्या गेटवर आमचे पत्रकार मित्र मूक आंदोलनाला बसले होते. आज त्यांनी पुन्हा आंदोलन सुरु केले आहे. त्याचा अर्थ आपण काहीतरी कमिटमेंट करतो आणि त्या कमिटमेंट आपण पूर्ण करत नाही. ज्या मागण्या आहेत त्याच्यामध्ये बऱ्याच मागण्या या सगळ्या नगरसेवकांच्या मनातील आहेत, जनतेच्या मनातील आहेत की, या शहरामधील इललिगल कन्स्ट्रक्शनवर कंट्रोल व्हायला पाहिजे. काही नाल्यामध्ये बांधकामे झाली आहेत. ती तुटलीच पाहिजे. सर्व्हिस रोड संदर्भातील मा. हायकोर्टाचे निर्देश आहेत, त्याच्यावर कार्यवाही झालीच पाहिजे. अनेक निर्णय आहेत. मग आपण महापालिकेने याबाबतीत इनिशिएटिव्ह घेतला पाहिजे. सन्मा. सदस्य वारंवार पोटतिडकीने बोलतात त्याच्यमागे त्यांची भावना या शहराच्या हितामध्ये असते. आज नगरसेवक कमी पडतात असे वाटल्याने हा प्रिंट मिडीया, हा इलेक्ट्रॅानिक मिडीया तोही जोमाने काम करतो. उद्या सगळ्या लोकांनी या विषयामध्ये बोलायला उतरले पाहिजे किंवा लढाई केली पाहिजे याची वाट बघू नका. अधिकाऱ्याने आपली जबाबदारी आणि जे अधिकार प्रभाग कार्यालयाला दिले आहेत त्यांनी त्यांची जबाबदारी ओळखून इललिगल कन्स्ट्रक्शन वर अनैतिक धंद्यावर बंधने आणण्याचे काम केले पाहिजे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब जर आपली एन.ओ.सी. त्यांना दिली नसेल तर पोलिसांना सांगून त्यांचे व्हिडीओ थिएटर आहेत ते बंद करण्यांत यावे असे पोलिसांना पत्र द्या. देणार की नाही याचा पहिल्यांदा खुलासा करा. प्रत्येक नगरसेवकांनी प्रत्येक वेळेला मांडत असलेले विषय याच्यावर जर बिल्कूल लक्ष घालायचे नसेल तर एखादे चांगले काम करायला तिथे कोण जाईल? केसेस करुन घ्यायला इथे कोणाला वेळ आहे? आणि अशी जर यांचीच दादागिरी चालत असेल तर त्यांचीच दादागिरी चालू द्या. नगरसेवकांचे इथे काम काय आहे? जर नगरसेवकांकडे लोक येत असतील, त्या विभागातील महिला येउन सांगत असतील, त्या विभागातील नागरिक येउन सांगत असतील आणि त्याच्यावर आपण काहीच कार्यवाही करत नसाल. जसे सन्मा. सदस्य श्री. चंद्रकांत वैती साहेबांनी सांगितले की मा. महासभा संपली की तुमचे काम संपले असे असेल तर तसे आम्हांला सांगा.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर साहब, मैं यह पुछना चाहता हू की यह मा. महासभा मे हम लोग आते है, सब नगरसेवक आते है, पत्रकार आते है, दर्शक आते है, आप लोग आते है। तो क्यों आते है? क्या हमारे पास कुछ कामधंदा नही है? वहाँसे कोई कठपुतली का नाच होता है। आप नचाते है, हम लोग नाच कर चले जाते है। मा. महासभा मे जो विषय होता है। उसके उपर कोई इन्स्पेक्शन या वॉच की बॉडी है की नही? आज मा. महासभा मे जो विषय हुआ इसका इम्लिमेंटेशन कब होगा? इसपर कोई कंन्ट्रोलिंग है की नही? यह विषय मे इसलिए बोलता हूँ की पिछली मा. महासभा मे आपने रुलिंग दिया था। मा. आयुक्त साहब ने रुलिंग दिया था की जो अतिक्रमण का विषय है वह किया जाएगा। यह विषय पिछले एक साल से चल रहा है। और इसपर मै यह कहने जा रहा हूँ और मैं एक प्रुफ दूँगा की जो अतिक्रमण विभाग है। वह सुप्रिम कोर्ट के आदेश की अवहेलना कर रहा है। तो उनके उपर क्या कार्यवाही की जाएगी। और जैसे पिछली कई मा. महासभा मे विषय चल रहा है की बडे अतिक्रमण या अवैध झोपडपट्टी इलिगल अतिक्रमण पर काम नही हो रहा है। खाली शहर को दिखाने के लिए गरीबों को सताया जा रहा है। तो गरिबों के बारे मे मैं एक विषय ला रहा हूँ। मतलब अधिकारीयोंसे माँग रहा हूँ की, महापालिकाने कुछ हॉकर्स पॉलिसी बनाई है क्या? और उसका सुप्रिम कोर्ट का आदेश है। मैं आपको आदेश पढकर दिखाता हूँ। उसकी अवहेलना हो रही है। सुप्रिम कोर्ट का ओदश ऐसा है, २० जनवरी २००४ को तत्कालिन पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी ने राष्ट्रीय निती बनाई थी। और उस निती के हिसाब से सुप्रिम कोर्टने आदेश दिया था। सुप्रिम कोर्ट का आदेश ऐसा है, हॉकींग इज नॉट क्राईम. हॉकिंग इज द फन्डामेंटल राईट ऑफ हॉकर्स. सब्जेक्ट टू सम रिझनेबल रिस्ट्रीक्शन. सम रिझनेबल रिस्ट्रीक्शन कौन तए करेगा, तो महापालिका। अपनी महापालिका ने अगर ऐसी कोई पॉलिसी नही बनाई है तो आज हॉकर्स के गाडीयें को उठाकर डाल देते है वह गाडी वापस नही करते है। और अगर वापस नही करने की पॉलिसी है तो किसी को भी वापस नही करे। लेकिन मैं यह जानकारी देना चाहता हूँ इसके पिछे बहूत बडा स्कँडल चल रहा है। मैं तो कहूँगा की जबसे श्री. दिवटे साहेब आए है तब से स्कँडल चल रहा है। उसमें लाल, पिला, हरा पट्टा लगाया जा रहा है। कुछ दलाल तैयार हो गए है। जिनकी गाडी पर लाल, पिला, हरा पट्टा है वह गाडी छुट जाती है। और जिनकी गाडी पर लाल, पिला, हरा पट्टा नही है। उनको गाडी नही दिया जाता है। तो सुप्रिम कोर्ट के आदेश की अवहेलना है। तो अधिकारीयों पर क्या कार्यवाही की जाएगी इसका मुझे रुलिंग दिजीए।

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, ही बाब गंभीर आहे. शहराकरिता ही बाब भयंकर गंभीर आहे. नगरसेवक जर कोणतेही अनैतिक धंदे पोलिसांच्या निदर्शनास आणून देत असतील तर नगरसेवकांवर उलट कार्यवाही करायची आणि त्यांना आतमध्ये टाकायचे ही किती गंभीर बाब आहे. म्हणजे कोणत्याही शहरामध्ये धंदे चालू द्यायचे आणि पोलिसांनी त्याच्याकडे डोळेझाक करावी आणि कोणत्याही नगरसेवकाने त्याच्या प्रभागामध्ये किंवा त्याच्या वॉर्डमध्ये जे धंदे चालतात त्याला विरोध करुच नये. म्हणजे हा किती मोठा भ्रष्टाचार चाललेला आहे. तर याच्याविरुद्ध या सभागृहाच्या भावना आपण मा. गृहमंत्री साहेब ह्यांना तुम्ही कळवाव्या आणि त्यांच्यावर जे गुन्हे दाखल केलेले आहेत ते मा. गृहमंत्र्यांना कळवून त्यांच्यावरील गुन्हे काढावेत अशी आपल्या या सभागृहाची भावना आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, ही मागणी मा. गृहमंत्र्यांकडे तुम्ही करायची.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, तुमचे दोन तास झाले. मला माझे उत्तर पाहिजे..

**मा. महापौर :-**

कोणते?

**नयना म्हात्रे :-**

कोणते म्हणजे? गटनेत्यांना तुम्ही कार्यालय कधी देणार?

**शानू गोहिल :-**

मा. महापौर साहब, मिरा भाईंदर शहर मे जिस तरह से इललिगल कन्स्ट्रक्शन हो रहे है। और उसमें प्रशासन पुरी तरह से उनका साथ दे रहे है। जो भी कंम्प्लेंट हम लोग करते है उसके बारे मे वह लोग कार्यवाही करते नही है। आज, कल, परसो इस तरह से टाला जाता है। अब मेरे क्षेत्र मे गए दो साल से इललिगल होर्डींग्ज लगाया गया है। उसकी तक्रार मैंने दो साल से दि हुई है। लेकिन अभी तक कोई कार्यवाही की नही है। और चार दिन पहले मुझे मा. उपायुक्त श्री. पानपट्टे साहेब का फोन आता है और कहा जाता है की, शानू जी मुझे माजी नगरसेवक का फोन आ रहा है। मुझे टेन्शन हो रहा है मैं देखता हूँ इसमे क्या कर सकता हूँ। मैंने कहा इललिगल का लेटर है और जिसकी दिवार पर लगाया गया है प्रायव्हेट प्रॉपर्टी पर उसकी भी तक्रार है। मेरी भी तक्रार है। उसके बावजूद भी कोई कार्यवाही नही हो रही है। और हमारे उपायुक्त मुझे ऐसा उत्तर देते है। तो इसके बारे मे वो खुलासा करे की, उन्होने यह किसके दबाव मे आकर बोला? उसका नाम बताईए।

**शरद पाटील :-**

पहिल्यांदा आम्ही जो प्रश्न विचारलेला त्याचे उत्तर द्या.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही एका-एका सदस्याला बोलायला देता. जोपर्यंत तुम्ही पहिले एका सदस्याचे उत्तर देत नाही. त्यांचे समाधान होत नाही. तोपर्यंत दुसऱ्या सदस्यांना तुम्ही कशाला उभे ठेवता? इललिगलबद्दल त्यांच्या प्रश्नाचे उत्तर द्या. तुम्ही काय कार्यवाही करणार? त्यांचा विषय बाजुलाच ठेवता आणि दुसऱ्या सदस्यांना तुम्ही बोलायला देता. हे योग्य आहे का?

**मा. महापौर :-**

हे तुम्हाला मान्य आहे का? मी दरवेळेला तेच बोलतो. सर्व एकत्र उभे राहतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील यांनी सांगितले की, एन.ओ.सी. नाही त्याच्यावर कार्यवाही करता येते का? आमचे संबंधीत अधिकारी जे एन.ओ.सी. देतात त्यांना विचारतो. इकडच्या सोन्या-चांदीच्या व्यापाऱ्यांनी एन.ओ.सी. घेतली नाही. म्हणून आपल्या नियमाखाली त्यांच्यावर कोर्टामध्ये कार्यवाही केली. सोळा सोना-चांदीच्या व्यापाऱ्यांना कोर्टामध्ये उभे केले. त्यांच्यावर वॉरंट काढले. तेव्हा ते व्यापारी होते. त्या व्यापाऱ्यांना सरळ करता येते. आणि व्हीडीओ पार्लर किंवा अनैतिक धंदे करतात त्यांच्यावर त्यांना कार्यवाही करता येत नाही. त्यांना तो नियम लागू होत नाही. याचे त्यांनी उत्तर द्यावे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रशासनाने आपल्याला खुलासा केलेला आहे. संबंधीत व्हीडीओ पार्लर बेकायदेशीर आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांनी कार्यवाही का केली नाही?

**कल्पना म्हात्रे :-**

आजपर्यंत कार्यवाही का केली नाही?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

महापालिकेला जे अधिकार आहेत. त्याच्या लिमिटच्या बाहेर जाउन कार्यवाही करता येत नाही. जे अनैतिक प्रकार चालतात ........

**मदन उदितनारायण सिंग :-**

त्यांनी एन.ओ.सी. घेतली नाही. तर त्याच्यावर काय कार्यवाही करण्यांत आली? कार्यवाही का केली नाही?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याबाबतीत विभागप्रमुख श्री. संजय तायशेटे यांनी सांगितले.

**शरद पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, आता सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी तुम्हाला तेच सांगितले की, एन.ओ.सी. घेतली नाही. म्हणून आपल्या अधिकाऱ्यांकडून चांदीवाल्यांवर कार्यवाही करता आली.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ही बाब मा. पोलिस प्रशासनाशी निगडीत आहे. या ठिकाणी ज्य अनैतिक धंद्याबाबत सर्व सन्मा. सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्या निश्चित विचारात घेउन मा. पोलिस कमिशनर साहेब आणि एस.पी. साहेबांकडे या सभाशास्त्राचे जे कामकाज आहे ते निश्चित त्यांच्याकडे पाठवून कार्यवाहीसाठी विनंती केली जाईल.

**स्नेहा पांडे :-**

शहर मे ऐसे अनैतिक काम चल रहे है।

**शरद पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, हे आज चालू झालेले नाही. या सभागृहात २००४ सालापासून प्रत्येक नगरसेवक तक्रारी करत असतो.

**स्नेहा पांडे :-**

जब नगरसेवक अनैतिक और इलिगल काम को आप लोगों के नजर मे लायेंगे उसके बाद प्रशासन की कार्यवाही होनी चाहिए या प्रशासन की कार्यवाही पहले होनी चाहिए।

**शरद पाटील :-**

सन्मा. श्री. गायकवाड साहेबांनी २४ तासात त्यांच्यावर कार्यवाही करु असे आम्हाला आश्वासन दिले होते.

**शानु गोहिल :-**

माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या.

**शरद पाटील :-**

त्यांच्या प्रश्नाचे उत्तर द्या. आपण कार्यवाही करु शकतो की, नाही हे तुम्ही सांगा.

**मा. महापौर :-**

ही गंभीर बाब आहे की, एखादे प्रशासन कुठेतरी कमी पडते किंवा पोलिस कमी पडतात आणि एखाद्या नगरसेवकाने अशी भुमिका घेतली की ते बंद करु या. तर त्याच्यावर गुन्हा दाखल होतो. उद्या कोणत्याही नगरसेवकावर ही परिस्थिती येउ शकते. ज्या ज्या व्हीडीओ पार्लरला लायसन्स नाही त्याच्यावर प्रथमतः ताबडतोब गुन्हा दाखल करण्यांत यावा. पोलिस स्टेशनला त्याची नोंद देण्यात यावी. दुसरे सन्मा. सदस्या सौ. शानु गोहिल मॅडम यांनी उपस्थित केले, जे होर्डींग्ज आहेत. ते हार्डींग्ज आपण ताबडतोब नियमाप्रमाणे ........

**मदन उदितनारायण सिंग :-**

इललिगल झोपडपट्टी क्यो नही हटाई जा रही है? वो होर्डींग एक रजिस्टर संस्था की, होर्डींग है। उसमे अगर तकलीफ है तो इलिगल झोपडपट्टी क्यों नही हटाई जा रही? पहले इलिगल झोपडपट्टी हटाईए, इललिगल झोपडपट्टी तोडीए।

**शानु गोहिल :-**

आप अभी आज ही उसको निकालने का आदेश दिजीए।

**मा. महापौर :-**

होल्र्डींग संस्था का हो, आपका हो या किसीका भी हो। नियम के हिसाब से होगा तो उसे रखना चाहिए। अगर नियम के हिसाब से नही है तो उसपर नियम के हिसाब से कार्यवाही करनी चाहिए।

**मदन उदितनारायण सिंग :-**

आप नियम देख लिजिए। नियम के हिसाब से नही बैठता तो कार्यवाही किजीए।

**शानु गोहिल :-**

प्रशासन नियम के हिसाब से कार्यवाही करेगी और आज के आज ही होना चाहिए। गये एक साल से मैने पत्र डाला है।

**मा. महापौर :-**

दुसरी गोष्ट, सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील यांनी जे सांगितले. मा. उपायुक्त साहेब, आपण ताबडतोब एस.पी. साहेबांना पत्र पाठवा आणि गटनेत्यांची एक बैठक लावा. कारण आपले बरेचसे विषय पोलिसांसाठी थांबलेले आहेत. फेरिवाले असू द्या, झोपडपट्टी असू द्या. आपल्याला पाहिजे तसे पोलिस प्रोटेक्शन या ठिकाणी मिळत नाही. काल मी स्वतः झोपडपट्टीची पाहणी केली. तिकडे तोच प्रॉब्लम आहे. ज्यावेळी आम्ही जातो त्यावेळी एकत्र कमीतकमी पाचशे लोकांचा मॉब जमा होतो. तर त्याच वेळी आम्ही एक निर्णय घेतला होता की, आपण ही मा. महासभा संपल्यानंतर एस.पी. साहेबांना इकडे बोलवू या. अन्यथा आपण त्यांच्याकडे जाउ या आणि जे लॉजींगचे विषय आहेत, व्हिडीओ थिएटरचे विषय आहेत, अतिक्रमण संबंधीचे विषय आहे. त्याच्यावर काहीतरी फास्ट आणि स्ट्राँग डिसीजन घेउ या. अन्यथा आपण मा. गृहमंत्र्यांकडे तक्रार करुन त्याच्यावर एक निर्णय घेउ या. कारण तुमची ही जी भुमिका आहे ती पोलिस स्टेशनमुळे थांबलेली आहे. जे व्हिडीओ पार्लर आहेत. सन्मा. सदस्य श्री. चंद्रकांत वैती साहेबांनी सांगितले की, आपल्याकडे संगठीत ताकद आहे की, त्याच्यावर आपण काय कार्यवाही करायची. आपण त्याला पूर्णपणे ताला मारुन नेउ शकत नाही. त्याच्यामध्ये आपल्याला पोलिसांनी साथ दिली तर त्याच्यावर आपल्याला नक्की कडक कार्यवाही करता येईल. आपण सर्व गटनेत्यांची एक बैठक लावू आणि एस.पी. साहेबांना इकडे बोलवून घेउ. आपली जी भावना आहे ती त्यांच्या समोर मांडू या. त्यांनी जर ऐकले नाही तर त्याच्या पुढे आपण जाउ या.

**तुळशिदास म्हात्रे :-**

आपण बोलतात की, आम्ही पत्रव्यवहार केला. श्री. संजय तायशेटे यांनी पत्र वाचून दाखवले. पण तुम्हाला माहित आहे की, जर कार्यवाही झाली नाही तर मंत्रालय आहे. मंत्रालयात मा. गृहमंत्री बसले आहेत. तुम्ही त्यांच्या मागे लागा. त्यांच्या मागे लागल्याशिवाय ही कामे होणार आहेत का? उगाच आपण मिटींगला विषय घ्यायचा आणि इथे टाईमपास करायचा. याची तुम्ही अंमलबजावणी करा.

**मा. महापौर :-**

आपण त्यांच्या बरोबर मिटींग लावू.

**तुळशिदास म्हात्रे :-**

नवघरला झोपडपट्टी परत सुरु झाली.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. महापौर साहेब आणि मी समक्ष नवघर झोपडपट्टीला व्हिजीट केलेली आहे. त्याच्याबद्दल आपण प्रोगोम लावतो. मी मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. सन्मा. सभागृहामध्ये काही सन्मा. सदस्यांनी माझे नाव घेउन भ्रष्टाचारास खतपाणी घातले जात आहे, वाढ होत आहे. असा जो आरोप केलेला आहे. हा आरोप मी पूर्णपणे शंभर टक्के फेटाळतो आणि त्या संदर्भात दि. २८/१२/२००७ ला सर्व प्रभाग अधिकाऱ्यांकडे ज्या हातगाडी आणि पार्कींगबद्दलच्या माझ्याकडे ज्या तक्रारी येतात. त्यांना मा. स्थायी समितीने पूर्वी ठराव केलेला आहे. त्या अनुषंगाने त्यांना मनुष्यबळ दिलेले आहे. नियमाप्रमाणे जी काय कार्यवाही त्यांनी करायची आहे. मा. आयुक्त महोदयांचे लेखी निर्देश आहेत, हातगाड्या परत देउ नका. त्याची विल्हेवाट लावा. जेणेकरुन त्या परत रस्त्यावर येणार नाहीत. याबाबत मा. महापौरांचे लेखी आदेश माझ्याकडे आहेत. त्या आदेशानुसार मी दि. २८/१२/२००७ रोजी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना लेखी कळवलेले आहे. त्याबाबत नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही त्यांनी करावयाची आहे. कोणत्याही परिस्थितीत कोणतीही एकसुध्दा हातगाडी आणि होर्डींगच्या संदर्भात केस माझ्याकडे रेफर करायची नाही. परत देण्याचा निर्णय असो. किंवा परत न देण्याचा निर्णय असो त्यांनी नियमाप्रमाणे कार्यवाही करायची आहे. मला खेदाने असे सांगावेसे वाटते की, या पध्दतीने विषय येण्यापूर्वीच संबंधीत प्रभाग अधिकाऱ्यांना लेखी सुचीत केलेल असताना आणि एक सन्मा. सदस्य माझ्याकडे या संदर्भात आले असताना त्यांनादेखील मी असे असे आदेश काढलेले आहेत असे सुचित केलेले असताना अशा प्रकारचा आरोप कोणत्याही पुराव्याशिवाय या सभागृहात केला जातो हे मला खेदाने इकडे नमुद करावेसे वाटते.

**मदन उदितनारायण सिंग :-**

पण तसा आपला ठराव झालेला आहे का? सुप्रिम कोर्टाने आदेश दिला आहे की, महानगरपालिकेने त्याचे रिस्ट्रीक्शन ठरवावे. तसा आपल्या महापालिकेचा ठराव झालेला आहे का?

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

सन्मा. सभागृहाला मी विशद करु इच्छितो. मी आता जो खुलासा केला तो भ्रष्ट्राचाराच्या संदर्भात होता.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य फेरिवाल्यांच्या बाजूने बोलतात की, विरोधात ते पहिले सांगावे ते बाजूने बोलतात असे दिसते.

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

गाड्या द्या असे ते म्हणत नाहीत पण हिरव्या पट्टया लावून गाड्या परत दिल्या जातात.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महापौरांनी गटनेत्यांबाबत जे रुलिंग दिलेले आहे. दोन दिवसामध्ये मा. कोकण आयुक्तांकडून पत्र पाठवून त्याचे अभिप्राय घेउन खुलासा करण्यांत येईल.

(सभागृहात गोंधळ)

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, एक शोकप्रस्ताव आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, माझे उत्तर द्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महापौरांनी गटनेत्यांबाबत जे निवेदन दिलेले आहे, जी रुलिंग दिलेली आहे त्याबाबत मा. विभागीय आयुक्तांकडे दोन दिवसात पत्र पाठवून त्यांच्याकडून अभिप्राय घेण्यात येइल.

**नयना म्हात्रे :-**

एवढे दिवस पत्र का पाठवले नाही.

**शशिकांत भोईर :-**

आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रातील नवघर गांव, भाईंदर (पूर्व) येथील आपल्या मिरा भाईंदरचे कर्मचारी श्री. संतोष भाउराव पाटील यांचे पिताश्री श्री. भाउराव नारायण पाटील यांचे दुःखद निधन झालेल आहे. त्याचा मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**दुःखवठा ठराव १९ :-**

मिरा भाईंदर क्षेत्रातील नवघर गांव, भाईंदर (पूर्व) येथील आपल्या मिरा भाईंदरचे कर्मचारी श्री. संतोष भाउराव पाटील यांचे पिताश्री श्री. भाउराव नारायण पाटील यांचे दुःखद निधन झालेल आहे. त्याचा मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर    अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्यांनी शोकप्रस्ताव मांडलेला आहे. हुतात्म्यास श्रध्दांजली वाहायची आहे. कृपया सर्वांनी दोन मिनिटे अगोदर उभे राहून मृतात्म्यास श्रध्दांजली वाहायची आहे.

(सर्वांनी दोन मिनिटे जागेवर शांत उभे राहून हुतात्म्यास श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा. महापौर :-**

सभा संपली.

**सभा संपल्याची वेळ :- सायं :- ०३.१५ वा.**

**सही/-**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**